
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ...... काव्य
सं. क्र. २६७६




REFBK-0025274

# विनोदलहरी

बाबुलनाथ

২৬৭৬
২৮২৬৪
২৬।১২।৫০

২৬৭৬
তারিখ ২৮২৬৪
২৬।১২।৫০

# विनोद लहरी

**विनोदी, विडंबनात्मक, उपहासात्मक व अजब अशा निवडक कवितांचा छंदोबद्ध काव्यसंग्रह**

REFBK-0025274

REFBK-0025274

## बाबुलनाथ

प्रपंच प्रकाशन

३८९ शनिवार पेठ, पुणे ३०.

प्रपंच प्रकाशन : १८३

प्रकाशक :
माधव रा. कानिटकर
प्रपंच प्रकाशन
३८९ शनिवार पेठ,
पुणे ४११०३०.

मुद्रक :
का. वि. शिगवण
श्रीधर प्रिंटर्स
५९१ जनता वसाहत, पर्वती
पुणे ४११००९.

© वि. शा. काळे
(कवि बाबुलनाथ)
रम्यनगरी, 'ओ' बिल्डिंग
फ्लॅट नं. २३, बिबवेवाडी,
पुणे ४११०३७.

मुखपृष्ठ :
राजेश लवळेकर

१० ऑक्टोबर १९८९
(विजयादशमी)

किंमत : रुपये चाळीस फक्त

एकूण कविता : १७१



माझी लाडकी कन्या

**कै. कु. शोभा काळे**

हिच्या पवित्र स्मृतीस

# अंतरंग

'आकाशगंगा' ते 'अमृतधारा' या काव्यसंग्रहात प्रसिद्ध झालेल्या व त्यानंतरही नवीन लिहून प्रसिद्ध केलेल्या माझ्या खास निवडक विनोदी कवितांचा एक कवितासंग्रह प्रसिद्ध करावा अशी माझ्या अनेक इष्ट मित्रांनी सूचना केल्यावरून 'विनोद लहरी' या नांवाने तो आज प्रसिद्ध करण्याचा योग येत आहे. दरम्यान 'धुवाधार', 'त्रिशूळ' व 'धूमधडाका' या माझ्या विनोदी कविता संग्रहांच्या प्रथमावृत्त्या संपलेल्या आहेत, हे कळविण्यास मला आनंद वाटतो.

प्रत्येकाची आवड निवड ही निरनिराळ्या प्रकारची असते. त्यादृष्टीने निवडक विनोदी कविता पसंत करण्यात माझे साहित्यिक मित्र डॉ. गं. ना. जोगळेकर, डॉ. वि. म. कुलकर्णी, प्रा म. ना. अदवंत व कविवर्य कै. ग. ह. पाटील यांचे मला बहुमोल सहाय्य झाले आहे, त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. प्रस्तुत काव्यसंग्रहात आणखीही उरलेल्या माझ्या वैशिष्ठ्यपूर्ण कविता समाविष्ट व्हायला पाहिजेत असे कांही रसिकांस वाटण्याचा संभव आहे. परंतू सांप्रतच्या परिस्थितीत मर्यादित पृष्ठसंख्येचा, व्यंगचित्रांनी ती न वाढविण्याचा व पुस्तकाची त्यानुसार किंमत ठरविण्याचा विचार लक्षात घेणें भाग पडले आहे.

आतापर्यंत माझ्या गंभीर व विनोदी काव्य–लेखनावर कै. प्रा. वि. मा दी. पटवर्धन, कै. प्रा. अरविंद मंगरूळकर, प्रा. म. ना. अदवंत, डॉ. न. म. जोशी, डॉ. अरुणा ढेरे, डॉ. गं. ना. जोगळेकर, श्री. रा. प्र. कानिटकर, श्री. विनायकराव देवरुखकर या सुप्रसिद्ध साहित्यिक मित्र मंडळींनी स्वतंत्र लेख लिहून व अनेक साहित्यिकांनी वर्तमान पत्रांत, मासिकांत उत्तमोत्तम अभिप्राय देऊन माझे कौतुक केले व उत्तेजन दिले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

असंबद्धता, अनपेक्षितपणा, कृत्रिमता, ढोंगीपणा इ. कारणामुळे जो हास्योत्पादक चमत्कार उत्पन्न होतो तो 'विनोद' अशी विनोदाची थोडक्यांत व्याख्या करण्यात आलेली आहे. विनोदाचे स्वभावनिष्ठ, प्रसंगनिष्ठ व शब्दनिष्ठ असे तीन प्रकार आहेत संस्कृत नाटकांत विदूषकाच्या भाषणांतील साध्या घरगुती उपमा, दृष्टांतांनी चमत्कृती उत्पन्न होते व त्यामुळे त्याचा 'विनोद' विशेषत्वाने खुलून जातो. या विनोदाचे सर्व कार्य तो एकटाच करीत असल्याचे सर्वसाधारणपणे दिसून येते. जो उत्तमप्रकारे गंभीर कविता लिहू शकतो व ज्याचा स्थायी भाव जात्याच विनोदी, खोडकर व हास्य निर्माण करणारा असेल त्याच्याकडूनच चांगल्या तऱ्हेने विनोदी, विडंबनात्मक व उपहासात्मक कविता लिहिल्या जातील असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. विनोदी काव्य हे लोकरंजनाचे कार्य उत्तमप्रकारे करून दाखवते. चित्रकलेत व्यंगचित्रकाराला व सर्कशीत विदूषकाला जे विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे, तेही या दृष्टीने जरूर ध्यानात ठेवण्यासारखे आहे.

मनुष्याच्या स्वभावांतील विक्षिप्तपणाचे, तऱ्हेवाईकपणाचे व ढोंगी वर्तनाचे अत्यंत सूक्ष्म अवलोकन करून त्यातील विरोध आणि विसंगति दाखविणे यांतच

विनोदी लेखकाचे खरे कौशल्य आहे. अतिशयोक्ति हा हास्याचा एक अलंकार आहे व विडंबनाचा उपहास हा आत्मा आहे. तेव्हा या टीकास्त्राइतके दुसरे हुकुमी हत्यार नाही.

उच्च दर्जाच्या विडंबनात व्यक्तिद्वेष, कुत्सितपणा किंवा असभ्य टवाळी यांना थारा नसतो. थोडक्या शब्दांत ज्यास्त अर्थ आणण्याचे कसब फारच थोड्या कवींना व लेखकांना साधते आणि त्यांत मार्मिकता, सूक्ष्म विनोद व उपरोध यांच्या निरनिराळ्या छटा पहावयास मिळतात. व्यक्तिविषयक कविता नावीन्यपूर्ण असल्या तरी त्यांतील विनोद अगर टीका ही बोचणारी नसावी. ज्या उत्कृष्ट कवींच्या कवितांची विडंबने केली जातात, त्या कवींनाही आपल्या कवितांची विडंबने वाचून कौतुक व गंमत वाटली पाहिजे. त्यांना राग येता उपयोगी नाही. मात्र विषय हेरून विडंबनाचे हत्यार वापरतांना बरीच सावधगिरी बाळगावी लागते म्हणजे अशा विनोदी आणि विडंबनात्मक कवितातून प्रतिभेची चमक निःसंशय दिसून येते.

या सर्व गोष्टी ध्यानांत घेऊन 'विनोद लहरी' या काव्यसंग्रहांत निवडलेल्या सर्व कविता खेळाडू वृत्तीनेच लिहिलेल्या असून रसिक वाचक त्याचदृष्टीने त्यांच्याकडे आपुलकीने व उल्हसित वृत्तीने पाहतील अशी आशा आहे. त्यांत कोणाचेही अगर कुठल्याही प्रसंगाचे सहेतुक विडंबन नाही व कोणाच्याही भावना दुखविण्याचा तिळमात्र हेतू नाही.

अलीकडे छंदोबद्ध कविता फारशी सहसा कुठें आढळून येत नाही व विनोदी कविता लिहिणारे कवि थोडेच दिसून येतात. नव काव्याचे युग सुरू झाल्याने मराठी कविता ही नवीन नवीन वळणे घेत आहे व तिचा प्रवाह निरनिराळ्या मार्गाने अखंड वाहून राहिला आहे. नवोदित कवि आपल्या कर्तबगारीनें व कलाकौशल्याने मराठी काव्यवाङ्मयात मोलाची भर टाकतील अशी सदिच्छा व्यक्त करावीशी वाटते.

प्रपंच प्रकाशनाचे माझे साहित्यिक मित्र श्री. माधव कानिटकर हे माझा 'विनोद लहरी' हा निवडक कवितांचा संग्रह आज प्रसिद्ध करीत आहेत त्याबद्दल त्यांना जेवढे धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच होतील.

शेवटी 'विनोद लहरी' हा माझा निवडक कवितांचा संग्रह सर्व रसिक वाचकांना आवडो, ही श्री शारदेच्या चरणी नम्र प्रार्थना.

दि. १० ऑक्टोबर १९८९
रम्यनगरी 'ओ' बिल्डिंग,
फ्लॅट नं. २३, बिबवेवाडी,
पुणे ४११०३७.

**विनायक शामराव काळे**
**(कवि बाबुलनाथ)**

# विनोद लहरी

## धूमधडाका

दिपवाळीच्या शुभ समयांसी
दिला बनवुनी और फटाका
ठासुन दारू शब्द, सुरांची
नांव दिले त्यां धूमधडाका !

समीक्षका तुज येउन झटका
नसे फटाका हा पण लटका
टीकेचा दे मारुन फटका
नकळत तुजही देइल चटका !

अजब खरा हा असे फटाका
काढुं नका पण व्यर्थ अडाखा
महान त्याचा दिव्य अवाका
कळेल त्याला, ज्यांस तडाखा !

जगावेगळा असा फटाका
धूमधडाका ! धूमधडाका !

## धूमधमाल

जगावेगळी कविता माझी
विडंबनात्मक, उपहासाची
हास्य रसाची करुनि कमाल
उडवुनि देतो धूमधमाल !

दरोबस्त जे छुपे समीक्षक
वदोत मजला कवी 'विदूषक'
जाणुन माझी काव्य-कुशलता
करील कौतुक कुणि एखादा !

## गाजराची पुंगी

चाले गोंधळ नित्य काय कसला श्रीशारदामंदिरीं
जावें जेविं तदा तिथें झडतसे आवाज कांहीतरी !
फुंकी ' शिंग ' कुणी सुरू न अगदीं झाली ' तुतारी ' कुठें
देई थाप ' डफावरी ' वडविलें कोणीं न जों ' चौघडे ' !

शाहीरी सरतां सुरेल ' मुरली ' कोणीतरी वाजवी
' पांवा ' ऐकुनि ' बांसरी-सनइ ' ला हाताळताती कवी !
'सारंगी'स्तव भांडतो ' तुणतुणें ' घेऊनि तो ' गोंधळी '
कोणी शाहिर ' बँडवादन ' करी काढून वृत्तें खुळीं !

पोराचा कुणि वाजवीत बसतो ' घुंघूरवाळा ' कुठें
त्याचें पाहुनि तें, कुणीं ' खुळखुळा ' घेतोच हातामधें !
काढी ' बोल पिपाणि ' चे रडुनियां काव्यांत कोणीतरी
त्याला साथ करावयास दुसरा हातीं ' नगारा ' धरी !

कोणी घालित ' शीळ ' ती फिरतसे काव्यांत वेड्यापरी
बाधा भूतमयी जडून ' कवडा ' त्या ' गर्जना ' नांवरी !
जो जो तो उठतो ' विलाप ' करितो, मेलें न कुत्रें जरी
' बोंबाबोंब ' तशी जरी न शिमगा काव्यांत कोणी करी !

वेड्यांचा असला जिथें भरुनियां बाजार गेला असे
मी आतां करुं काय स्वस्थ बसुनी ? हो चित्त वेडेपिसें !
त्यांनीं त्यांत ' विडी ' तशी ' चिलिम ' ना फुंकावया ठेविली
काढूं साधन कोणतें हुडकुनी ? मत्स्फूर्ति चेकाळली !

वृत्ती गाजरपारखी करुनिया त्यांच्यामधें नंतर
जादूच्या पिशवींतुनी नविन मी हें काढितो ' गाजर ' !
' पुंगी ' वाजवितो अतां बनवुनी त्याचीच काव्यांतुन
नाहीं ती जर वाजली तडक मी खाऊनिया टाकिन ! !

❀ ❀

## कविता घरोघरी !

नवा कवी मी, द्या आमंत्रण कोणी अपुल्या घरी
कविता वाचन करून माझे, मौज लुटा हो खरी !

जन्मताच झळके सिद्ध कवी तो भला
बहु प्रयत्न करुनी बनतो दुसरा खुळा

मारुन मुटकुन नवा कवी मी, नकली वैदूपरी
कविता वाचन करून माझे, मौज लुटा हो खरी !

किति उदंड कविता रचून मम जाहल्या
मासिकात कोठे कुणी न त्या छापल्या

संग्रह काढावया प्रकाशक 'बाड' न हाती धरी
कविता वाचन करून माझे, मौज लुटा हो खरी !

कवि संमेलन ते भरे कुठे सारखे
टाळती निमंत्रक तिथे मला नेमके

कशी पडावी रसिकांच्या मम कविता कानावरी
कविता वाचन करून माझे, मौज लुटा हो खरी !

लावी न चाल मम कवितेला गायक
कां ठरे न एकही गाण्यास्तव लायक ?

नांव व्हावया चाले माझी धडपड वरचेवरी
कविता वाचन करून माझे, मौज लुटा हो खरी !

वाचनास कविता घरी मला बोलवा
ऐकताच कविता करून द्या वाहवा

मानधनाची कसली आशा नुरली हृदयांतरीं
ब्याद कवीची न टाळता, द्या हौस पुरवुनी पुरी !

❀ ❀

# एका संपादकाची कैफियत

मासिक कां बंद कराया येइ काळवेळा
जिरुन जिद्द झाला माझा जीव अर्धमेला !

बने हाय ! संपादक मी कोठुनी कळेना
भासले न तेव्हां धंदा करिल सर्व दैना
अनुभवाविना नच कोणी जाहला शहाणा
येउनी प्रचीती त्याची गर्व पार गेला !

जवळ किती लेखक केले जुने अन् नवीन
लेख, कथा, कविता त्यांच्या छापल्या भुलून
मानधनासाठीं पण जे बैसले अडून
कसेंबसें गोंजरले त्यां देउनी हवाला !

वाढ वर्गणीदारांची कधिं न होत गेली
जाहिरातपत्रें बहु ना हिंडुनी मिळाली
बझारांत अंकांचीही दशा हीन झाली
परत कसे येउन गठ्ठे, नेइ रद्दिवाला !

बिलें प्रेसवाल्यांचीही चालली फुगून
छपाइचा कागद बैसे ठाम महागून
चित्रकार, ब्लॉक् करणारे घेति आडवून
कोंडमार होउन करती सर्व क्रूर हल्ला !

अशा स्थितित मासिक देवा ! कसें चालवावे
खर्च भागवूनी सारा, काय मीच खावे ?
बँक कर्ज देते म्हणुनी किती उरीं घ्यावे
व्याज फेडतां नच लागे हात मुद्दलाला !

सूज्ञ लेखकांनो ! आतां करा हो विचार
वर्गणी, निधी देण्याचा होउं द्या करार
मला तारणारे तुम्ही बना मुखत्यार
चालवून मासिक माझें लागलों भिकेला ! !

❀ ❀

# जाहलो प्रकाशक मी कुठुनी ?

जाहलो प्रकाशक मी कुठुनी
वेदना सले ही आज मनीं !

पाठ्य-पुस्तके शाळांची ती
जोंवर हुकुमी हातात होती
धंदा तेव्हा नव्हता कमती
तो घांस पुरा जाई गळुनी !

किताब कॉलेजांचे कैक
ग्रंथ-घराविण ज्यां न गिऱ्हाइक
किंमती त्यांच्या भडक ठराविक
छात्रांस जाति ना परवडुनी !

कथा नि कविता उघडया पडल्या
उदंड कादंबऱ्या हबकल्या
सर्व योजना नडून फसल्या
पुस्तके गुदामीं कोंसळुनी !

महाग त्यातुनि कागद झाला
छपाइचा दर वाढुनि गेला
चित्रकार अन् बाइंडरवाला
ब्लॉक्मेकर्ससह गेले चढुनी !

धंदा आतां कसा चालवू
कुणा पुस्तके उधार देऊ
मानद्रव्य तें कसें भागवू
जर वसूल पैसा हो न क्षणीं !

मोठी पुंजी कोठे शोधू
बँक कर्ज ते कितीक काढू
व्याजासह अन् केव्हा फेडू
गाडलो गळयाइतुका पुरुनी !

तुम्हांस लेखक ! आतां इशारा
पुस्तकांस ना तुमच्या थारा
खर्च अगोदर ओता सारा
ना तरी प्रकाशक जा बनुनी !

धंदा, थट्टा नव्हे मस्करी
आज अमीरी उद्यां फकीरी
तारेवरची कसरत सारी
सुटताच तोल, गचकेल कुणी !

❀ ❀

## साखरेवर खास उपाय

महाग साखर हो बाजारीं
सखये ! तोंवर निश्चय करणें
गोडधोड ना काहीं खाणें
चहा तसाही बंद ठेवणें
क्रम ठेवुनि पण दिवसा रात्रीं—
दोघांनीही साखर पेरुन
खडीसाखरी बोल बोलणें
साखरझोंपा बळें काढणें
परस्परांनी आणिक घेणें—
हवे तेवढे " साखरचुंबन " !!

❀ ❀

## नव कवींचा सहकारी कविता संग्रह (?)

(नव कवींचा सहकारी कविता संग्रह काढण्याची जाहिरात एका उल्लू पठ्ठ्याने करून त्यात तो जाहीर करतो-!)

'साधुनिया सहकार
कवींचा नव, साधुनि सहकार
नव कवितांचा काढणार मी ! संग्रह नमुनेदार !
पर्वणी पहा ही चालुन आली महा
द्या धाडुनि छोट्या सुंदर कविता सहा
दर कविते मागे तैसे रुपये दहा
पसंत ज्या कविता
पडतिल पसंत ज्या कविता
स्वीकारुन त्या, दोन महिन्यांनी संग्रह ध्या तैय्यार !
ज्या कविता तुमच्या पसंत ना पडतिल
साभार परत त्या पैशासह होतिल
विक्रीस कवींना पांच प्रती मिळतिल
समारंभ करणार
प्रकाशन समारंभ करणार
नव्या कवींचे 'वाचन' करुनी प्रसिद्धि त्या देणार' !
जाहिरात ऐसी कुणी खुबीनें करी
नव कवी खुळे ते आकर्षुन त्यावरी
चलबिचल तयांच्या मनांत झाली जरी
जमवुनिया पैसे
कसेतरी जमवुनिया पैसे
कविता सोबन धाडुनि देती करून ठाम विचार !

भाराभर जमल्या उदंड कविता किती
अन् पैशानेही पूर्ण भरे पोतडी
जाहिरात केली ज्या पठ्यानें सुधी
पालटली बुद्धी
तयाची पालटली बुद्धी
काढुनि कविता, लाटुनि पैसा, झाला पार पसार !

ना पत्ता त्याचा अजुनि कुणां लागला
नव कवी रडति ते गळ्यांत घालुनि गळा
' पुरि अद्दल घडली ' जो तो वदतो खुळा
संग्रह सहकारी
कशाचा संग्रह सहकारी ?
स्वतंत्र संग्रह काढुनि अपुला, जिरवूं हौस अपार !

❀ ❀

## मागणे पोराचे

सुट्टीमध्ये नाताळाच्या
ख्रिस्मसत्राता भेटिस येतो
मुलास देतो हवे हवे तो
जाणुनि हे ! कुणि पोर मागतो !

' घरांत आमुच्या प्रत्येकाला
निजावयाला पलंग आहे
डॅडींना तो स्वतंत्र दे रे
अडचण करती रोज ममीला ! '

❀ ❀

# कवितेतूत कविता ! एक चिंता !

(एक नवा प्रकार)

( कल्पनेच्या साम्राज्यात कवीने काहीही खुबीने रचले तरी ते शोभून दिसते व चालूही शकते ! पण त्या रचनेने जगरहाटीची प्रामाणिकपणे जाणून बुजून पायमल्ली केली तर त्यातून भलताच पेंचप्रसंग निर्माण होण्याचा संभव नाही कां ? संबंधित कवी क्षमा करून जनतेची ही चिंता दूर करण्याचा प्रयत्न करतील कां ? )

मृत्यूनंतर कवे ! तुझे शव नाहीं जाळायचे जरी
वाट तयाची कशी लावणें ? हिंदुबांधवा स्पष्ट करी !

ख्रिस्ती धर्मानुसार कां तें थाटुन थडगे पुरावयाचे
पार्शी धर्मान्वये खाद्य कीं पशुपक्षांना पुरवायाचे ?

नदींत, सिंधुत लोटुनि किंवा माशांचे तें भक्ष्य बनावे
मीठ मसाला वेष्टुनि किंवा, ' ममी ' प्रमाणे जतन करावे ?

शव-विच्छेदन करून तव कां नेत्रदान गरजूस द्यायचें
हाडांनी निज छात्र गणांना ज्ञान वैद्यकी लुटावयाचे ?

तुझ्या शवाचें हाल न व्हावे, व्यक्त सदिच्छा करि जनता
भलते सलते भकून वेडया ! पाडुं नको रे भुरळ वृथा !

श्री ज्ञानेशापरी समाधी जिवंत कीं तूं घेणार ?
वैकुंठाला संत तुकासम बसुनि विमानीं जाणार ?

❀ ❀

# जिकडे तिकडे फाटाफूट

जिकडे तिकडे फाटाफूट        जुळून यावी कैशी जूट ?
देशामध्यें
पक्षामध्यें
संस्थांमध्यें
घरामधेंही ताटातूट        जुळून यावी कैशी जूट ?
पुत्र, पित्यांत
भाऊबंदात
पति, पत्नीत
करी कलह कधिं काथ्याकूट        जुळून यावी कैशी जूट ?
जो तो स्वार्थी
पोटासाठी
जगतो जगतीं
मिळेल तैशी लुटतो लूट        जुळून यावी कैशी जूट ?
जीवन जगणें
व्यथा सोसणें
जिवंत मरणें
प्रत्येकानें काय निमूट        जुळून यावी कैशी जूट ?
जगा, मरा; वा
कुणांस पर्वा
सरे न कावा
जो तो वागे जर बेछूट        जुळून यावी कैशी जूट ?
कलियुग आलें
दैव कोपलें
देवहि दडले
सत्य जहाले जगात झूट        जुळून यावी कैशी जूट ?

❀ ❀

# नाथा ! लिहितां कशास कविता ?

निशाचरासम जागुनि रात्रीं दिवा सारखा ठेवुन जळता
गुणगुण करुनी मज जागवुनी नाथा ! लिहितां कशास कविता ?
सांप्रतची बहुतेक मासिकें डोळे उघडे फाडुनि वाचा
संपादक घोड्यावर बसुनी देती कविंना काय इषारा ?
'उदंड आतां झाल्या कविता अनाहूत त्या धाडुं नका हो
खंडोगणती धडकुन पडल्या छापायाला जागा नाही !'
कुणी मनाई हुकूम काढुन स्पष्टपणाने जाहिर करती
'मासिकांत त्या कविता देणे निर्णय घेउनि केल्या बंद !
तयार ठेवा नकला जवळी उत्तर नाही मिळावयाचे
चुकून पडली पसंत कविता छापू केव्हातरि सवडीने !
कविता सोबत तिकिटे धाडा महिन्यानंतर उत्तर येइल
उत्तर नाही, खुशाल समजा, पोचलींच ना तुमची कविता !'
नव कवितांना अल्प मासिके वळेंच कोठे आश्रय देती
छंदा-वृत्तामधल्या कविता व्यर्थ कशाला खरडत बसतां ?
वृत्तदर्पणे, छंदोरचना गुंडाळुन ते किताब ठेवा
गहन, निरर्थक, अगम्य न्यारी नवीन कविता रचून दावा !
लंब्या चवड्या महान कविता कोण छापतो ? कोण वाचतो ?
'कणिका','हायकू'अन्'वात्रटिका' चुटक्यासम त्या घेतिल कोणी ?
चुकून छापुन आली कविता मुशाहिरा तिज मिळतो कां हो ?
गायक किंवा चाल लावुनी आवर्जुन कां कोठे म्हणतो ?
हलक्या फुलक्या त्रोटक कविता अनंत स्फुरल्यानंतर नाथा
संग्रह तुमचा तुम्हीच काढा मीच प्रकाशक, तुम्ही लेखक !
प्रकाशकांना भेटु नका हो खर्च सर्व ते मागुन घेतिल
तडक अखेरी देतिल उत्तर काव्य-पुस्तकें कुजून पडती !
संग्रह अपुला जरी न खपला मोफत वाटू, रद्दित काढू
हौस मनीं जी तुमच्या उरली जिवंत तोंवर जिरवुन घेऊ !

❀ ❀

## माझा दिवाळी अंक

कशी मला बुद्धी झाली येइ ना कळून
अंक दिवाळीचा देवा ! काढिला कुठून ?

मित्र किती लेखक माझे त्यास विनवुनीया
' कथा, लेख, कविता ' त्यांच्या फुकट हापुनीया
मुद्रणालयाचा तैसा धेंड गाठुनीया
छपाइचे काम दिले त्यां हाताशी धरून !

बँक कर्ज लाभे मजला करुन मिनतवारी
' ब्लॅक 'नेच कागद तैसा मूल्य भरुन भारी
चित्रकार, ब्लॉक् मेकर्स जे रिकामे बझारीं
सज्ज होति घ्याया पैसे मुदत पत्करून !

वणवणां किती मी फिरलो बहुत कंपन्यांत
धनिक थोर उदमी लोकां भेटलो अनंत
अल्प जाहिराती देती कुणीं पिटाळीत
अंक छापल्यावर सारा वायदा ठरून !

अंक एकदांचा कोठे प्रसिद्धीस आला
योग्य त्या दलालीवरती रवाना जहाला
मूल्य तीस रुपये त्याचे पटुनि ना कुणाला
सर्व अंक जेथे तेथे धुळीला पडून !

हाय ! हाय ! देवा ! आता काय मी करावे
कसे सर्व देणे झाले सांग भागवावे ?
सर्व अंक रद्दी विकुनी कुणा काय द्यावे
' अंक दिवाळी ' जन्माची याद दे करून !

❀ ❀

## नटांची कैफियत

जगावेगळी जात
आमुची जगावेगळी जात
नाट्यकलेवर जीवन जगतो नट आम्ही दिनरात !

संसाराला दूर सारुनी
कुटुंब सारे घरी ठेवुनी
नाटक, नाटक करीत फिरतो नित्य नव्या शहरांत !

'कुटुंब' नुरली अता कंपनी
निर्माता घे प्रथम बांधुनी
अस्वलं आम्ही तो दरवेशी दानशूर साक्षात !

नवीन नाटक संतत निघते
काम कसेही त्यांत लाभते
नक्कल करतां पाठ घोटुनी, येइ प्राण कंठात !

दिग्दर्शक अन् लाभे बांका
अभिनय शिकवी धरून हेका
शंभू करितो नंदींची जणुं तालिमींत दमछाट !

तनखा कामास्तव जो मिळतो
महर्गतेने पुरा न पडतो
संसाराची घरखर्चास्तव उडते वाताहात !

मद्य, विडीचे व्यसन भयंकर
संगत जमुनी जडते सत्वर
चुकून रोगी बनतां होतो तोटा मात्र अफाट !

सफरीस्तव ती 'आराम' गाडी
धिंड मजेने संतत काढी
मृत्यू घडवी कधी कुणाचा करुन बडा अपघात !

मिळवुन पैसा कधि निर्माता
बंद करी निज धंदा बुडतां
दुर्घटनेने हाय ! कपाळां मारुन घेतो हात !

रंजन रसिकांचे करण्याला
जन्म आमुचा असे जहाला
आज बरे, पण काय उद्याचे ? चिंता तीव्र मनांत !

कलंदराचे जीवन ऐसे
रखडत गाडे फिरे नटांचें
अडले, कोंसळले तरि अमुचे अमर नाटय जगतांत !

❀ ❀

## टक्कल ! शाप की वरदान ?

' महागाईच्या दिवसामध्ये
टक्कल मित्रा ! तुजला पडले
करावयाला कटिंग आतां
खर्च तुला रे येइल थोडा ! '

खटयाळ कारागीर वदे पण–
' डोईवरचे केस शोधण्या
वेळ लागतो फार म्हणूनी
दुप्पट दर तूं दे रे बाबा ' !

❀ ❀

# स्पर्धेचे दिव्य नाटक

नाटक स्पर्धेला दिले ते संस्थेने एका
नाटक ते कसले जयाला शेंडा ना बुडखा !

सदस्य संस्थेचे वृद्ध अन् निष्क्रिय झालेले
नट भाडोत्रीचे जमा ते कुठुन तरी केले !

नटी मिळविताना कण्या त्या दातांच्या झाल्या
भाव पुरा देता दोन मग हाताशी आल्या !

उदयोन्मुख कोणी उद्याचा नाटककार नवा
साहित्यिक दृष्टी पुरी ज्यां आली ना देवा !

नाटक नव त्याचे निवडले कसेवसे और
रात्रंदिन त्याची चालली तालिम घनघोर !

नाटक निर्माता धरूनी ज्वलंत अभिमान
जाहिरात करुनी मानतो स्वतः समाधान !

नाटक संस्थेचे कुठें मग तोटा खर्चाला
चहा फराळाने रंग तो तालमीस चढला !

सेट नवा केला टेपने संगीतही टिपले
रंगित स्पॉट दिवे स्टेजला अनंत लावियले !

अति कल्पकतेने सज्ज ते नाट्य दिव्य झाले
दिग्दर्शक बावा तयाने ढंग नवे केले !

प्रयोग स्पर्धेचा अखेरी उदासमय वठला
वठला कीं फसला ? नव्हे हो पुरता कोंसळला !

वर्तमानपत्रीं लगोलग ये जहरी टीका
रसिकहि ओरडले– 'नको तो पुन्हा प्रयोग फुका !'

❀ ❀

## नाटकी नाटककार

गोष्टी आणिक चार पाच कविता प्राध्यापकाने कुठे
नाही जों लिहिल्या, कळे न कसली शेखी तयाला चढे !
अंग्रेजी नव नाट्य एक चुकुनी वाचून झाल्यावर
होई नाटककार तो, करुनिया स्वच्छंद रूपांतर !

झाले नाटक सज्ज तें पण कसे हाती धरीना कुणी
आणूं स्टेजवरी धडाडुन कधी चिंता तयां ग्रासुनी !
साऱ्या नाटक कंपन्यात फिरुनी माघार ये चोपडे
हौशी नाटक-संघ त्यां न भुलतां, चारून देती खडे !

कॉलेजांतिल आपुल्या मग तयें उल्लू मुलें गांठुनी
पैसा खर्चुनिया अखेर बसवी तो आपुले नाटक !
स्त्रीचे एकच पात्र त्यां न मिळतां विद्यार्थिनी कोठुनी
पत्नीला बनवूनिया नव नटी, झाला स्वतः नायक !

केला नाट्य-प्रयोग जों न पहिला नाट्यगृहाला कुठें
दैवें शेवटचा ठरून बसले त्याला तडाखे वडे !
सारे प्रेक्षक ते तुटून पडले नाट्यप्रयोगावरी
अंडी आणि भजी नटांस मिळतां, गेले पळूनी दुरी !

आता नाटककार हाय ! नुरुनी, रुद्रावतारी बने
टीकाकार महा कठोर दिसतो ! जो तो तयाला म्हणे
जे जे नाटक ये नवीन कुठले ह्या रंगभूमीवरी
लेखामागुन लेख ते खरडुनी टीका विषारी करी !

❋ ❋

# हाय ! हाय ! ते साहित्य संमेलन !

दरबारांतिल तुझ्या शारदे ! देखुन संमेलन
सुखावे कसे न माझे मन ?

अध्यक्षांची निवड कराया अटीतटीनें किती
स्वागत-सदस्य झाले अती !

सदस्य नसुनी साहित्यिक ते, अध्यक्षच जो हवा
आणिती निवडुन त्यां तेधवा !

माजी अध्यक्षा धुसफुसते मान दिला ना म्हणून
तिची कां मर्जी जाई उडून ?

येउनि रागें अचूक करते भाष्य आपुले निकें
वाटुनी सभेमधे पत्रकें !

फैलावरती कित्येकांना आजवरी हो तिनें
घेतले लिहून जाहिरपणें !

महाकवीची भर दरबारीं करून शोभा पुरी
तडक ती निघून जाई दुरी !

प्रथम दर्शनी घडतां ऐशी दारुण शोकांतिका
लागलें गालबोट कीं फुका !

नियोजीत त्या अध्यक्षांचे भाषण होता सुरू
लागली गर्दी कां ओसरू ?

गांवगांवचे लहान मोठे तैसे उदयोन्मुख
किती हे जमले साहित्यिक !

जत्रा भरली सुशिक्षितांची धुंदित जो तो दिसे
स्वतःला समजे मोठा कसे ?

जाहिरात ती करून अपुली मिरवित कोणी फिरे
कीर्तिची हाव न त्याची सरे !

कारण नसतां द्वेष मनांतुन कित्येकांच्या भरे
दुज्याचे बघवेना कां बरे ?

डामडौल नी गाजावाजा पूर तयां येतसे
कार्य पण भरीव नाही दिसे !

मंत्र्यावाचुन संमेलन ते फलदायी ना अशी–
भावना होउन बैसे कशी ?

परस्परांचा परिचय व्हाया अवसर कोठे मिळे
खच्चुनी कार्यक्रम कोंबले !

त्याच फिरुन त्या विषयावरती चर्चा नी भाषणे
ठराविक वक्त्यांनी बोलणे !

कथा-कथन जें करती त्यांना संधी ना लाभुन
तयांचे झाले उच्चाटन !

काव्य-सभेतुन संधि अगोदर सिद्ध कवींना मिळे
नवोदित दिसले थोडे खुळे !

ऐन प्रसंगीं घुसखोरीने वरणी अपुली कुणी
अगांतुक देती कवि लावुनी !

चावुन चोथा झालेले तें पुरे जुनें नाटक
पाहती कसेबसे प्रेक्षक !

जिकडे तिकडे गैर व्यवस्था, उकळुनि पैसे भले
प्रतिनिधी रागावुन भांडले !

विषय-नियामक सभेमधे कां हमरी तुमरी झडे
ऐक्य ना ठराव येतां घडे !

ठराव फुसके पसार होती झडून चर्चा जरी
राहयचे पडून ते दप्तरीं !

दलित जनांचा मूळ प्रश्न तो आणुन संमेलनीं
सोडवी अद्यापी ना कुणी !

सभामंडपी करुनि गर्जना घुसतां जन ते बळें
हाय ! कां संमेलन कोसळे ?

अन् कोसळल्यावर ऐसे संमेलन
' घ्यावया नको त्या गांवाचे दर्शन '
कां भीष्म प्रतिज्ञा जाई तो गर्जुन ?

फज्जा उडतां दरबाराचा तुझ्या शारदे असा
जाहला जो तो वेडा पिसा !

* (नोव्हेंबर १९७७ मध्ये पुण्यास भरलेल्या
मराठी साहित्य संमेलनास उद्देशून)

❀ ❀

## नकटया नाकाचा नट नायक

नकटया नाकाचा नट नायक    नाकानें कां कांदे सोली
नाक कापुनी मात्र स्वतःचे    दुसऱ्याला अपशकून करतो !

नाकापेक्षां जड तो मोती    उंच करूनी नाक वरळतो
नको तिथें हा नाक खुपसतो    ज्याला त्याला नाक मुरडतो !

नाक तोडुनी त्यानें अपुले    कडोसरीला दिले खोचुनी
नाक ठेचले जरी स्वतःचे    वरती करुनी नाक मिरवितो !

याच्या नाकीं नऊ न येतिल    बाल न हा नाकांतिल राहिल
नाक धरुन हा बसतां, माशी    नाकावरती ठरूं न देइल !

याच्या पुढती नाक खाजवा    याच्या नाकीं वेसण घाला
वदेल हा पण नाकामध्यें    ' पडलों तरि मम नाक असे वर !'

❀ ❀

# नाट्य निर्माता

कशाला नाट्य निर्माता जहालों मी बरे देवा
निमाली जिद्द सर्वस्वी नको धंदात त्या सेवा !

किती मी ओतुनी पैसा उभारूं नाट्य-संसार
शिरीं तो वाहुनी भारा हटे मी वीर झुंजार !

नटांची राखुनी मर्जी जिव्हाळा त्यां किती लावू
नट्यांना खूष ठेवाया किती नाचूनिया धावूं ?

नटांनी ऐन वेळी कां मला देऊन गुंगारा
मिळे ' नाईट ' ती जादा करावा तेथ पोबारा !

नट्यांसाठी किती साड्या तऱ्हेच्या नित्य आणाव्या
कशा त्या चोरुनी त्यांनी सदा बाहेर नेसाव्या ?

प्रवासी घेउनी गाडी नटांना घेरुनी न्यावे
बडे सामान नाट्याचे कसे तें नीट राखावे ?

मुरब्बी नाट्यकर्त्यांना किती गोंजारुनी घ्यावे
जिवाच्या इष्ट-मित्रांनी फुका कां पास मागावे ?

नवी ती नाटके न्यारी कुठूनी सारखी दावू
टिकावू त्यांत ती थोडी, जुनी होती न टाकावू !

मिळेना घातला पैसा करूं धंदा कसा आतां
बने मी कर्जबाजारी बिचारा नाट्य निर्माता !

❀ ❀

## प्रिये तूं !

प्रिये तूं सोडुनी द्यावा मनाचा व्यर्थ कांगावा
किती मी ध्यास, मागोवा तुझ्या गे प्रीतिचा घ्यावा ?

सिनेसृष्टीमधे माझा जरी संचारतो जीव
कलेचा सांग त्या वेडे ! तुला कां खास दुष्टावा ?

कला ती जीवनासाठी कसे ना हे तुला ठावे
तिथे चारित्र्य जो राखी कसा त्यां काळिमा यावा ?

नटी त्या भाळुनी देती खुबीनें टाकुनी जाळे
फसूनी जीव ना जाई तयांच्या प्रीतिच्या गांवा !

जिवाची तूंच सम्राज्ञी किती विश्वासुनी सांगू
सुगावा प्रीतिचा माझ्या तुला तो कां न लागावा ?

जिवाचा कोंडमारा कां करूनी सारखा घेशी
अरेरे ! जाहली सीमा नको तो बाह्य देखावा !

पुरे हेवा तसा दावा तुझा मी जाणतो कावा
जडूं दे जीव हा जीवां घडूं दे प्रीत–मेळावा !

❀ ❀

## रंगांत बेरंग

प्रवासतांना गाडीमध्ये
सहज समोरी दोन कुमारी
ओळख झाली, विनोद चाले
उपहाराला चढला रंग !

सुंदर स्टेशन ये खंडाळा
भुयारांतुनी धांवे गाडी
दिवे न गाडीमधे लागतां
जिकडे तिकडे हो अंधार !

अंधारीं त्या, मी वदनाने
'च्युक्क' ध्वनी मौजेने केला
उजेड येता, दोघी मज कां
शंकेने, गुरगुरुनी बघती !

❀ ❀

## तो आणि ती

तो म्हणाला   मी असे तो 'क्लार्क' खंदा लेखक
ती म्हणाली   मीहि आहे 'टायपिस्ट' अन् वाचक !
तो म्हणाला   वाचशी कां गोष्टि माझ्या मासिकीं
ती म्हणाली   सर्व गोष्टी चोरट्या त्या ठाउकी !
तो म्हणाला   काढितो मी छान फोटो ते किती
ती म्हणाली   'स्नॅप' माझा तूं नको घेऊं कधीं !
तो म्हणाला   ब्रह्मचारी देह मी हा राखिला
ती म्हणाली   चोरुनी तूं पाहसी वेड्या मला !
तो म्हणाला   वेड लावी रूप तूझें गोजिरें
ती म्हणाली   जाणते मी तूं कसा आहे खरें !
तो म्हणाला   प्रेम माझें मी तुला अर्पू कसें ?
ती म्हणाली   तेवढें तूं सोडुनी द्यावे पिसें !
तो म्हणाला   कां जिव्हारीं बाण ऐसे मारिशी ?
ती म्हणाली   प्रेम-प्रांतीं झुंज चाले ही अशी ! !

❀ ❀

## दोन नट्यांचा एक संवाद

पहिली :– ' भेटलीस बाई ! किती दिसांनी मजला
अन् दिलें न अपुलें गुपित कळूं कोणांला
राहुनी ' गरोदर ' महिना कितवा आता
देणार कधीं तूं बर्फी किंवा पेढा ?'

दुसरी :– ' चल चावट कुठली तुला न कांही कळतें
नच विचार करतां भलतें मज कां पुसते ?
मी नसुनि ' गरोदर ' उदर पुढें जें आलें
जाहला ' जलोदर ' डॉक्टरांनी सांगितले !

❀ ❀

# कांही सोबती

अज्ञात कुणी ती होती नव कवियित्री
आवाज तियेचा मधुर तयांतुनि भारी
बाहेर गायनां जेव्हा म्हणुनी जाई
तो पालक सोबत तिचा अगांतुक येई !

गायिका कुणी ती सुंदर तरुणी होती
देहाची नुकतिच तिच्या उमलली कांती
जलशांत गातसे नृत्य करूनी गोड
लुडबूड कराया बंधु तिचा ये त्यांत !

व्याख्यान ऐकण्या रमणी जाई कोणी
जरि झाले नव्हते लग्न तियेचे अजुनी
संधान जुळविलें तिनें गुरूशीं अपुल्या
एकटी न सोडी तिज तो कांही केल्या !

हपिसांत लागली कोणी नूतन बाला
तिज ‘ क्लार्क ’ जवळ जो होता शिकवायाला
मैत्रींत जमवुनी ‘ प्रेम ’ तयानें आतां
तिज सोबत करतो घरांस जातां येतां !

अभिनेत्री सुंदर सिनेतारका कोणी
बाहेर फिराया जाते नटुनी थटुनी !
नच दिग्दर्शक वा नटही लाभे जेव्हां
तिज सोबत कुत्रा करावया ये तेव्हां !

❀ ❀

## खोली मिळेल तर शपथ !

खोली म्हणून कांहीं खोली कुठें मिळेना
खोलीविना जिवाची झाली अपार दैना !

'बेकार', 'पोळ' ऐसा शिक्का सदा कपाळीं
तें युद्ध मात्र येतां त्यां नोकरी मिळाली !

लाभे पगार आतां संपून दैन्य जाई
चिंता परी जिवाला लागून अन्य राही !

लग्नाविना अरेरे ! मी हा जगांत प्राणी
कैशी मनांस माझ्या येई न पोर कोणी ?

देवास त्या अखेरीं माझीच कींव येई
दृष्टीसमोर बाला धाडून एक देई !

पाहून तीच बाला मी अंतरांत धालों
प्रीती तिची लुटाया वेडा पुरा जहालों !

मार्गी सदा सखीच्या जाऊन सोबतीला
संधान बांधलें मी सांगू कसें जगाला ?

राहावया परंतू खोली कुठें न भेटे
(एकांत गांठ नाहीं !) मोठी उणीव वाटे !

ऐशी कशी स्थिती ही खोली कुठे मिळेना
खोलीविना जिवाची झाली अपार दैना !

❀ ❀

## बदली झाली तुझी तरी

बदली होउन दूर राजसा ! जाशि कसा रे निघुन्
अचानक जाशि कसा रे निघून् ?
सहचरी तुझी मी, माझा तूं सौंगडी
सहवास तुझा मज लाभुनिया हरघडी
राहिलें सदोदित सुखांत मी गुलछडी

हाय ! परंतू आनंदाला विरजण गेले पडून्
दूर तूं जातां मजला त्यजून् !
तुजसवें किती मी बागडलें, हिंडले
हपिसांत तुझ्यासह कामातुन रंगले
अन् प्रेम आपुले तिथेंच फोफावले

जातां येतां सोबत केलिस ' बॉडिगार्ड ' तूं बनून्
तुझ्यासम शोधु अतां रे कुठून् !
कामांत मला तूं मदत करूनी सदा
मज विश्रांतीचा दिलास रे फायदा
तुजवाचुनि आली माझ्यावरती गदा

रजेवरी मी जाते आतां मनामधे तडफडून्
तुझ्याविण गुलाब जाई सुकून् !
हपिसांत आपुली लीला बहु वाढली
अन् अधिकाऱ्याने जोडी निज फोडली
कां खोड निखालस प्रीतीची मोडली ?

बदली झाली तुझी तरी रे तुझीच बघ मी अजून्
भेट दे केव्हांही कडकडून् !

❀ ❀

# कामचुकार

हपिसांत एक कोणी    प्राणी असे चुकार
'वल्ली खरोखरी ती'    जो तो करी पुकार !

तारुण्य लोपुनीया    वार्धक्य त्यांस येई
अंगात माजलेली    मस्ती परी न जाई !

कामामधे कधीही    त्याचे न लक्ष राही
दुसऱ्यावरी स्वतःचे    लोटून काम देई !

टिवल्या करीत हिंडे    निज काम हा त्यजून
मोकाट पोळ जैसा    रस्त्यामधे सुटून !

चिक्कू स्वभाव ऐसा    शोभेल मारवाडी
व्यसनें दुजी न त्याला    नस्सी अमाप ओढी !

अश्लील बोलण्याची    ह्या जन्मजात खोड
कांही म्हणा तयाच्या    नाही जिभेस हाड !

कोठे कसे वदावे    त्याला न ताळमेळ
वार्धक्य ये तरीही    करि नित्य पोरखेळ !

हपिसातल्या मुलींची    थट्टा करी सदा हा
गोंडा तसाच घोळी    त्यांच्यासमोर केव्हां !

सोडून लाज सारी    लीला करी अशा तो
शिक्षा तयां घडाया    बांका प्रसंग येतो !

कामात चूक मोठी    त्याची घडून येई
साहेब त्यास तेव्हां    बदली हुकूम देई !

हाती हुकूम येता    घायाळ तो जहाला
घेऊन तोंड काळें    हा ! हाय ! दूर गेला !!

❋ ❋

## माहेरी गेलीस पण –

विवाह अपुला सखे ! नच अतां कुठें जाहला
अधीक महिना पुढें चुकुनि तों कसा पातला !
तुला न मम पाहणें मुख म्हणून त्या संधिला
मला त्यजुनि एकली परत जाशि माहेरला !

सखे ! तुजसि जाउनी दिवस चार ना जाहले
प्रचंड विरहाग्निने हृदय पोळुनी टाकले !
समग्र सदनामधें वसत मी पिशाच्यासम
कळे न मज चालला मम कसाचि नित्यक्रम !

जडत्व शरिरांप्रती न कळतां कसें येउनी
प्रशांत मज झोंप ती कधिं न राहते लागुनी !
तुझ्या मृदुल हातचा मधुर लोपतां तो चहा
मला प्रथम रोज ती गमत आपदा दुस्सहा !

कितीक जरि भोजनें ' वसतिच्यागृहीं ' झोडली
न तीं रुचिर भासुनी उलट ये शिसारी गळीं !
सखे सुगरिणी ! तुझ्याकडुन ऊन ताजी भजी
कधी ग मिळणार ती अहह ! लागली काळजी !

अलोट कचरा पहा चहुंकडे गृहीं सांठला
तुझी खरंच ' लक्ष्मी ' बघत वाट हा थांबला !
मलूल दिसती कशा विसकटून साऱ्या चिजा
त्वदीयविरहें जणूं गमत पोंचल्या त्यां इजा !

न काम कसलें मला सुचुनि वृत्ति हो चंचल
हृदीं विरहवन्हि हा धुमसुनी करी व्याकुल !
सुरम्य प्रतिमा तुझी बघत वेळ काढूं किती
अतृप्त मम वासना पुरवशील वेडे कधीं !

कसा तरि कुठें वृथा भ्रमुनि लोटतां ये दिन
छळे पण निशा युगासमचि भासुनी वैरिण !

हृदीं प्रणयसिंधु हा उफळुनी न राही स्थिर
प्रफुल्ल मुखचंद्रमा तव दिसेल कां सत्वर ?

❀ ❀

## मत्स्यगंधा आणि प्रेमवेडे शाहीर

सागराच्या रम्य तीरी मस्त ही संचारते
जो हिला पाही तयाचे चित्त कां चक्रावते ?

रेशमांच्या केशभागीं माळुनी पुष्पें, तुरे
कां कटीला कोयता ती धारधारी खोवते ?

पुष्ठ जंघा झांकण्याला वस्त्र नामी नेसुनी
दोरखंडाच्या पिळाचा घट्ट काचा मारते !

जोबनाचे जे मनोरे झेप घेती हालुनी
कंप त्यांचा थांबवाया चुस्त चोळी खेचते !

कुंकुमाची कोर भाळी, सैल नाकीं सुंकली
भ्रूकटी ताणून दोन्ही नेत्र–बाणां सोडते !

फेकुनी दर्यात जाळें मीन जैसे ओढते
प्रीतिच्या पाशांत तैसे प्रेमवीरां टांगते !

वाहतो श्वासात वारा खारटा नी झोंबरा
दृष्टिने अग्नी–निखारा नागिणी कीं झाडते ?

भाग्यशाली शंतनूला मत्स्यगंधा ही मिळे
प्रेमवेड्या शाहिरांचे भाग्य नाही तेवढे !

❀ ❀

## चतुर्थीच्या चंद्रास–

किती वेळ चंद्रा ! घेशी आज उगविण्याला
डोकवून सत्वर दावी तोंड तें जगांला !

मनीं खास आशा धरुनी गोड त्या फलाची
कडक तें उपोषण करतें सखी ह्या जिवाची !
सोडण्यास उपवासाला थांबली कधींची
तिची कींव येइं न कैशी तुला रे दयाळा ?

एकटाच जेवुनि आधीं बसे मी घरात
लक्ष तें न लागे माझे मुळीं वाचनात
प्रिया अजुनि उपवासी ती पाहुनी मुकाट
अंतरात ममतेचा ये उसळुनी जिव्हाळा !

तिच्यावीण येइ न जातां फिरायास दूर
सिनेमास त्यांतहि झाला जावया उशीर !
करूं काय ? झोंप न येई जीव हो अधीर
बिछान्यात तळमळ लागे भासुनी उन्हाळा !

येइ येइ सत्वर चंद्रा ! दाव रे प्रकाश
तुझ्या दर्शनाविण झाली प्रिया ती निराश !
तुझ्यामुळें, तिजवांचुनि मज्जीव हो हताश
भेट झणीं करुनी अमुची पुण्य घे स्वतःला !

❀ ❀

## भास

दहा मुखांनी रावण जेव्हा
निज पत्नीचे चुंबन घेतो
भास तेधवा चुकून होतो
कलावंत कुणि वाजवि पेटी !

❀ ❀

## नाट्य होईना तुझ्यानें

नाट्य होईना तुझ्यानें नाट्य तूझे राहुं दे
चालवी नाट्यगृहां तूं छान धंदा होउं दे !

थोर कांही पूर्वजांनी नाट्यसंस्था स्थापिली
चालवीली, वाढवीली तूज दैवें लाभली !

हातुनी कांही तुझीया कां न संस्था ये पुढें
लोपला निःस्वार्थ जेथें कार्य तेथें तोकडें !

कार्यकर्ते वृद्ध झाले नाट्य त्यांचे संपले
रक्त ताजें तें युवांचे घ्यायचे कां थांबले ?

नाटकी तूं रे दिवाणा बोलबाला हो अती
कां तुझ्या दिग्दर्शनाला ना यशश्री श्रेष्ठ ती ?

नाट्य संस्था आज कैशी जी चिरंजीवी ठरे
'नाट्य गेलें, गृह जहालें' हें न थोडें बाप रे !

नाटके अतां दुज्यांची सूटमार्गे पाहणें
लाभ हा लाभेल ज्याला तो न कोणी सोडणें !

❀ ❀

## टक्कल गोटा

भार्या दोन्ही मजला जपती
पहिली बुद्धी, दुसरी तरुणी
जी ती बोले लाडिकतेने–
' नाथ आपुला सुंदर जोडा ! '

बुद्धी तोडी काळे केस
तरुणी तैसे केस पांढरे
झटापटीतुन दोघींच्या, हो–
डोक्याचा मम टक्कल गोटा !

❀ ❀

## तुझें प्रेम

जडेना तुझें प्रेम कैसें कुमारी
तुझी लागली मज्जिवाला खुमारी !

तुवां मोहिनी घालतां मन्मनाला
तुझ्या प्रेमगानामधें जीव धाला
अहोरात लागे तुझें वेड भारी
जडेना तुझें प्रेम कैसें कुमारी ?

किती कष्टलों मी न सीमा कशाची
तशी बाळगीली न पर्वा धनाची
तुझ्याकारणें जाहलों मी भिकारी
जडेना तुझें प्रेम कैसें कुमारी ?

अहा प्रेम–पत्रें किती धाडुनीया
तुझी भेट मी वांछिली नित्य व्हाया
तुला गांठलें मी घरीं आणि दारीं
जडेना तुझें प्रेम कैसें कुमारी ?

नव्या भेटवस्तू सदा आणवोनी
घराला तुझ्या मी दिल्या पाठवोनी
तयांची स्मृती घेउनी तूं विचारीं
जडेना तुझें प्रेम कैसें कुमारी ?

वळें सोडुनीया स्वतःच्या घराला
समोरा तुझ्या पातलों राहण्याला
तुझीं घेतली दर्शनें लाखवारी
जडेना तुझें प्रेम कैसें कुमारी ?

तुझ्या धाकट्या बंधुशी सख्य केलें
कितीदां तया बोलचित्रांस नेले
तुला बोलवीले न तूं घे भरारी
जडेना तुझें प्रेम कैसें कुमारी ?

तुझ्या गे तनूच्या प्रतीमा सुरेख
तुला चोरुनी काढिल्या मी अनेक
किती पाहुनी त्या धरूं मी उभारी
जडेना तुझें प्रेम कैसें कुमारी ?

गझल् प्रेमकाव्यें तुला आळवूनी
अतोनात केली विरहें जळूनी
तयां जाळण्याची करूं का तयारी ?
जडेना तुझें प्रेम कैसें कुमारी ?

कशी दुर्बळाची तुला कींव ना ती ?
करूं आत्महत्या अतां काय अन्तीं ?
नसें पाप मातें तुला तें कुमारी
करी कांहिं हा जीव तुझ्या अहारीं ! !
जडेना तुझें प्रेम कैसें कुमारी
तुझी लागली मज्जिवाला खुमारी !

❀ ❀

## त्याची भूक !

" बायको असूनी जिवंत पहिली खरी
आणिली कशाला करून दुसरी तरी ?"
हा प्रश्न टाकतां टिचून् वदे लेखक–
" शमविण्यास माझी भूक भली बौद्धिक !"

नच कोडें सुटलें–' भूक काय बौद्धिक '
जग समजे त्याची भूक मात्र लैंगिक !!

❀ ❀

# प्राण्यांच्या म्हणी आणि माणूस

उंटावरचा शहाणा उंटावर बसून
शेळ्या मेंढ्या हांकत जाई
रडत राऊत घोड्यावर बसून
कागदी घोडे नाचवीत राही !

चोरावर होतो कोणी मोर
लांडोरहि नाचे, नाचतां मोर
मेल्या म्हशीला मणभर दूध
दुभत्या गाईच्या लाथा गोड !

साखर खावी मुंगी होऊन
फोडूं नयेत लांकडे हत्ती बनून
वाघाची खोड कुणी काढूं नये
सर्पाला जागे तसे करूं नये !

हत्तीच्या पायानें दुखणे आले
मुंगीच्या पायानें निघून तें गेले
हाल पण कुत्रा खाईना बरे
कावळ्याच्या शापाने गाय ना मरे !

गोगलगाय आणि पोटात पाय
वासरांत लंगडी शहाणी गाय
समर्थाच्या घरीं जे आहे श्वान
त्यालाच सारे देतात मान !

ढवळ्या शेजारी पोवळा बांधला
वाण नाही पण गूण लागला
घरचे झाले थोडे, व्याह्याने घोडे धाडले
अन् गंगेत बिचारे न्हाहून गेले !

तोंडावरची माशी उडत त्याच्या नाही
नाकांवर तशी तो बसूं देत नाही
तोंडाला त्याने कुत्रेच घातले
पोटांत कावळे पण ओरडू लागले !

डोंगर पोखरून उंदीर जर निघणार
मांजराच्या गळ्यात घांट कोण बांधणार ?
आयत्या बिळांवर जर नागोबा बसणार
अंडी पिल्ली त्याची बाहेर कोण काढणार ?

साप साप म्हणून कोणी भुई थोपटू नका
गाय मारली कुणी म्हणून वासरूं मारू नका
प्रसंग पडे बांका तर गाढवाला म्हणा काका
म्हणींचा हथा कर्ता माणूस मेला बोका !

❀ ❀

## एक मागणें

| | |
|---|---|
| काशीचे पंडे<br>चालतील देवा ! | आणखी बडवे पंढरिचे<br>लाटले त्यांनीं जरि पैसे ! |
| दिल्लीचे सोदे<br>परवडले तेही | मवाली आणिक मुंबइचे<br>कापुनी जरि घेतात खिसे ! |
| गुजर, मारवाडी<br>तेही रुचतील | असो वा पठाण काबुलचे<br>भयंकर व्याज ज़री त्यांचें ! |
| नको परी देवा !<br>काळिज नसलेले | भेटवूं हथा जन्मामध्यें<br>भामटे गुंड पुण्याचे ते ! ! |

( माझें गांव पुणे. अरेरे ! हें सुद्धां सांगावें लागतें ना ? )

❀ ❀

## हौशी नट विटुनी गेला

रंगभूमि गाजविणारा        हौशी नट विटुनी गेला !
संस्थेत एकल्या कोठें
नट, नटी सभासद होते
हौसेनें करती नाट्यें
त्यांत जो चमकला तारा        हौशी नट विटुनी गेला !
तो दिसावयाला छकडा
तरुण बांड तैसा तगडा
अभिनयांत त्याचा पगडा
भूमिका प्रमुख करणारा        हौशी नट विटुनी गेला !
यश त्याचे वाढत जाई
पाण्यांत कुणी त्यां पाही
भांडणास रंगत येई
नाट्यांचा चसरे पारा        हौशी नट विटुनी गेला !
अफवा त्या कोणी उठवी
नट, नटीस हा तर गटवी
'बहुढंगी हा, ती नटवी'
कटु होतां ऐसा मारा        हौशी नट विटुनी गेला !
संस्थेत नको ह्या जगणें
नाट्यांत काम ना करणें
हो जिणेंच लाजिरवाणें
ठरवुनि, हो दूर बिचारा        हौशी नट विटुनी गेला !

❀ ❀

## माझी प्रेयसी

तट्तटा काळीज माझे आज कां हे फाटते
फट्फटा कां नाक माझे शिंकुनीही दाटते !

लट्लटा कां हात माझे आंखडूनी कांपती
झट्झटा कां पाय दोन्ही आज नाही चालती !

खट्खटा कानांमधूनी कां ध्वनी झंकारती
पट्पटा हे गाल दोन्ही खोल गेले भासती !

खट्नटां त्या तोंड धाया शक्ति जाई लोपुनी
घट्घटा तो रक्त माझे घेतसे कीं शोषुनी !

गर्गरा डोके फिरूनी सुन्न माझे जाहले
झर्झरा कां अश्रु नेत्रीं हाय ! वाहू लागले !

कर्करा कां दात तैसे वाजताती खाउनी
चर्चरा जी बोलणारी जीभ गेली मोडुनी !

दर्दरा कां घाम माझ्या सर्व अंगाला सुटे
सर्सरा तो काळ कैसा प्राण घ्यायाला उठे !

दुर्धरा माझी दशा ती आज झाली कां अशी
हादरा देऊन नेई मित्र (?) माझी प्रेयसी !

(हा मित्र (?) माझ्या पूर्वजन्मींचा वैरी तर नसेल ना ? )

❀ ❀

## किति उदंड झाले !

किति उदंड झाले नवे दलित लेखक
विद्रोहें होती अला दलित-प्रेरक
पददलित निपजले त्यांतुन कुणि वंचक
त्यामुळें जहाले गर्भगळित वाचक !

❀ ❀

# सावकारी

( कवि यशवन्त ! असू द्या माफि, करा दिलसाफि )

येइं भाई येथ पाही थाटली ही सावकारी
धर्मजाती येथ कांही भेद ऐसा ना विकारी !

दैन्यतेचा हा कडाखा दुर्दशा होई जिवाची
ह्या जगीं पैसाच त्राता त्याविना प्राणी भिकारी !

खर्चराशी जीवनीं बोकाळुनी त्या गांजताती
तुंबते बाकी सदा अन् होइ देणें दारिंदारीं !

तोंड ना ये दाखवाया भंडवीतो दंडधारी
दीन बंधो ! मांडिली ही तुझियासाठीं उधारी !

खानदानी शेठ कोणी वंशजी त्यांच्याच पेढ्या
थाटल्या काढून सोयी सवलतीच्या बेसुमारी !

नाडल्या जीवांस येथें द्यावयातें कर्जपाणी
मारवाडी मात्र माझें व्याज ही माझी खुमारी !

थोडिशी वा फारही घे कर्जसंख्या लागणारी
मुक्त कर्जातून हो त्या ! येउं दे अंगीं हुषारी !

फेडतां सव्याज देणें होउनी नादार अंतीं
जो दगा देशील दुष्टा ! तेवढी हानी हमारी !

# पाहुणचार

( पौराणिक काळांत प्रभू रामचंद्रासाठीं शबरीनें केलेल्या आदरातिथ्याची पूर्वतयारी व हल्लीच्या सुधारलेल्या काळांत. पाहुण्याच्या आगमनाची चुणूक लागतांच होत असणाऱ्या स्वागताची पूर्वतयारी यामध्यें जमीन अस्मानाचें अंतर असल्यास आश्चर्य तें काय ? हा काळाचाच प्रभाव ! )

“ मुलांनो ! पाहुणा कोणी उद्यांला एक येणार
घरांला खर्च ह्या आतां पुरा गांजून घेणार !

तुम्हां कोठूनिया ठावा कसा तो पाहुणा आहे ?
भटाला ओसरी देतां पथारी मांडुनी राहे !

उद्यां पाहाल डोळ्यांनीं सुखें तो घेत आराम
मनीं लागाल चिंताया ‘ कधीं बोलेल हा राम ’ !

बघूनी ‘ काळ ’ तो ऐदी मला संताप येईल
चुकूनी त्या भरामार्जीं नको तें तोंड बोलेल !

तुम्ही योजाल ना युक्त्या ? ‘ नको तो यावया करुनी ’
पहा परगांव गांठाया तयारी आज ‘ तिकडूनी ’ !

कुठें गावांस ‘ ते ’ गेले ? कशाला, केधवां ? कांहीं
विचारी पाहुणा जर तो ( कसें बोलूं ग मी बाई ? )

उद्यांला पाहुणा येवो ! तुम्हां आधींच घेऊन
घरांला लावुनी टाळें; सुखें माहेर गांठीन !! ”

❀ ❀

## चोरटी

येते माझ्या घरीं— सख्या ! ही कोण चोरटी तरी ?
घर हें माझें गजबजलेलें
त्यांत तियेची ये जा चाले
मनीं न येतां संशय कसले
मौज वाटते परी— सख्या ! ही कोण चोरटी तरी ?

खमंग येतां वास कोठुनी
कपाट, खिडक्या बघे शोधुनी
मिळेल जें तें गट्ट करूनी
देते हातीं तुरी— सख्या ! ही कोण चोरटी तरी ?

जेव्हां तिजला कांहिं न मिळते
गुरकुनि ती अंगावर येते
कधीं कधीं तर ओरबाडितें
मस्त जाहली खरी— सख्या ! ही कोण चोरटी तरी ?

उंदिर शिरती घरांत जेव्हां
राखुनि परि ती इमान तेव्हां
लढवुनिया तो गनिमी कावा
करी शिपाईगिरी— सख्या ! ही कोण चोरटी तरी ?

(श्री. मंगसुळीकरांचा 'चोर' ह्या 'चोरटीला' ओळखून घेवो ! )

❀ ❀

## पांचामुखीं तो परमेश्वर

नव कवितांचा संग्रह त्याचा एम्. ए. साठी नेमुनि जाइल
उडत अशी ती वार्ता श्रवतां स्वर्ग उरे त्यां दोनच बोटे !
हाय ! परंतू एम्. ए. साठी पांचच विद्यार्थी पढण्याला
पांचामुखीं तो बनेल ईश्वर शब्द सृष्टिचा कवडा फत्तर !

❀ ❀

## तात्या पंतोजी

(आठ वर्षाच्या कोमल बालविधवेला पाहून एका प्राध्यापक कवीच्या मनाला एकाएकी चरका बसला ! आमच्या खेडेगांवातील तात्या पंतोजीनी शाळा तपासण्यासाठी आलेल्या एका अनपेक्षित व निष्ठुर अशा परीक्षकाला (Inspector) पाहतांच त्यांच्याही मनाला एकाएकीं भयंकर धक्का बसला ! सहृदय रसिकांनी 'ह्या दोघांत कोणाच्या मनाला जास्त हिसका बसला'-याची आवश्यकता भासल्यास जरूर तो काथ्याकूट आपापल्या कंपूत करावा ! )

होती वेळ दुपारची कडक ती कंटाळवाणी जिवा
होती बेफिकिरी मुलें मजपुढें अभ्यास तो घ्यावया !
त्यांच्या मध्थड बुद्धिला पढवितां नाराज मी होउनी
गेलों विस्मरुनी तयां शिकविणें, झोपेमधें गुंगुनी !

गर्जे मी उठुनी मधेंच कितिदां–'शिस्तीमधें वागण्या'
अभ्यासावरुनी उडून मन घे त्यांचें परी खेळण्या !
हत्ती जात असे मुकाट स्व-पथीं कुत्री जरी भुंकुन
तेवीं सान मुलांस नाकळुनियां मी चालवी शिक्षण !

एकाकीं इतुक्यांत कोणि मजला बाहेर हांकारिले
माझ्या स्वप्नसमाधितून मजला भानावरीं आणिलें !
गेलों बाहिर तों भयंकर अती धक्का मना बैसला
शाळेला बघण्या 'परीक्षक' कुणी दैत्यापरी ठाकला !

शोभा तो करणार खास म्हणुनी, अंगीं भरे कांपरें
'एकाकीं अवलोकनें मन पहा होतें किती घाबरें !'

❀ ❀

## सुभद्राहरण

नाटक तें ' सौभद्र ' लागलें थिएटरवर आजला
अमूपहि प्रेक्षकगण लोटला !

नाटक ती कंपनी नविन हो नांवहि मिळवूनिया
स्त्रियांचीं कामें करती स्त्रिया !

प्रयोग सुंदर ' सौभद्राचा ' बघावया त्यांतुनी
जहाला आतुर जो तो मनीं !

पहिली आणिक दुसरी घंटा घणघण ती वाजली
भयंकर आतुरता वाढली !!

गेले साडेदहा वाजुनी तिसरी घंटा परी
अजूनी झडली ना लौकरी !
लागले लोक मग करावया खळबळ
टाळया नि शिटयांचा माजे कोलाहल
आरडा ओरडा चालेही तुंबळ

हाय ! परंतू तिसरी घंटा अजुन कशी ना झडे
ड्रॉपचा पडदा वर ना चढे ?

चिडून जो तो मनांत बोले-" नाटक नच आज कां
जायचा पैसा कां तो फुका " ?

कंपनीस हया काय म्हणावें ? जो तो रागावला
शिव्यांचा वर्षावहि जाहला !

घोर अचानक संकट आलें काय कंपनीवरी
म्हणूनी बंद खेळ कां तरी ?

क्षणाक्षणाला गडबड आणिक गोंधळ बहु माजला
भयंकर प्रेक्षकजन खवळला !

' केलें ' एप्रिल-फूल ' प्रेक्षकां पैसे घेउनि बरे '
अशीही वार्ता पसरे त्वरें !

इतुक्यांत जहाला बार फटाक्यापरी
अन् तिसरी घंटा झडुनि अखेरीं खरी
हळुहळूं ' ड्रॉपचा ' पडदा गेला वरी

स्टेजवरीं ' रंगून ' बोलला ' अर्जुन ' तो मालक
(ऐकती मुकाट मग प्रेक्षक !)

" नाटक तें ' सौभद्र ' संपलें आज आमुचें बरें
कुणांला गमेल कां तें खरें ?

काम ' सुभद्रा ' करणारी ती नविन नटी सुंदरी
रंगुनी तयार होती जरी !

मागिल दारानें तिज कोणी नेउनि मोटारींत–
पळविलें, कसें न तें माहित !

हां हां म्हणतां ' हरण ' तियेचे जाइ बरे होउन
एकटा उरलों मी ' अर्जुन ' !

खरे ' सुभद्रा-हरण ' जहालें माझे हो प्रेक्षक
कशाचें आतां मग नाटक ?

जा धरुन ' सुभद्रा ' माझी आणा कुणी
करुं नाटक कैसें मीच तिच्या वांचुनी
कंपनी चालणें आतां हो कोठुनी ?

घेउनिया संन्यास चाललों धंदा हा सोडुन
कशाचा मालक मी येथुन ?"

❀ ❀

# म्हातारचळ

वय साठ सरूनी जरी येइ वृद्धता
वरिवरी जरठ हा दावी तरुणाची ती आढ्यता !

बोळकें मुखाचें बने कधींचें तरी
लावुनी दांत नकली ते करि चर्चा तो हांसरी !

डोक्यास पांढऱ्या सदा ' कलप ' चोळितो
कुळकुळीत केसांचा नी वांकडा भांग पाडितो !

वाढत्या मिशांना तशी चाट देउनी
गालांस मर्दितो ' स्नो ' नें वर ' पावडर ' ती फासुनी !

पोषाख घडीचे तसे बदलतो किती
गणती न तयाला कांहीं, फिरण्यास निघे हा कधी !

चालती देवळांमधे पुराणें, कथा
हा बगळा तेथें जाई सद्धेतूनें ना कदा !

धार्मीक ग्रंथ ते घरीं पडति धूळित
' नाटकें-मासिकें-माला ' वाचतो हंसत खेळत !

मिष्टान्न गोड खावया रोज नवनवें
डोहाळे त्याला होती जें दिसेल तें तें हवें !

राबती घरांतुनि किती गडी माणसें
हा दोष काढुनी त्यांना बोलतो मुखीं ये जसें !

समजतो स्वतःला शिष्ट आजोबा कुणी
' उपदेश-डोस ' तरुणांना पाजतो बळें हा मुनी !

होतांच रात्र ती तया अचुक फावतें
बाहेर घराच्या त्याचें मन खुशाल तें रंगतें !

ग्रं. क्र. २६२८ काव्य २५।९ ग्रंथ : शाखा

तो नाट्य-सिनेमा सदा बघत हिंडतो
कधिंकधिं वेष बदलूनी ना तमाशाहि सोडितो !

धन आजवरी मिळविलें करुनि नोकरी
उधळून सर्व तें आतां ' मुंबई जिवाची करी ' !

नुकतीच बायको जरी जाय सोडुनी
सारखी वृत्तपत्रीं ध्या जाहिरात ही वाचुनी !

' पाहिजे वधू ' सुंदरी, सुशिक्षित खरी
अट जात, वयाची नाहीं-(चालेल पोर पर्करी !)

जमतें न लग्न तो तरी व्यर्थ हिंडतो
जी दिसेल स्त्री तिजला तो बारकाइने पाहतो !

तो पुनर्विवाहाप्रती सज्ज होतसे
' होईन सुधारक मोठा ' ! बोलतो ऐटिनें असें !

जमवून कुठें द्या अतां तयाचें तुम्ही
तो येड हातघाईला वा करिल जिवा कांहिंही !

मरतांच असा तो वृथा भूत होइल
अन् बसून मानगुटीला कोणास तरी घेरिल !

❀ ❀

## कुणी गुणी नट

कुणी गुणी नट नाट्यें लिहितो
अनंत दुःखें विसरायाला
मद्य घेत निज जीवन जगतो
व्यसन नव्हे तें औषध ठरवी !

वदे विनोदें-' मृत्यूनंतर
ओढा काडी प्रेत जळेल
खर्च नको मज जाळायास्तव
तनूंत भिनले मादक-द्रव्य ! '

❀ ❀

## कोण हे आई ?

( श्री. आनंदराव टेकाडे यांची ' कोण हे आई ' ही कविता ज्यांनी वाचली असेल त्यांना ह्या कवितेंतील रहस्य अधिक कळून येईल. )

कण्हत कुंथत किति मंद चालतात
मुखावाटे झणि शब्द नुमटतात
मान वगळी लुकलुके सर्वदाही
सांग मजला हे कोण तरी आई ?

सदा वदनी औदास्य पसरलेलें
सोंग रोग्याचें काय हेंच आलें ?
रडे केव्हां वा विव्हळे कधींही
सांग मजला हे कोण तरी आई ?

केंस डोक्याचे शुभ्र एकजात
तोंड तैसें बोळकें नसुनि दांत !
पडुनि खांचा डोळयांस दिसत नाही
सांग मजला हे कोण तरी आई ?

पान पिकलेलें खरोखरी भासे
कळत नाही कधिं गळुनि पडायाचें
बघुनि जो तो हांसून हयांस घेई
सांग मजला हे कोण तरी आई ?

जरी साठी उलटून पार जाई
तरि न त्याचें मानून मुळीं कांहीं
झोंक तरुणाचा काय म्हणुनि दावी
सांग मजला हे कोण तरी आई ?

घरिं न कोणी स्वैंपाक करायाला
त्रास म्हणुनी देण्यास आपणांला
अगांतुक हा पाहुणा काय येई ?
सांग मजला हे कोण तरी आई ?

झोंप जेव्हां लागे न ती अम्हांला
म्हणत होतिस ना ' पहा बुवा आला ! '
तुझ्या हांके कां दैत्य तोच येई
सांग मजला हे कोण तरी आई ?

शब्द ऐसे ऐकून बालिकेचे
दीन मातेला बोलवे न वाचें !
जवळ ओढुनि तिज सुचवि मस्करीनें—
" तुला येती वरण्यांस हे खुषीनें ! "

❀ ❀

## नवा प्रघात

नको दर्पण हातच्या कंकणाला
निवेदन तें मग कवीचें कशाला ?
व्यर्थ कोणाचा हवा उपोद्घात
नवा कोणी कवि पाडतो प्रघात !

सचोटीनें कवि देइ ती कसोटी
करा टीका, तारीफ खरी, खोटी !

( प्रत्येक नवकवि कांहीतरी ' नवा प्रघात ' पाडण्याची धडपड करीत असतो. करो बिचारा ! पण त्याचे बीज कितपत रुजेल हें प्रत्यक्ष काळच ठरविणार नाही कां ? )

❀ ❀

## पत्नी-प्रेम-विहार

पत्नीच्या हृदयीं कसें वसतसे सत्प्रेम अव्याहत ?
त्याचें गूढ कुठें, कशांत भरलें, नाहीं मुळीं माहित !
नेत्रां तें न दिसे सदैव म्हणुनी कां आंधळें भासतें !
वेडें वा म्हणतांच कां उल्ट तें वेडावुनी टाकतें ?

'कामाला मजला उठीव सखये ! मोठया पहांटे तरी'
जेव्हां मी तिज सांगुनी पहुडतों रात्री सुशय्येवरीं !
साडेपांचहि वाजतात न कुठें बोले प्रिया स्पर्शुनी–
'नाथा ! झोप पुरे, चहा पिउनि हा, घ्या स्नान आटोपुनी' !

पोरांचे करण्यांत कौतुक तसें पत्नींसवें गुंजन
जाते लोटुनि ती सकाळ सगळी कामें तशी राहुन !
जेवाया मज घालुनी मग विडा देऊन ती बोलते–
'जा जा लौकर ऑफिसांत, तुमचें ना लक्ष गुंतो इथे' !

कामाच्या अगदीं ढिगांत बुडुनी जातां कचेरींत मी
सुट्टी होउनि स्वगृहीं परततां दारांत कांता उभी !
बोले–'वाट बघून मीच थकलें आतां करूं जेवण,
आहे सुंदरशी हवा वितरली येऊं चला हिंडुन' !

स्फूर्ती दाटुनि जेधवां लिहित मी एकांतिं काव्यें-कथा
येतें झोप कुठून ? रात्र नकळे होते कितीशी तदा !
अर्धी रात्र सरे; म्हणे 'अजुनि हा कां नाद नाहीं पुरें ?
घ्या ना झोंप अतां तुम्हांस्तव किती जागून काढूं बरें ?'

घेऊनी श्रम, काळजी मम करी दासी न ती, स्वामिनी
देई सौख्य मला अलौकिक खरें संसारयात्रेंतुनी !
प्रेमें मद्हृदयामधील अखिल प्रेमा तिनें जिंकलें
देवा ! प्रेम असें जगीं मिळत ना कोठें जरी धुंडलें ! !

(केशवकुमारांच्या 'आजीच्या घड्याळावर' हा 'पत्नी-प्रेम-विहार' तर चालला नाही ना ? )

❀ ❀

## वधू संशोधन

मित्रः— तुज गड्या आवडे कोण सुंदरी फार ?
श्रीमंत कुमारी बाप जिचा सरदार !

कविवरः— छे ! जरी थोर ती तिला धनाची हांव
हटवादी वेडी करूं घेउनी काय ?

मित्रः— मग कॉलेजांतिल हवी तुला कां तरुणी
कां सुंदर विधवा सांग गुलाबी राणी ?

कविवरः— छे ! नको पोर ती शिकणारी अभिमानी
अन् मुळीं नावडे दुसरी ' सद्गुण-खाणी ' !

मित्रः— मग मराठमोळी हवी तुला कां साधी
कां जनानखान्यांतली बिबी एखादी ?

कविवरः— छे ! खेडवळीला वळें वरावें कोणी ?
मज स्वैच्छाचारी खाष्ट नको ती रमणी !

मित्रः— मग गड्या ! तुला रे नको वधू का कोणी ?
कविवरः— ' दे गाणारी मज कवियित्री आणोनी ' !!

( ' नाथा ! ' पाहुनियां ' स्वयंवर ' तुझें हें होइ ' संशोधन ' ! कवि — ' साधु कीं सैतान ' ? )

❀ ❀

## तुळशीचा लोभ

(एक स्पंदनिका व स्फोटनिका)

प्रिय पत्नी माझी सोडुनि मजला गेली
जणुं अंगणातली तुळस अकाली जळली !

पण अंगीं माझ्या शंभू नृप संचरला
अन् लोभ अन्य कां ' तुळशीचा ' मी धरला ?

❀ ❀

## मी नटी नाट्यांत गाजे

मी नटी नाट्यांत गाजे कां तुला ते नावडे
श्रेष्ठ माझ्या हया कलेचे का तुला रे वावडे ?
व्यर्थ घेसी कां कुशंका शील माझे भ्रष्टले
कां तुझा विश्वास बैसे भुंकती जे बापडे ?
छंद माझा नाटकी हा मी खुळी वेडावले
विस्मरे मी दुःख जेव्हा नाट्यरंगीं बागडे !

जी कला संपादली ती आजही जोपासली
वृक्ष त्याचा भव्य झाला छान ज्याचे रोपटे !
नांवलौकीका चढे मी मान त्याची धन्यता
मत्सरानें मारसी कां तू जिव्हारी कोरडे ?

राग दे सोडून सारा मी नटी झालें जरी
पातिव्रत्याचे पुराणी जाणते मी जोखडे !
शुद्ध ‘ सीतेसारखी ’ मी साजणा सांगू कसे
ही कला प्रेमांत आणी व्यर्थ वेडे वाकडे !!

❀ ❀

## प्रयोग पहिला हो शेवटला !

नवखा कोणी नाटककार — अळेंबळें त्यां स्फुरले नाटक
नव कविची अन् पदें, तया दे — भिकार चाली, भुरटा गायक !
गायन वर्गामधील एका — पास ‘ विशारद ’ कुठें न झाली
जिच्या विवाहा वर्ष लोटले — गाणारी तिज नटी बनविली !

कसाबसा हो प्रयोग पहिला — दुसरा व्हाया गाडे अडले
गर्भवती नव नटी राहिली — नऊ मास तिज लोटुन गेले !
हौशी संस्थेचे ते नाटक — प्रेक्षक फुकटे, प्राप्ती थोडी
प्रयोग पहिला हो शेवटला — खर्चानें जो पुरा गाडला !

❀ ❀

# हा गायक आणि तो कवि

हा गायक गातो सुस्वर अन् शास्त्रोक्त
आवाज पहाडी मुळात ह्याचा गोड
टाकील दणाणुन मैफल संगीताची
करमणूक होइल श्रोते जमले त्यांची !

बैठकीत गाणे जेव्हा ह्याचे होते
नाखूष बसाया समोर कां पण श्रोते ?
हा दुर्दैवाने चकणा दो डोळ्यांनी
विद्रूप चेहरा कां न बघावा त्यांनी ?

तो कवि तसाही कुणी छापखान्यात
जुळवितो खिळे, कधि प्रुफे तपासुनि देत
लाभतो तयाला पगार अगदी थोडा
गरिबीनें दिसतो उदास, भोळा, वेडा !

जरि दिसावयाला उदास भोळा, वेडा
दावितो रचूनी काव्य कधी तो फर्डा !
पण सभेंत ' कविता-गायन ' करतो जेव्हा
कां घेति न ऐकू लोक तयाचे तेव्हा !

❀ ❀

## पहिली केस

अर्थात्

**Maternity Starts at Home !**

चार वर्षांचा ' कोर्स ' असूनीया
दहा वर्षें लागलीं पास व्हाया !
शहर वस्तीचें प्रमुख जिथें ठाणें
' दवाखाना ' थाटला ' डॉक्टरानें ' !

दवाखान्याला जोडुनी तसेंच
स्थान देई तो प्रसूती–गृहास !
परीचारक ठेविला नोकरीला
नर्स तैशी मिळण्यास योग आला !

कैक महिन्यांचा काल सरुनि गेला
कुणि न रोगी ढुंकला औषधाला !
' प्रसूतीला ' लाभली स्त्री न कांहीं
मात्र दैना उडवून खर्च देई !

सर्व पैसा जवळचा सरुनि जाई
लग्न त्याचें जाहलें त्यांत नाहीं !
बहर आतां संपेल यौवनाचा
ध्यास म्हणुनी अंतरीं विवाहाचा !

नर्स सुंदर जी त्यांस लाभलेली
( बहिण होती जरि प्रथम मानलेली )
हाय ! केलें तिजवरी प्रेम त्यानें
नाहिं झाला पण बद्ध विवाहानें !

प्रेम–चाळे जरि असे चालवीले
बिंग त्याचें शेवटीं फुटुनि गेलें !
दिवस जातां लोटून ( तिला ) कांहीं
‘ केस ’ पहिली प्रसुतीस घरीं येई !

❀ ❀

## नव कवीचा लिंग-भेद

‘ ना धिन् धिन्ना, ना धिन् धिन्ना    ना तिन् तिन्ना ना तिन् तिन्ना ’
तबल्याचे हे बोल बडविता    नव कवि तालात् रचतो कविता !

बालांसाठी ‘ कविता-वाचन ’    कार्यक्रम हो, त्या नव कविचा
प्रथम ग्रासे बाळ कुणी पण–    ‘नांव’ कवीला ‘ घ्या हो ’ वदला !

नव कवि तेंव्हां मनीं शरमला    धाडस करुनी अखेर वदला–
‘ कुंदा मैंदर्गीकर ’ सुंदर    नांव असे मम प्रिय बाळांनो !’

प्रेक्षक पोरे गर्जुन उठली–    ‘ नांव झूट कां केले धारण ?
‘ कुंदा ’ स्त्रीचे नांव असून    पुरुष तुम्ही हो स्त्री कां बनला ?’!

नव कवि झाला पुरता सर्द    हात कपाळा लावुन बोले–
‘ नांव खरे मम असे ‘ मुकुंदा ’    करा न त्याचा चेंदामेंदा !’

गाजे ‘ गोदीचा गोविंदा ’    उलट ‘ मुकुंदा ’ बनला ‘ कुंदा’!
मुलें गर्जली–‘ उठा पळा रे    लिंग-भेद कवि करून मिरवी !’

❀ ❀

**पाय घसरला म्हणून**– (घराबाहेर, साष्टांग नमस्कार !)

काव्यगायन करण्यास परिषदेंत
कवी कोणी जाहला निमंत्रीत !
गळा सुस्वर नव्हताच जरी त्याला
नांव होण्या तो हपापून गेला !

निघायाची तो चालवी तयारी
नटायाची त्याजला हौस भारी !
स्वरुप सुंदर लाभे न मुळीं कांहीं
म्हणुनि दैवा तो दोष मनीं देई !

कृष्णवदनाचा रंग झांकण्याला
तयें लावियला दिखाऊ 'मसाला'
केंस उलटें फिरवून भांग काढी
साफ त्यांतुनि घोटली आज दाढी !

परिट घडिचा पोषाख उंच भारी
सजे घालुनि शाहीर तो पुणेरी !
बूट पायीं चढवूनिया नवीन
विडी फुंकित तो निघे घरांतून !

घराबाहिर पाऊल ठेविलें न
तोंच मार्गी मार्जार ये दिसून !
चिडुनि त्याला तो कांहिं मारणार
घडुनि आला पण एक चमत्कार !

'बाड' हातांतिल जों न उगारीलें
तोंच मांजर त्याजला आड गेलें !
अशुभ घडतां, थांबून तो न गेला
म्हणुनि त्याच्या ये काय प्रचीतीला ?

मांजरानें बैसून ' कळस ' केला
त्याच जागेला घोर घात झाला !
पाय कविचा घसरून तेथ पार
त्यास घडला साष्टांग नमस्कार ! !

( अनुष्टुप् )

सत्य ही गोष्ट शाहीरा ! असे ना अर्थ त्या जरी
मुलांना रेडियोंतूनी नको ती ऐकवूं परी !

❀ ❀

## नवोदित कवीची प्रेमसखी आणि तिचा शोध !

' लिहून झाल्या हजार कविता छापुन त्यांतिल कुठें न येती
साप्ताहिक अन् अल्प मासिकें ख्यात कवींना देति प्रसिद्धी !

कवी नवोदित मी धडपडतो अजुन कवी मज कुणी न गणतो
प्रेमसखीवर अनंत कविता धूळ खात त्या कुजून पडल्या ! '

प्रेमसखी ही कोण कवीची कुणां कधीं ना दिसावयाची
गुप्तचरांनो ! श्वा पथकानें शोध तिचा घ्या खास त्वरेनें !

शोध

प्रेमसखीचें चित्र, काव्य तें दिपवाळी अंकात पहा
दिसून कोठें आलें नाही, मनांत मोजा अंक दहा !

❀ ❀

## परदेश गमन

परदेश गमन तें करुन कुणी
परतले कलांचे पथक गुणी !

कार्यक्रम भारत-संस्कृतिचा
दर्शविण्याला विविध कलांचा
जमुनी ताफा गुणी जनांचा
तो विमान मार्गें जाइ क्षणीं !

गायक, नर्तक, नटी तसे नट
स्त्री पुरुषांचा अवाढव्य गट
अनेक वादनकारां सकट
पोंचला निमंत्रित त्या स्थानीं !

नाटक, गायन, नर्तन फुलले
सुस्वर वादन-प्रकार झडले
परदेशी अन् सुजन तेथले
रंगून जाहले मुदित मनीं !

सुजन तेथले कोणी धार्मिक
आग्रह करुनी वदले मार्मिक
'प्रकार-कीर्तन दावुन रंजक
जा परत, अम्हाला करुन ऋणी !'

प्रश्न पडे पण त्या पथकाला
बावरुनी मनिं जो तो गेला
डॉक्टर गायक नट पण वदला–
'तें दिव्य दावितो मी करुनी !'

धोतर, वस्त्रें आणिक पगडी
तेथिल सुजनांकडुन तेवढी
जमवुन केली छातीं निधडी
अन् कीर्तन करण्या हो सजुनी !

पेटीवाला सुसज्ज केला
तबलावादक घे साथीला
खराच कीर्तनकारहि बनला
शुभ कीर्तन दात्री रंगवुनी !

कीर्तन सरतां होइ आरती
तबकीं नोटा अनंत पडती
इच्छेहुन हो अपार प्राप्ती
मनिं 'कीर्तन-बाबा' सुखावुनी !

करुन आरती त्यानें गोळा
तबलावादक, पेटीवाला
घेउन त्यानें 'बार' गांठला
'शाम्पेन' झोंकली, धन लुटुनी !

❀ ❀

## भाविक आणि तीन ठक

गिरीकंदरीं शिव देवालय, त्या एकांत ठिकाणीं
मनांस शांती लाभायास्तव भाविक जाई कोणी !
हाय ! तिथे त्यां नको नकोसें केले तीन ठकांनी
दीन भिकारी, मर्कट, लोचट पंडये ह्या प्राण्यांनी !

❀ ❀

## फराळाचा डबा

डबा फराळाचा माझा कसा आज गेला
कचेरीमधूनी देवा ! कुणी सांग नेला ?

उशिर फार झाला म्हणुनी जेवतां न कांही
डबा फराळाचा मी तो कचेरीत नेई
रोज ठेवितो त्या जागीं ठेवुनीच देई
कोण चोर येउनि त्याला दृष्टि-आड केला ?

त्यांत मकर-संक्रांतीचा सुदिन तो असून
गोड धोड पक्वान्नें ती प्रिया दे करून !
डबा नाहिसा पण होतां, उपाशी बसून
कडक त्या भुकेनें माझा विकल जीव झाला !

डबा छान पितळेचा तो जणूं आज सोने
बोहऱ्यांस देउनि 'लुगडे' घेतला सखीनें
'हरवला !' तिला हे सांगू कोणत्या मुखानें ?
रागवून माझ्यांवर ती धरिल ना अबोला ?

( माझा फराळाचा डबा 'कचेरीतील खास मुलींच्या खोलीत' कोणी एका खाष्ट मुलीनें माझी त्या दिवशी मुद्दाम जिरवण्यासाठीं नेला, असा उडता सुगावा लागल्यावर– )

मस्करी पुरे, सखयांनो ! डबा द्या आणून
गांठ ती असे माझ्याशीं मनीं द्या ठसून
एक दिवस ना तर मी तो 'कन्हय्या' बनून
डबे सर्व नेइन तुमचे करुनि थेट हल्ला !!

❀ ❀

## प्रेमाचा दीपस्तंभ

प्रेम तुझे नामी बंधुचे, जिवलग मित्राचे
हृदय खरे भासे पित्याचे, प्रियतम सजणाचे !

जिप्सी मी अबला सुशिक्षित रूपवती युवती
कळी जीवनाची अकेली फुलवित कीं होती !

ललित लेखनाची जिवांला लागे मज प्यास
नाट्य, नर्तनाच्या कलेची पुरवी मी हौस !

नांव कुठे होता अचानक परिचय तव झाला
स्नेह जसा वाढे तसा कीं जीव जिवां जडला !

माझीया सदनीं सदोदित भेटाया येशी
नित्य नव्या भेटी मला तूं प्रेमानें देशी !

डॉक्टरचा पेशा तुझा तो नांवाजुन चाले
प्रीतीचे तारूं आपुले सुखामधे डोले !

तुझ्या घरीं येण्या मला तव पत्नीची चोरी
तिच्या मनीं धुमसे कसा मम संशय खट भारी !

दोघांची हृदये तिनें ना पारखली पुरती
खंत जशी तुजला तशी मज ज्वलंत जळजळती !

दैवें तुज नेता सुखाचा सागर ओसरला
दीपस्तंभ कुठें अतां मम जीवन-नौकेला ?

❀ ❀

## तूं भाई आणि मी ताई

तूं भाई रे अन् मी ताई
तें नुरे अतां नातें कांही !

कॉलेजांतिल रम्य जीवनीं
ओळख अपुली येतां घडुनी
चंद्रकलेसम स्नेह–वाहिनी
उसळून जणूं दुथडी वाही !

साहित्याची, वक्तृत्वाची
सुंदर दिलचस्पी दोघांची
न कळत जमवी जोडी खाशी
संयोग समसमां कीं होई !

आपण अपुले ध्येय आंखले
लिहून पत्रें गुज सांगितले
परस्परांचे प्रेमहि जुळले
पण धोका आँ वासुन खाई !

उच्च घराणी कुलीन अपुली
जातकुळी त्यां अडसर घाली
विवाह व्हाया बाधक ठरली
कां बंधन ये प्रीतीपायी ?

नियती त्यांतुन हो निष्ठूर
तुजपासुन मज केले दूर
जिवांस जडलेली हुरहूर
दोघांस छळी ठायीं ठायीं !

'बहिण तुझी मी, तूं मम भाऊ
उरले जीवन मुकाट साहूं'
जरी ठरविले असे दिखावू
कां निजांतरीं लाही लाही !

कलावंत बघ सखा आपुला
प्रेमविवाहें सुखी जहाला
करुनि साजरा तसा सोहळा
देउं या झुगारुन रूढी ही !

नवी पिढी तुज मज वानील
पत्रें अपुली कुणि छापील
वाचुन युव युवती वदतील—
‘ प्रीतिचा मार्ग हा सुखदायी ! ’

❀ ❀

## गंगेत घोडे न्हाले

घोडे माझे म्हाताऱ्याचे गंगेमध्ये अखेर न्हाले
मारुन मुटकुन रेस जिंकली कुणी वानिले, कुणी निंदिले !
त्रय घोडयांची शर्यत नामी
जुना पुराणा पहिला हुकुमी
झुंजे दुसरा नव हरकामी
गनिमी कावा लढवुन खासा, तिसरे घोडे मी दामटले
टांग तयाची और ठरूनी, विजयी झाले ! कृतार्थ झाले !
घोडे माझे म्हाताऱ्याचे गंगेमध्ये अखेर न्हाले !

❀ ❀

# हें चित्र पहा

( ह्या दोन सुनीतांतील कल्पना माझ्या एका 'सुतकाळ' कारकून मित्रांस एकाचवेळीं सुचलेल्या आहेत. मात्र त्याला कविता 'होत' नसल्यामुळें त्यानें हें काम 'अंमळ' माझ्यावर सोंपविलें. अर्थात् तें माझ्या हातून कितपत पार पडलें हें खुद्द रसिकांनींच ठरवावें. )

## –१– कवि आणि वस्ताद !

गर्जे ठोकुनि दंड कोण कविला वस्ताद जाडाजुडा–
" माझें साम्य तुझ्यामधें दिसतसे हा व्यर्थ नाहीं लढा !
आखाड्यांत पडूनि नित्य असतो व्यायाम घेण्यास्तव
तूंही ना कवि-मंडळांत रुळशीं काव्यें करायास्तव ?

होतों खाउनि लठ्ठ मी निशिदिनीं खर्जूर अन् खोबरें
घेऊनी परकल्पना नविन त्या तूं श्रेष्ठ होशी बरें ?
कुस्त्या मारुनि मी सदैव मिळवी फेटें तसें कंकण
तूंही मासिक-पुस्तकांत इतरां हाणून घेशी धन !

घेतो हे मम कान मी चढवुनी ऐटींत चालावया
घेशी वाढवुनीच मान अपुला गर्वांत मिरवाविया !
चेले मी करितों तयार, बनुनी त्यांचा गुरू सज्जन ( ! )
तूंही ना प्रसवावयास झटशी चेले गुरू होउन ! "

× × ×

" वस्तादा ! सगळें खरें, कवि वदे, तुझ्यापरी रे कुणी—
खांद्याच्यावरुनी जिवंत मजला मिरवी न रस्त्यांतुनी !! "

आणि—

※ ※

विनोद लहरी

## तें चित्र पहा

### –२– कवि आणि मर्कट

बोले खाउनि दांत सर्व कविला गर्वें कुणी मर्कट
" माझें साम्य तुझ्यामधें प्रकटनें, हें व्यर्थ ना तर्कट !
दोघेही दिसण्यांत एक अगदीं ! आश्चर्य कोठें न कीं
आम्हांपासुनि जाहलीच तुमची उत्पत्ति साऱ्या जगीं !

उद्यानीं फिरतां फळें खुडुनिया पोटामधें घालतो
तूंही चोरुनि शब्दवैभव तसें काव्यामधें कोंबतो !
आहे पुच्छ म्हणून मी करितसे उड्डाण चोंहीकडे
कीर्ती–पुच्छ मिळूनि ना मिरविशी प्रौढी जनांच्यामधें ?

वांकोल्या मज दावितांच चिडतो अत्यंत रागावुनी
टीका हो तुझियावरी तर कसा जातोस फेंदारुनी ?
झालें कांहिंतरी विषाद न मुळी त्याचा कधीं मानतां
' माझें लाल नितंब ' – तत्व अपुलें वारूनि नेई व्यथा " !

× × ×

" दोस्ता ! हें सगळें खरें, कवि वदे, मी ना सुखी जन्मुनी
शेंगा खाउनि टर्फलें मजपुढें फेकी न कांही कुणी ! "

❀ ❀

### कविता वाचनाची वेळ

नव्या कवींचा जमवुन ताफा
कविता वाचन जाहिर व्हाया
सभापती जो हवा नेमका
जागा त्यांतुनि कशि ठरवावी
पहाट फसली, सकाळ नडली
कवितावाचन उरकायाला

सौजन्याचा धेंड गांठला
घोडा अमुचा अडून बसला !
त्याचा अमुचा दिवस जमेना
वेळेचा अन् सवाल फुसका !
दुपार, संध्या, रात्र बिनसली
योग्य वेळ ना कधीं गवसली !

## नाट्य निर्मात्याचा अजब विक्रम

( कवि–कल्पनेतील या नाट्य निर्मात्याचा विक्रम मुंबईत धडपड करणाऱ्या सर्व नाट्य निर्मात्यांना स्फूर्तिदायक ठरो, हीच कवीची इच्छा ! )

विक्रम करण्याचा कीं आतां काळ खरोखर आला
दुनिया जाते झुकून तेव्हां हवा झुकानेवाला !

आठवडाभर सायकल फिरवी रात्रंदिन कुणि दर्दी
पहावयाला विक्रम त्याचा अलोट जमते गर्दी !

कुणी चालतो पायी साधू संतत गावोगांवी
मिळून जाते सहज तयाला ' पदयात्री ' ही पदवी !

थोड्या तासामध्येंच कोणी खाडी पोहुन जातो
शर्यतींत कुणि मोटारीच्या नंबर मारुन घेतो !

कांहि न खातां कैक दिवसही उपास वेडा करतो
जेवण झाल्यांवर जिलब्यांची चवड अधाशी खातो !

सोलो तबला संतत बडवी तैसा कुणि पखवाज
दमछाकी ना त्याची होतां बनतो खास नवाज !

ललित बुकें चौतीस स्वतःची काढी कुणि वर्षांत
अनेक मल्लांवरती करतो भारी पठ्ठा मात !

कितीक हौशी काव्य-कथांची स्पर्धा जाहिर करती
लुटावया तें इनाम लेखक, कवी तुटूनी पडती !

खेळामध्यें, गाण्यामध्यें, वाद्यें वाजविण्यांत
जेथें तेथें स्पर्धा चाले, प्रवीण बनतो ख्यात !

नाटक निर्माते धडपडती व्हाया विक्रम वीर
चढाओढ ती करावयाला झाले काय अधीर ?

' शिवसंभव ' तें नाटक कोणी शिवनेरीला दावी
शनिवार वाड्यामध्येंच दुसरा प्रयोग ' स्वामी ' लावी !

बोटीवरती ' अपराध्याचें ' नाटक करितो चौकी
नाताळाला मध्यरात्रिला नाटक दुसरा ठोकी !

अखंड दिनभर नाट्यगृह तें गुंतवुनीया पार
तीन्ही प्रहरीं तीन नाटके करी कुणी झुंजार !

आजवरी जें कुणी न केले त्यावर करण्या ताण
धनाढ्य मोठा सज्ज जहाला निर्माता निर्माण !

प्रसिद्ध नाटककारां देउन भारी रक्कम रोख
लिहून त्याच्याकडून घेई नवीन नाटक चोख !

नांवाजुन जे नटवर गेले नट्या तशा गुलजार
पैसे मौजी त्यांस अगोदर करून गोड करार !

बसवायाला नाटक योजी दिग्दर्शकही बांका
सुरू जहाल्या खास तालमी कुणी न देतां धोका !

तऱ्हेतऱ्हेचे अफाट मोठे फ्लॅट सीनही केले
लाखावरती कितीक पैसे खर्च होउनी गेले !

डरला नाही वीर धुरंधर, नव्हता तो डरपोक
तयार होतां नाटक, योजी विक्रम नव बिन्धोक !

नाट्यगृहांला नव नाट्याचे एका दिवसामध्ये
प्रयोग जाहिर केले त्यानें लागोपाठ सहा ते !

तीन तासांचा प्रयोग नंतर विश्रांती तासाची
चोविस तासामधे सहा ते प्रयोग रात्रंदिवशीं !

मुंबईतल्या अनेक पत्रीं जाहिरात हो दणकी
नाट्यप्रेक्षकां भरून गेली आश्चर्याची धडकी !

थिएटर ठरले, दिवसहि ठरला, ठरून गेल्या वेळा
तिकीट विक्री सुरू जहाली धूमधडाका उडला !

सकाळ–दुपारच्या खेळांची ती तिकिटें संपुन गेली
रात्रीं गाड्या नाहित म्हणुनी शिल्लक थोडी उरली !

आसपासचे रहिवासी जे होते थिएटरजवळी
रात्रीच्या खेळांची घेती तिकिटें उरली सुरली !

खेळ सहा ते तुडुंब भरले तिकिटें बंद जहाली
' हाऊस फुल्ल ' चें बोर्ड झळकुनी गर्दी पांगुन गेली !

प्रयोग सगळे सुंदर ठरले जो तो वेडा बनला
निर्मात्याचा विक्रम अजुनी कुणी न मोडूं शकला !

❀ ❀

## दुधाचा प्रभाव

वाघिणीचे तें पिउनि दिव्य दूध
शूर होती कुणि थोर देशभक्त
दूध गाईचे मिळुनि बालकांना
छान येते बाळसे मात्र त्यांना !

दूध शेळीचे पिउनि गांधिजींनीं
प्रकृती निज ठेविली ठीक त्यांनी
दूध गद्रीचे घेऊन कुणी रोगी
बरे होती ! कल्पून तें दवा कीं !

कवी सांप्रतचा अभागी, गरीब
दुधाचा तो कसला न त्यां रतीब
दूध महिषीचे मिळे चहामाजी
प्रभावें त्या ' नव काव्य ' जनां पाजी !!

❀ ❀

# कोण स्वार हा ?

‘ हाँ हाँ ! हो हो ! ’ वदत स्वरानें
रस्तोरस्ती मारी फेऱ्या
सकाळपासुन दिवस सरे तों
कोण स्वार हा बेदरकार ?

ऊन असो वा थंडी, पाउस
आज इथें जर, उद्या तिथें तर
क्षणभर कसली ना विश्रांती
उपसे तो अडगळीचा डोंगर !

समशेरीसम छडी करांत
कुदळ, फावडे, गोण, घमेली
गर्दभसेना अपूर्व त्याची
सर्व हत्यारे सेनापतिची !

दगड, विटा नी माती, कचरा
उचलुनि टाकिल, आणुन घालिल
नको कुणाला हवा कुणाला
वहातुक धंदा दो बाजूंचा !

कष्टाळू अन् सोशिक भारी
हलक्या कानाचे जन त्याला
गर्दभ त्याचा कडवा प्राणी
‘ लंबकर्ण ’ पण वदुन निंदती !

ओझ्याखालीं मरे विचारा
वदती ‘ गोंधळ हा बहु घाली
गद्धेजन पण पंचविशीतिल
सुकाळ त्याने हो लाथांचा ’ !

निवडणुकीच्या धामधुमीत
अडकवुनी ती गळथांत त्याच्या
‘ मलाच मत द्या ’ लिहून पाटी
स्वैर सोडती गुंड तयाला !

कॉलेजातिल गॅदरिंगला
सेनापतिला मिळून संधी
‘ गर्दभ शर्यत ’ खूप मजेची
सैन्य देइ त्यां पैसा, कीर्ती !

सेनापतिची सुगरण पत्नी
‘ घ्या गद्धी के दूध ’ विकूनी
हात देउनी प्राणसख्याला
गद्धी मिरवित फिरे बिचारी !

औषधीक तें दूध खरोखर
नव कवि त्याचा एकच प्याला
पौष्टिक आणिक स्फूर्तीदायक
घेतां, कविता अमाप स्फुरला !

❀ ❀

# मी आणि माझी प्रिया

दार घराचे सताड अगदीं उघडे टाकुन कसे
प्रिया ती नजरेला ना दिसे !

कामावरुनी थकून आलो, कशी न ये धांवत
कराया माझे सुस्वागत !
फिरवून पाठ ती प्रिया खडी सुंदरी
कोपऱ्यांत राही मूक बाहुलीपरी
कां रुसली मैना, लक्ष न राघूवरी

चोरासम मी हळूंच जाउन नेत्र तिचे झांकले
फूल अन् वेणीतिल हुंगले !

" इश्श मेलं ! सोडा, सोडा, तुम्हां जाणले पुरे
कुणी नां बघेल अपणां बरें ? "

हात काढुनी डोळ्यावरचे, कुडया हिऱ्याच्या दिल्या
' अय्या ' वदे, ' कधीं आणिल्या ? '

कळि खुलुन तियेची, नाचे आनंदुनी
सोडी न मिठी, मज चुंबुन, आलिंगुनी
' चल सोड, वाजवी दारीं घंटा कुणी '

कुडया घालुनी वदे, ' घेतले लावुन कानां खडे
येउ द्या, कुणीहि आतां गडे ! '

❀ ❀

## मास्तर आणि मुलें

वेडा तो दिसला सुशिक्षित कुणी बेकार होऊनिया
वर्षे कैकहि जाहलीं तरि मिळे ना कामधंदा तया !
छोटया त्या शहरामधें रखडुनी तो आक्रमी जीवित
गांवातील मुलें उनाड सगळीं होती मजा मारित !

दंगेखोर मुलें जमूनि वदलीं वेडयांस तीं एकदां–
' वेडा माणुस तूं ! अरे न अगदीं कांहीं तुझा फायदा ' !
रागावून तयांस तोच वदला–' कां ही मला टोंचणी ?
सारा द्वाडपणा तुम्हांस तुमचा जाचेल मोठेपणीं ' !

वेडयाच्या परि अंतरात भिनले ते शब्द वीषासम
रात्रंदीस उपास त्यात घडुनी तो जाहला निष्प्रभ !
पोरांच्या मनि–मानसीं न ठसलें तें वेडयाचें वच
त्यांचा द्वाडपणा थरास भिडुनी थांबे न तो कांहिंच !

गांवीं त्याच तदा धनाढय न कळे येई कुठूनी कुणी
पोरें तेथ बघून, छान सुचली युक्ती तयाच्या मनीं !
पैसा खर्चुनिया इमारत तयें शाळेप्रती बांधली
वेडा मास्तर तो तिथें कशितरी त्या नोकरी लागली !

आपोआप तिथें कुणी ' मिशनरी ' येई प्रचारास्तव
शाळा ती बघताच त्यास फुटला आनंददायी द्रव !
गांवांतील मुलें तयें भुलवुनी शाळेमधें आणली
हर्षा पावुनि तीं कधीं न चुकतां येऊं तिथें लागलीं !

शाळा ती नयनां अतां दिसतसे गांवात उत्कर्षत
वेडा मास्तर तो, मुलांवर ठरे आचार्य नामांकित !

( केशवकुमारांची ' फत्तर आणि फुलें ' पाहून त्यांवर ह्या ' मास्तर आणि मुलें ' ह्यांनी हल्ला तर केला नाहीं नां ? )

❀ ❀

## भविष्य माझें सांगायाला--

भविष्य माझें सांगायाला जोशी कुणि भेटला
कुडमुडा जोशी कुणि भेटला !

" हें दैव शिकंदर तुमचें सर्वांहुन
येतील लौकरी सोन्याचे ते दिन
होईल मुलाचा लाभ बरें त्यांतुन !
नोकरींत ती होऊन वढती मिळेल पैसा भला ! "
—असे तो जोशी मज बोलला !

हांसलों मनाशी त्याचें वच ऐकुनी
अन् शांतपणानें वदलों त्यालागुनी--
" समजलास जोशी ! काय मला रे मनीं ?
पोटासाटीं बकबक वेडया ! चालविली जरि किती
व्हायची निष्फळ ती शेवटीं !

मी भाग्यवान तो प्राणी नाही बरें
बेकार होउनी रस्तोरस्ती फिरे
मज पोटासाठीं मिळत न कांहीं पुरें
प्लेगामध्यें नुकती गेली प्रिया मला सोडुनी
व्हायचा मुलगा मग कोठुनी ? "

हें उत्तर माझें सडेतोड ऐकुन
तत्काळ मनीं तो सर्द पुरा होउन
अन् तोंडामध्यें घे अपुल्या मारुन
" क्षमा करा मज "—बोलुनि कोठें दृष्टिआड जाहला
गमे त्या—" ठकास ठक भेटला ! "

❀ ❀

# पुराणिक बुवा !

मंदिर गांठुन चौरंगावर पुराण हा सांगतो
रोज रोज मग थवा स्त्रियांचा हळूहळू वाढतो !

स्कंध महाभारतामधिल ते संस्कृतांत वाचतो
स्पष्टपणें प्राकृतात त्यांवर टीकामृत पाजतो !

निवेदतांना प्रणयरसाच्या कथा स्वता रंगतो
पिकल्या पानामधील हिरवा रंग जणूं दावितो !

मधेंच येतां मात्र खोकला चष्मा संभाळतो
नवीन सुंदर ‘ पात्रें ’ दिसतां अचूक त्यां हेरतो !

आजीबाईजवळ तियेची तपकिर हा ओढतो
शिंक देउनी निद्रित बाया ताळ्यावर आणतो !

कोरड पडतां कधीं घशाला खडिसाखर सेवितो
तांदुळ जमले कितीक पुढती ढगळ्यासम पाहतो !

दिवस संपतां करुनि समाप्ती पोथी गुंडाळतो
अल्प बिदागी दिसतां पुढती मनांत संतापतो !

समजुन ‘ चोराची ती लुंगी ’ खांकेला मारतो
‘ शिक्षापद्धति ’स शाप देउनी घराकडे चालतो !

घरास जातां शालजोडितुन अहेर कुणि अर्पितो–
“ पुराणांतली वांगी आम्ही पुराणांत ठेवितो ! ! ”

❀ ❀

## क्लबाकडील गोष्टी

(उनाडटप्पू लोकांचा हा 'नाट्यक्लब' सध्यां मोडकळीस आल्याकारणानें त्याचें पुनर्जीवन केव्हां होईल हे सांगणे कठीण आहे ! केशवसुत, तुम्ही मात्र क्षमा करा ! )

गोष्टी क्लबाकडिल मी वदतां गड्या रे
हासूं नकोस पण ऐकुन घेइं सारें !
वस्तू तुला सकल ज्या दिसतील तेथें
व्यक्तीपरी असति भूषण त्या क्लबातें !

ही देख पेठ 'बुधवार' पुण्यामधील
गर्दी अहर्निश जिथें असते कमाल !
'भांग्या' विदीत 'बजरंग' अहा तिथून
प्रख्यात बोळ दिसतो चल त्यामधून !

गल्लीमधून शिरतां वर डुंकशील
मोठा उजेड तुज रात्रिस तो दिसेल !
मित्रा ! हळूच जपुनी पद टाक तूं रे
मौजा पहा न कळतां रमणींचिया रे !

आवाज 'किर्र' रजनी जरि बोलताहे
'शुक् शुक्' असा ध्वनि इथे पण चालताहे !
माडीवरी बघ कुठें नव रंगढंग
गाण्यास त्यांतुनि चढे भलताच रंग !

हया सातआठ त्यजुनी पहिल्या घरांतें
माडीवरी 'क्लब' पुढें चल आत तेथें
माडीस हया बघ जिना झुलता, अरुंद
कीं चालतां करकरां करतो निनाद !

खोलीस दार बघ हें बुटकें, पुराणं
वांकून आंत हलके जपुनीच येणें !
खोलीमधे जरि दिवा जळतो विजेचा
वाऱ्याविना गुदमरे जिव माणसाचा !

मित्रा ! चहूंकडुन विस्कटली पथारी
ताटातली ' उडुनि ' पान तशी सुपारी !
पाऊस येथ पडला जळक्या विडयांचा
भिंतीस रंग चढला बघ लाल कैसा ?

वाद्यें मुकीं सकल तीं दिसती पडून
पेटया तशा पसरल्या कपडे कुजून !
तालीम चालुन इथें नव नाटकाची
' पात्रें ' दमून निजलीं सगळीं कल्बात्री !

निद्रिस्त घोरत पडे बघ जो विशाल
वेडा, विदूषक तया म्हणती टवाळ !
त्या मास्तरां कुठुन मी प्रिय शिष्य शोभे ?
लोकात तो जरि म्हणे मज शिष्य लाभे !

ह्या मास्तरांस बघुनी मज कींव येते
आहे चलाख पण कांहिं न चीज होतें !
नाटयें तशा पटकथा लिहितो सदैव
पैसा न कीर्ति पण देइ तयास दैव !

त्या मास्तरापलिकडे बघ लोळणारा
गोटया ! लहान मम बंधु सतेज ' तारा ' !
तो नृत्य-गान शिकुनीच तयार होतां
त्याच्यामुळें मजसि लाभ मिळेल मोठा !

गोटया ! गडयो ! नट खरा बनशील काय ?
तूं रंगभूमिवरतीं तगशील काय ?
गोटया ! जनांस तव गान रुचेल काय ?
' गंधर्व ' नांव तुज सांग मिळेल काय ?

चोरापरी हळुच टाकित पाय, पाय
मित्रा ! बघू पलिकडे दिसतेंच काय ?
खोलीस ह्या पण दुज्या न दिसे प्रवेश
आतील तें मग कळेल कसें विशेष ?

दाराचिया बघ फटींतुन हात जातो
आंतील काढुनि कडी हलकेंच घेतो !
ये ये पुढे भिउं नको अगदींच मित्रा
चावेल ना जरि दिसे तुज येथ कुत्रा !

मित्रा ! अचानक इथें मज ये शिसारी
येथें हवा नसुन वास भरे विकारी !
दुर्गंध नाहिं कधिं ' नागझरी 'स ऐसा
वाटेवरी ' मटन–मार्किट 'च्या न तैसा !

मित्रा ! असा हळुच डाविकडून येई
खोली इथें बघ प्रशस्त न त्याहुनी ही !
' पात्रें ' स्त्रिया अहह ! या स्थलिं झोंपतांना–
पाहून, हाय ! कणवा नच येइ कोणा ?

तो मोडका बघ पलंग तिथें निजे ती
' खड्कीकरीण विजली ' दिसण्यात साधी !
कन्या तिची जवळ ती अगदींच काळी
लाभे क्लबास बघ ' माल ' असा कपाळीं !

निद्रिस्त येथ दुसऱ्या बघ ह्या मुली तूं
कीं ' भावबंधन 'मधीलच इन्दु–बिन्दू !
ती कोण दूर रडते ?–निजली असूनी—
अश्रू कशास्तव तिच्या नयनीं गळूनी ?

भावी असे मम वधू बघ तीच नामी
( गोव्याहुनी तिजसि जाउनि आणिली मी ! )
' वेडे ! उगी; रडुं नको ! पुरवीन कोड
स्वर्गीय सौख्य तुज देइन गोड गोड ' !
मागील दार बघ हें इथुनीच जाऊं
' हॉटेल ' तें जवळ ' गोल्डन टी ' च घेऊं !
तेथें गड्या ' त्रिल ' हवें तुज द्यावयाला
जाऊं तुझ्या मग घरीं, लकडी पुलाला ! !

❀ ❀

## गुरु आणि शिष्य

कुणी गुणी नट, नाटककार
लेखक आणिक पेटीवादक
प्रवीण तैसा संगीतात
स्त्रीलंपट पण होता त्यात !

मनांत त्यानें निश्चय केला
अपुल्या जोगा शिष्य मिळावा
शोध शोधतां अखेर त्याला
गुणी पुरुष कुणि लाभुन गेला !

बोले गुरुजी मग शिष्याला
' माझे गुण तव येतिल अंगीं
कलेंत मजसम करुनी प्रगती
चालवुनी मम देशिल गादी !'

गुरुजीचा तो शिष्य विनोदी
वदे– ' तुम्हांसम सर्व कलेत
करीन प्रगती, परंतु तुमची
चालवितां नच येइल गादी !'

❀ ❀

## नापिकदादा !

खुंटावरती वडाखालती बसुनी हा नापिक
न्याहळी अदबीनें ग्राहक !
लालभडक गरगरीत बांधी पागोटें तें जुनें
शिपाई संस्थानिक कीं बने !
धोतर मळकें वर करगोटा कुडता अंगावर
चालतो काढुनि छाती वर !
रुपयाइतुके गंध कपाळीं चमकदार लाविलें
कपोलीं कल्लेही ठेविलें !
चालत जातां करकर वाजे जोडा पायामधें
नाचते बाळी कानामधें !
वकिलाहातीं जशी 'बॅग' ती तैशी हा खाकुटीं
ठेवितो चमड्याची धोपटी !
धंदा नसतां पान खाउनी तोंड किती रंगतें
सारखा बघे आरशामधें !
गिर्‍हाइकांच्या पायतणांना चर्मकार हेरतो
तसा हा मुखड्यांना पाहतो !
खूण करूनी हाक मारता देवदूत हा कुणी
येतसे लगबगिनें धांवुनी !
मधेंच कोणी आडवितांना वदे तया "व्हा पुढें
लौकरी येतो तुमच्याकडे !"
चटपट करुनी काम चालवी कारागिर हा भला
कला ही जीवन दे त्याजला !
करमणुकीस्तव कामामध्यें भाषण हा झोडतो
खरोखर वक्ता जणुं भासतो !
गप्पागोष्टी इतिहासांतिल तिखटमीठ लावुनी
सांगतो संशोधक हा कुणी !

राजकारणावरती चालू कठोर टीका करी
भासतो मुत्सद्दी का तरी ?
' सपाट गोटा ' करावयाला पटाईत हा सदा
हाय ! पण ग्राहक रडतो तदा !
' मालिशचंपी ' करतांना पण जीव किती हा रमे
सारखें चोळुन घ्यावें गमे !
' बडे जेवढे मान तयांची माझ्या हातामधें '
—सांगतो पठ्ठ्या ऐटीमधें !
जावळ, मुंजी निघोत तेव्हां हटकुन ये सत्वर
आणितो वाजंत्रीही वर !
असेल ज्याच्या अंगी मस्ती कुस्ती हा खेळिल
फडामधिं बक्षिस पण जिंकिल ! !

❀ ❀

## ' लाल ' बावटेवाले !

' लाल बावटा ' रस्त्यामध्यें दिसे फडकलेला
हळूहळू त्याभंवतीं दिसला लोकांचा मेळा !
' कम्यूनिस्ट ' ते सारे भाई होउन बेभान
क्रांतीवरती देतिल आतां जहाल व्याख्यान !
विचार केला भाषण त्यांचें ऐकाया जावें
पटले नाहीं विचार तर ते सोडुनिया द्यावें !
आतुरतेनें म्हणून गेलों तेथें मी जेव्हां
हाय ! निराळें दिसून आलें दृश्य मला तेव्हां !
' कम्यूनिस्ट ते क्रांतीकारक व्याख्याते कसले ?
साफसूफ ' ड्रेनेज ' कराया कामकरी जमले !
' डेंजर सिग्नल ' लाल बावटा त्यांचा तो बघुनी,
दुर्गंधीचा वास आणखी लावी मज पळुनी ! !

## फोटोग्राफर तो--

फोटोग्राफर तो नवोदित कुणी होता बरें एकला
त्याचें लग्न न जाहले अजुनही 'भाई' परी राहिला !
'कॅमेरा' करिं घेउनी फिरतसे वेडयापरी सारखा
दृष्टीला रमणीय दृश्य दिसतां घे 'स्नॅप' तो नेमका !

फोटो मासिक-पत्रकांस वशिला लावूनिया धाडतो
प्रेमाच्या कविता निरर्थक तशा छापूनही आणितो !
कीर्ती आणिक संपदा मिळविण्या अत्यंत लोभावला
दोघींनीं पण त्याजला अजुनही ना थांग लागूं दिला !

त्याच्या दृष्टिस एकदा पडुन ये मार्गात बाला कुणी
होती सुंदर, कोमलांग, हंसरी ( सांगूं किती वर्णुनी ? )
बेमालूम तिचा, तिला चुकवुनी फोटो तयें काढिला
'बाला मिस्किल' नांव देउन वरी तो मासिकीं छापिला !

घेउनी परवानगी नच; बळें फोटो कसा छापिला
बालेनें बघुनी मुकाट अपुल्या तो संग्रहीं ठेविला !
फोटोग्राफर हेरुनी मग तिनें त्या हातही दाविला
त्याचें 'जीवन-चित्र' ती चितरतां, घायाळ तो जाहला ! !

❀ ❀

## एकेकाची आवड !

देवाची दासी — तिला तो पोपट आवडतो
सिनेनटीला त्या — नेमका कुत्रा पण रुचतो !
खानावळवाला — बाळगी मांजर प्रेमानें
संस्थानिक मोठा — पोसतो हत्ती ऐटीनें !
दरवेशी फिरतो — बरोबर अस्वल घेऊन
प्राध्यापक कोणी — नांदतो माकड पाळून !

❀ ❀

## बुरखेवाला

(' आलमगीर, ' ' द्रोणाचार्य, ' ' वायुपुत्र, ' ' विभावरी शिरूरकर, ' ' गतभर्तृका, ' ' कृष्णद्वैपायन ' वगैरे बुरखेवाल्यांच्या टोळींत प्रस्तुत कवीचा कोणी शोध घेऊं नये. )

त्या टोपण नांवाखालीं करसी टीका कां चोरून ?
प्रगटुनीया नांव सारें
तूं झणीं बाहेर ये रे
ये जेंवि मल्ल तो फडामधूनी दंड स्वत: ठोकून !

नांवरूपा यावयातें
बहकशी ना नित्य खोटें ?
सज्जनांपरी तो स्वार्थी ढोंगी राहिल काय टिकून ?

घेउनी साहित्य परके
मारितोसी व्यर्थ फटके
आयत्या बिळांवर नागोबाचें जाइ खरें फावून !

अंतरंगीं द्वेष भिनला
व्यर्थ जरि तो माजवीला
कां काकश्रापें पवित्र धेनू जातिल सर्व मरून ?

नित्य घेशी भिन्न नांवें
कळुनि कोणा कीं न यावें
परि बिंग खरें तें कधींतरी ना जातें पार फुटून ?

हंस पक्षी मूक प्राणी
दूध घेती जल त्यजूनी
निर्दयी मनुज तूं दोषां धरिसी गूण मात्र सोडून !

राहुं दे अस्तित्व तूझें
वचन परि हे जाण साचें—
' भुंकलें श्वान तें तरी न पाहे गज त्याला ढुंकून ! '

❀ ❀

## हौशी नट दोघे कोणी

हा प्रसंग दारुण घडला    ती गेली पण तो जगला !

हौशी नट दोघे कोणी    तो कुमार तीहि कुमारी
नाट्यांत काम करण्याची    उभयतांस आवड भारी
व्हावया सभासद गेले    संस्था जी नामी शहरीं

ओळख निज देउन पुरती
झाले ते तेथे भरती
कामास यथास्थित ठरती

जम सत्वर त्यांचा बसला    ती गेली पण तो जगला !

नाटकांत कामें त्यांना    प्रमुख खास लाभुन गेली
दोघांनी ओतुन जीव    अभिनयात क्रांती केली
नट कुमार नायक बनला    नायिका नटी नव सजली

दोघांची जमली जोडी
नाट्यांत गमे त्यां गोडी
संस्था बहु पैका ओढी

प्रेक्षक-गण अवघा भुलला    ती गेली पण तो जगला !

नाटकें दणाणुन झडतां    घटना पण नाजुक घडली
जुळुनिया मनें दोघांची    पाशात प्रीतिच्या पडली
भिन्न जात अपुली त्यांना    लग्नास्तव पुरती नडली

माय-तात दोघांचे ते
प्रतिकूल तयांना भलते
मान्यता न झाले देते

शुभ–विवाह त्यांचा हटला    ती गेली पण तो जगला !

प्रेमात जखडतां दोघे    ते अखेर बनले वेडे
लग्नाविण जगणें त्यांना    हाय ! हाय ! पडले कोडे
बेपत्ता होउन गेले    संस्थेचें अडले गाडे

विश्राम-गृहीं ते रमले
आश्रयास चोरुन दडले
विष रात्रीं पिउनी निजले

नज देतां समज कुणाला    ती गेली पण तो जगला !

रात्र ती अघोरी सरली    दिन दुसरा ये उदयाला
प्रेमी पण नाही उठले    माथ्यावर रवि तांबुसला
विश्राम-धनी घे शंका    बघण्यास तयांना धजला

खोलीवर त्यांच्या जाई
बंद दार दिसुनी येई
ठोठविता दाद न कांही

धसका मनिं त्याच्या बसला    ती गेली पण तो जगला !

दूरध्वनि करिता त्याने    पोलीस स्थळी त्या जमले
खोलीचे फोडुनि दार    दृश्य आत भेसुर दिसले
बेशुद्ध दशा दोघांची    मधु मिठीत ते निजलेले

रुग्णालयिं त्यांना नेता
हो तपास त्यांचा पुरता
नटि सोडुन जाई जगता

नट जिता विरागी उरला    ती गेली पण तो जगला !

❀ ❀

## तेव्हांपासून

शिकत होते शाळेंत जेधवां मी
दिसत होते देखणी मस्त नामी

शिक्षकाने कुणि टपुनि चुंबियेले
काव्य तेव्हांपासून मला झाले !

❀ ❀

# एका कवीचा खुळा धंदा

(एक पथ–काव्य)

हाताने अपुल्या अनंत कविता वेडा कवी खर्डुनी
त्याचे कागद विस्तरून बसला चौकात रस्त्यावरी
टाहो फोडित गर्जना सतत तो सिंहाप्रमाणे करी–
'माझ्या या कविता, अहो विकत घ्या, द्या मोल काही कुणी !'

पोरांची कवि–भोंवती जमुनिया गर्दी तदा लोटली
न्यारा काय प्रकार हा ? म्हणुन त्यां आतुरता वाढली !
कोणी कागद विस्कटून कविचे मागेपुढे पाहती
त्याचे अक्षर ते गचाळ बघतां, तात्काळ भिर्कावती !

मौजेनें विनवी कुणी 'कवि तुम्ही घ्या आपुले नांव ते'
तेव्हा मुर्कुन स्त्रीसमान मग तो गालीं हसूनी वदे–
'मित्रांनो मम नांव ते मज तुम्ही घ्यायास सांगू नका
त्याच्याबद्दल गीत दिव्य म्हणतो, थांबा जरा आयका !'

'गा गा गा कविराज, बेछुट नवे ते प्रेम-गाणे खरे'
पोरें आर्जवता, कवी गुणगुणे गाणे स्वयें जे स्फुरे !
'राधे ! सांग तुझा कुणी ग बुचडा हा सैल केला बरे ?'
'आम्ही नाहि कवी,' भकून सगळी पोरें पळाली त्वरें !

तेव्हां हाय ! तिथे चुकून कविचा वस्तादजी ठाकला
त्याच्या ताठ मिशा बघून कवि तो अत्यंत थर्कापला !
गर्जे त्यास गुरू–' अरे चल भल्या, गुंडाळ हे कागद
घे हे दान छुपे,' कवी मग उठे, धंदा खुळा सोडत !

('गाऊ दावुनि आमुच्याच कविता आम्हीच रस्त्यामधे !')

–झेंडूची फुलें

❀ ❀

## आजोबा अमुचे गेले !

हें कसें अकल्पित घडले        आजोबा अमुचे गेले !
मृत्यूची वार्ता कळतां        आप्त मित्र सगळे जमले
जे निकट खरे सहवासी        दुःख तें तयांना झाले
' वृद्धाचे झाले सोने '        कोणी पण बोलुनि गेले !

त्या भीषण संध्याकाळी
मंडळी कितीतरि जमली
सज्जता सर्व मग झाली

गंगेस कलेवर नेले        आजोबा अमुचे गेले !
गंगेच्या कांठावरती        ठेविले न जोंवर प्रेत
लांकडे जाळण्यासाठी        नच येउनि पडली तेथ
मुसळधार पाउस पडुनी        गंगेला आला ऊत !

पाण्याचा लोंढा आला
घाबरून जो तो गेला
सुचतां नच कांहि कुणाला

सर्व लोक धांवत सुटले        आजोबा अमुचे गेले !
गंगेच्या कांठावरती        आजोबा उघडे पडले
हाय ! हाय ! आणिक त्यांना        गंगेनें वाहुनि नेले !
अग्नि नच त्यांना मिळतां        नाहींसे होउनि गेले

कां विचार त्यांनी केला
मी मेल्यावरती अपुला
खर्च तो नको कोणाला

' कंजूष, ' ' हिशेबी ' असले        आजोबा अमुचे गेले !

❀ ❀

# रक्त बंबाळाचे रक्तदान

( जे प्रकृतीत नाही त्याचे अवडंबर मांडले कीं, ते अतिरंजित आणि कृत्रिम झालेंच म्हणून समजा. माझे कवि मित्र श्री. ' रक्तबंबाळ ' यांनी केलेल्या या ' रक्त-दानात ' हाच प्रकार कोणाच्या नजरेत येण्याचा दाट संभव आहे. पण त्यात कवीचा काय दोष ? तो तर त्याचा ' ट्रेड मार्क ' होऊन बसला आहे ! मात्र ' रुद्रबीणेतील ' कोणत्याही कवितेपेक्षां या कवितेत अधिक ' रक्तपात ' झालेला आहे हे येथे गर्जून सांगणे जरूरीचे आहे. कवि ' कान्त ' ! तुम्ही मात्र क्षमा करा ! )

पुरा रक्त बंबाळ
जहालों पुरा रक्तबंबाळ
निज रक्ताची चहूंकडे मी देतो उडवुनि राळ
आतां देतो उडवुनि राळ
रंग तो लालम् लालम् लाल !
लढवय्या मी नव्या युगाचा
बेगुमान मद्मस्त मनाचा
अखंड प्रेषित नव क्रांतीचा
नसांनसांतुनि पराक्रमाचा उठतो माझ्या जाळ !
असंतोष हा तीव्र सभोंती
अन्यायाला सीमा नच ती
आग भुकेची हृदीं पेटती
कराल दाढा वासुनि खाया उठला हा कलिकाळ !
अराजकांच्या अभिलाषाचे
अघोर तांडव थयथय नाचे
कुंड पेटुनी जणुं युद्धाचे
धरणी कांपे, वीज कडाडे, फुटे सर्व आभाळ !
देह पडे मम कांट्यावरती
चिळकांड्या रक्ताच्या उडती
ज्वाळा आगीच्या त्या गमती
भडकुनि जातिल कुठे कशा त्या नाही कांही ताळ !

अपमानाचे शल्य शिरावर
पराभवाचा वन्हि पथावर
त्याचा नच परिणाम मनावर
ध्येयासाठी रक्त सांडणे सोसुनिया जंजाळ !

रक्त सळाळे अंगामधुनी
भीत शिवे पण मनालागुनी
रक्ताचा मम दाब वाढुनी
अखेर रक्ताच्या गुळणीनें जिव होइल घायाळ !

रक्त पहा मम वायां जाते
मिळेल कोणा हवे तेवढें
रक्तानें तें रक्त वाढते
रक्त जमेना हाय ! कुणाशीं; फोडूं काय कपाळ ?

( Blood Transfusion साठी आसुसलेले माझे Blood कोणत्याही ग्राहकाला Mateh होऊं नये ना ? हाय रे दुर्दैवा ! ! )

❀ ❀

## नवोदित कवीची प्रिया आणि क्रिया

| | |
|---|---|
| खास दिवाळी अंकासाठी | नामांकित जे कवी नि लेखक |
| संपादक त्यां लिहून पत्रें | लिखाण त्यांचें मागुन घेती ! |
| कविता, गोष्टी, लेख तयांचे | छापुन येतां अंकामध्यें |
| मोबदला त्यां मिळून जातो | नवा कवी कुणि रखडत बसतो ! |
| अनाहूत तो धाडी कविता | उत्तर त्याला कधीं न मिळते |
| उत्तरांस जर धाडी तिकिटे | माघारी ये कविता त्याची ! |
| ' नव्या कवींनो ! धाडा कविता | तुम्हांस उत्तेजन तें द्याया |
| अंक दिवाळी खास आमुचा ' | संपादक कुणि जाहिर करतो ! |
| 'प्रियावरी' नव कविची कविता | त्यांत कशीतरि प्रसिद्ध होते |
| मोफत मिळतां अंक उराशी | धरुन गर्जतो, ' धन्य प्रिया कीं ! ' |

❀ ❀

## नाट्य सृष्टीतील शोकान्त घटना

प्रसिद्ध नट कोणी
गाजुन गेलेल्या
देखणा गान पटाईत
कंपनीमधे नोकरीत !

प्रमुख नायकाचे
गाण्यावर त्याच्या
मिळे त्या काम नाटकात
भाळती रसिक अतोनात !

महोत्सवीं कोठे
मैफल गाण्याची
तयाला आमंत्रण येई
भली तो रंगवून देई !

स्वतंत्र जलशात
नाट्य कंपनीची
तयाला मिळकत हो भल्ती
नकोशी सेवा हो पुढती !

स्वतंत्र जगण्यात
कंपनीस त्याने
तयाला दिसून ये 'राम'
ठोकला त्वरें 'राम राम !'

नित्य नव्या शहरीं
दरदी जन करती
गाजवी जलसे गाण्याचे
भयंकर कौतुक गवयाचे !

साठवीत गेला
दैवें पण त्याच्या
बहुत तो पैका निज पदरी
गायिका कोणी ये नजरी !

गोड गळा लाभे
श्रवून गान तिचे
दिसाया रूपवती रमणी
तयाच्या भरली ती नयनीं !

संपादन केला
मर्नी न तिज येई
तयाने गोड तिचा स्नेह
तयाचा कसला संदेह !

गवयास पण कां
नाट्य कंपनी ती
वासना चुकुन पुन्हा व्हावी
स्वतःची काढुन नव द्यावी !

घामाचा पैसा
कलावंत मिळता
स्वतःच्या कंपनीत घाली
कंपनी नवी उभी केली !

गायिकेस घेई तियेचे मन तो वळवून
मुख्य नटी करुनी भले दे वेतन ठरवून !

जुनी नवी नाट्यें ज्यामध्ये शास्त्रिय संगीत
करून धनप्राप्ती राहिला सदा गाजवीत !

पैका बहु मिळता नको त्यां जडली दुर्व्यसनें
मदिरेचे प्याले भयंकर प्राशी मुक्तपणें !

नटीस गाणाऱ्या ओढिले खुषीत प्रेमात
भुलून त्यावर ती रंगली ऐन यौवनांत !

नाट्य कंपनी ती खरोखर नांवाजुन चाले
नटी, नायकाचे वाढले धुंदित पण चाळे !

मालक नट दैवें अचानक रुग्णाइत बनला
व्यसनांनी त्याचा देह कां नकळत पोखरला !

हृदय–विकाराने अकल्पित मृत्यु तया आला
नाट्य कंपनीचा लगोलग अंत पुरा झाला !

नटी गायिका ती दिवाणी प्रिया गायकाची
विटुन जीवनाला कृती कां करी धाडसाची ?

जहर प्राशुनीया अरेरे ! करी प्राणघात
नाटक सृष्टीत घडे ही घटना शोकान्त !

❀ ❀

## बेपत्ता कंत्राटदार

तिकिटांच्या विक्रीचा लांबवुनी गल्ला
कंत्राट्दार कोठें तो बेपत्ता झाला ?

वर्तमानपत्रांतुन जाहिरात करुनी
नाटक ‘ मानापमान ’ गेलें झळकूनी !
आमंत्रण ‘ तारेनें ’ मिळतां ‘ कामाचें ’
कलावंत धावुनिया आले ‘ नाइटचे ’ !

थिएटरवर गर्दीचा तोबा हो उडला
नाटक तें होउनि सुरु रंग भला भरला !

‘ धैर्यधराच्या ’ पदांस ‘ वन्समोर ’ झाले
‘ भामिनि ’ चा गोड गळा, जन त्याने धाले !
अभिनयांत ‘ लक्ष्मीधर ’ मौज करी भारी
नाटक तें सुटलें तों रात्र सरे सारी !

घामाघुम कामानें नट जो तो झाला
हाय ! परी कंत्राटदार कोठें हो गेला ?

पुटपुटला थिएटरचा मालक तितुक्यांत
कंत्राट्दार जातांना दिसला मोटरिंत !
‘ देईन उद्यां थिएटरचें उरलेलें भाडें ’
बोलुनिया हो पसार थांबतां न थोडें !

गेला तो विक्रीचा वळकावुनि गल्ला
कलावंत ! फुकट मरा, गरजत “ या अल्ला ! ! ”

❀ ❀

## मेलेला जिवा झाला !

हा प्रसंग अद्भुत घडला मेलेला जिंदा झाला !
खेडयात दूर त्या कोठे कुणि एक भुकेला प्राणी
कष्टतो अती नेमाने रक्ताचे करुनी पाणी
खळगी न भरे पोटाची स्थिति ऐशी केविलवाणी

मायेचे कोणी नुरले
मित्र ना तया आढळले
एकाकी जीवन कुजले

आयुष्य म्हणूनी जगला मेलेला जिंदा झाला !
नच कुठे निवारा त्याला तो राही अडवळणीला
झोपण्यास भूमी उघडी गगन—वस्त्र पांघरण्याला
जवळपास ओढा वाहे वस्त्र, अंग रोज धुण्याला

तो चुकुन पडे आजारी
बेशुद्ध जहाला भारी
कुणि वैदू घेत भरारी—

बघुनी त्यां, 'मेला' वदला मेलेला जिंदा झाला !
खेडयात लगोलग तेव्हा वाऱ्यासम पसरे वार्ता
कुणि खेडुत जमुनी नेती ओढ्याच्या कांठी मयता
सरणावर ठेवुनि देती मृत देह जाळण्या करिता

लावता चितेला अग्नी
ज्वाला त्या भिडती गगनीं
रखरखित निखाऱ्यामधुनी—
उडि मारुन मृत वर आला मेलेला जिंदा झाला !

❀ ❀

# नाटय सहयोग

साधूं या सहयोग
सखे ग साधूं या सहयोग
तुझी नि माझी मिळुन कंपनी करुं नव नाटयप्रयोग!

बेकार जाहलो मालक दोघेजण
नट नटया आपणां गेल्या ना सोडुन
सामान आपुले कुजत पडे विखरुन
आवरुनी निज शोक
सखे ग ये चल तूं बिनधोक
डोलारा हा पुन्हा उभारुन सार्थ करूं उद्योग!

भुलवून नवनवे शेठ बडे लखपती
घेउं या तयांची मदत भली संप्रती
नट नटयांस देऊ 'नाइट' ती वाढती
नवीन नाटक चोख
बसवु या, करून सारा षोक
हां हां म्हणतां तुझा नि माझा सरून जाइल भोग!

यापुढे जगू या सुखात नवजीवन
दुर्दैव जरी घे डाव पुरा साधुन
नादार होउ या अखेर दोघेजण
पुसून अपुले सोंग
सखे ग संपवु हा सहयोग
नाटक करुनी नशिबीं नाही संपत्तीचा ओघ!

❀ ❀

## दिव्य शिवाम्बू पान !

(एक अजब कविता ! चमत्कारिक विषय ! तऱ्हेवाईक शेवट ! )

दिव्य शिवाम्बू पान, खरोखर दिव्य शिवाम्बू पान
सकल जिवां तें उत्तम औषध अमृतसम वरदान !
हटयोगाचे शास्त्र सांगते
पाश्चात्यांचे ज्ञान बोलते
उठा उठा हो भल्या पहाटे
पहिल्या धारेची प्राशावी पकडुन शू शूं छान !
काना, नाकाला, डोळ्याला
डोइस, छातीला, पोटाला
रोग अनावर होवो कसला
सगळ्या रोगां गुणी एक हें औषध राम कीं बाण !
ह्या औषधिनें काया खुलते
प्रसन्न मनही सदा राहते
ताकद वढुनी, आयु वाढते
आयुर्वेदाची ही जननी, देति मुनी तिज मान !
कल्पविधी हा श्रेष्ठ शिवाचा
संत विनोबांच्या श्रद्धेचा
छंद सदोदित मुरारजींचा
धन्य शिवाम्बू पान परंतू कुणी न दे अवधान !
अमाप पैसा खर्चुन भलता
डॉक्टरजींचा तुंबा भरता
इलाज करुनहि सत्वर मरता
अनुभव घेउन शिवाम्बुचा मग व्हा कीं आयुष्मान !
नव्या कवींनो ! तुम्ही तरी जर–
शब्दसृष्टिचे नसला ईश्वर
शिवाम्बु प्राशुन खास निरंतर
लाभुन स्फूर्ती, नव काव्यांनी, रसिक करा हैराण !

❀ ❀

## मुद्रक जीवन बुद्रुक झाले !

मुद्रण हा व्यवसाय कधींचा चालविला मी कसून
अरे ! पण आज फशीं कां पडून ?

पहिल्यापासुन जीव लावुनी सेवक संभाळले
कधी त्यां कमीं पडू ना दिले !

एकाएकी महर्गतेचा भस्मासुर पेटला
तयाने जो तो वैतागला !

एकी करुनी सेवक मजला भंडावुन कैकदा
मागती पगार द्या वाढता !

तडजोडीचा मसुदा त्यांनी पुरता फेटाळला
हाय ! ये निकराचा मामला !

संप करूनी सेवक नेती कोर्टामध्ये लढा
पाडुनी व्यवसायाला तडा !
लागला अखेरी निकाल न्यायासनीं
घ्या सेवक कामावरी पुन्हा ठेवुनी
पाच वर्षापासुन वाढ, फरक द्या झणीं

डोळ्यापुढती चमकुन गेले चक्क काजवे खरे
कुठुनि त्यां पैसा देऊ बरे ?

व्यवसायीं ह्या गोडी नुरली, अपमानास्पद जिणें—
गमे, तो व्याप नको साहणें !

आत्मघातकी स्पर्धा करुनी मुद्रक आपसामधे
ओढती काम मिळे जे कुठे !

पाठ्यपुस्तके छापुनि पूर्वी अमुच्याकडुनी किती
प्रकाशक झाली धेंडे बडी !

शहरा शहरामधे तयांनी इमारती बांधल्या
फिराया मोटारी ठेवल्या !

कैक बिलांची त्यांच्याकडुनी थकली बाकी जरी
संकटीं ती न मिळे कां पुरी ?

काम जयांचे केले आम्ही सहाय्य त्यांचे सरे
दिवसही त्यांना आले बुरे !

तो पाठ्य- बुकांचा घांस तयांचा भला
निज सरकाराने ओढुनि कीं घेतला
श्रीमंत अचानक बने भिकारी, खुळा

मुद्रकांसवे प्रकाशकांना नामशेष जो करी
करावा धंदा का तो तरी ?

भाव आजचा नसे उद्यांला महर्गता मातली
आग कीं जिथे तिथे पेटली !

गडप अचानक कागद झाला गोंधळ तैं उडविला
पांढरा 'ब्लॅक' पुरा जाहला !

चौपट होता शाईचा दर चित्पट हो मुद्रक
तयाचे काळे पडले मुख !

तेल मशिनचे महाग झाले, टाईप दर वाढले
करांचे दणके ना वाचले !

'मुद्रक जीवन बुद्रुक झाले,' कटीं न कसले ठरे
परवड नशिबाची ना सरे !

पुरे उधारी, नको वसूली, कर्ज नको, व्याज ते
हाव ती जिरून सारी फिटे !

मशिनरी जवळची विकुन अतां टाकतो
जे देणे झाले पुरते निस्तारतो
बस्स् मुद्रकधंदा अंती हे गर्जतो
संन्यासाचे जीवन बरवे आता पंढरपुरीं
विठ्ठला ! शांति मला दे पुरी !

❀ ❀

## कवितेतून कविता ! एक झणाटा !

( एक नवा प्रकार )

( क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ! –संत रामदास )

बेताल तूं ! बेबंद तूं ! बेहोष तूं ! बेफाम तूं !
तूं शाहणा वेडापिसा झाला कसा, मी कां वदूं ?

तूं दाखवी करुनी कृती प्रत्यक्ष तूं जे बोलला
वाचाळता ना व्यर्थ हो ! कां वल्गना बोलू तिला ?

बोलांत त्या ना बोल हो, बोलाफुलां दे गांठ तूं
तूं शाहणा वेडापिसा झाला कसा, मी कां वदूं ?

तूं रंगशी, तूं झिंगशी, तूं झोकशी कां शांभवी
बेछूटतेने हांसुनी, बेभान कां होशी कवी ?

तूं वैद्य तो असली मधू, वैदू न हो नकली कडू
तूं शाहणा वेडापिसा झाला कसा, मी कां वदूं ?

( कविवर्य श्री. शंकर वैद्य यांच्या 'बेताल मी ! बेबंद मी' !
या कवितेस उत्तरादाखल. कविवर्य, क्षमा करा ! )

❀ ❀

## मी नटी, एक फसलेली बायको

'शुक, मांजर, कुत्रा' कुणी नटी पाळते
सोबती खरे मम प्राणी ती बोलते

नर मानव-प्राणी मज सांगाती नको
मी घटस्फोट घे, फसलेली बायको !

❀ ❀

## तीन घोड्यांची शर्यत

मराठी ग्रंथ संग्रहालय

त्रय घोड्यांची सुटली शर्यत
ग्रामिण पहिला, दुजा कोंकणी
दोन जुने ते खास मुरब्बी
दलित धांवला तिसरा गर्जत !

किती वेळ तो होउन गेला
मधेच माशी कशी शिंकली ?
शर्यत घोड्यांची अडखळली
निकाल त्यांचा अडून पडला !

निकाल लागे तोपर्यंत
खात बैसले घोडे पेंड !

० ० ०

निकाल अंती स्फोटक घडला
अश्व उपेक्षित विजयी ठरला !
बाकी दुसरा पण खिंकळला—
' हट्टे औषधाविना खोकला ! '

० ० ०

ग्रामिण टेंभा मिरवित बसला
चौखुर उधळुन, जरी गचकला !

(कांही कालानंतर पहिले दोन नामांकित घोडे ' इहलोकींच्या तबेल्यातून ' एकाएकीं अदृश्य झाले आहेत ! कुठे गेले तें सांगता येत नाही. पण पुन्हा ते दिसणार नाहीत एवढं मात्र खरं. हाय रे दुर्दैवा ! ! )

❀ ❀

## माझा स्त्री पार्ट

स्त्री पार्ट एकदां मी केला
स्मरणात चिरंतन तो रुजला !

कॉलेजातिल पहिले वर्ष
चहूंकडे जणु उसळे हर्ष
कुठें न घडतांही संघर्ष
शृंगार नसांमधुनी भिनला !

मजेत पहिली टर्म संपली
संमेलन ते टपके जवळी
नाटक करण्या धांदल उडली
नटसंच खडाडुन तरवरला !

भाषा विषयाचे प्राध्यापक
नवीन ज्यांनी लिहिले नाटक
ठरले बसवायाचे झक्क
अन् मुहूर्त त्याचा गजबजला !

एकच स्त्रीचे पात्र नाटकीं
मिळे न विद्यार्थिनी तया कीं
असहायतेच्या अशा प्रसंगीं
मज योजियले त्या कामाला !

दिसावया मी सुंदर म्हणुनी
आग्रह धरिला नट-मित्रांनी
कौतुक करतां प्राचार्यांनी
मी भुलुन झणी होकार दिला !

कर्मठ ' बाबा ' मम दुर्वास
त्यां नच लागूं देतां वास
बसले माझे काम झकास
अन् प्रयोग-दिन तो उजाडला !

भय तोंडाशी पण उद्भवले
दुष्टाने कुणि वैर साधले
गुपित सोंग मम पित्यांस कथिले
जळफळाट त्यांचा कडकडला !

नाटक जेव्हा सुरू जहाले
सोटा घेउनि पिता धावले
शांत करुनि त्यां नाट्य दाविले
चेहरा तयांचा मग खुलला !
स्त्री पार्ट एकदां मी केला
स्मरणात चिरंतन तो रुजला !

❀ ❀

## प्राध्यापकाचे सहजीवन

सहजीवन साधू, सखे ग सहजीवन साधू
विधुर असे मी, तूं विधवा चल, प्रेमभरें नांदू !
निवृत्त जहालों प्राध्यापक मी बरें
सोडून प्रियतमा गेली मजला त्वरें
एकटेच जीवन उरे म्हणुन मी झुरे
अपत्य ना मजला,
तसेही अपत्य ना तुजला
जमेल जोडी, तूं हो सरिता, समजुन मज सिंधू !
वार्धक्य लाभलें तुला तसेही मला
कां पुनर्विवाह न पसंत तुज हो भला
मम जीव तुझ्यावर आकर्षुन लोभला
रुकार दे मजला
झणीं तव रुकार दे मजला
चोरुन आपण मौज लुटूं तर ठरूं जगीं भोंदू !

❀ ❀

## मी नटी नांवाजले

लागुनी नादी तुझ्या मी सर्वथा पस्तावले
नाटकी तू! या भयाने ना तदां धास्तावले!

लग्न नाही मी करूनी नांदले रे एकटी
लाभलेल्या नोकरीने जीवनीं स्थीरावले!

ओळखीने भेटुनी तू भूल न्यारी पाडली
भाबडी भोळी खुळी मी थोडिशी भांबावले!

नाटकाचा छंद वेडा तू हटाने लाविला
प्राप्त व्हाया ती कला मी भाळुनी, झेपावले!

भूमिका लाभून नामी जीव सारा ओतला
बोलबाला होउनीया मी नटी नांवाजले!

कीर्तिसंगे लाभ झाला खूप द्रव्याचा भला
संगतीने तू परंतू वाममार्गा लोटले!

प्रेम खोटे अर्पुनी तू सौख्य माझे भोगले
षोक दारू, रेसचा तो लाविता वाहावले!

द्रव्य माझे लुंगवूनी लाथ देशी शेवटी
दीन झाले मी भिकारी, तू पुरे नागावले!

गात जाते ही कहाणी वेड आता लागुनी
कंठिते वृंदावनाला आयु जे भारावले!

मागते वेडी अखेरीं ' हे कन्हय्या धांव रे
तूच ह्या ' मीरा ' नटीला पाहिजे सांभाळले!'

## खल्वाटो निर्धनं क्वचित्

साहित्यिक कुणि टक्कलवाला
अन्य देश तो बघण्या गेला
टक्कल त्याचे पण पडलेले
फिरावया त्या आणी लज्जा !

टक्कल अपुले झाकायाला
डोक्यावर तो ' हॅट ' चढवितो
कधी कधी तर टोप घालुनी
नटाप्रमाणें स्वैर हिंडतो !

विचार करतांना पण केव्हां
तल्कर डोक्यावरून फिरतो
दर्पणात अन् त्याने बघतां
फरक तयाला भलता दिसतो !

टक्कल गोट्याचा तो व्यास
इंचाइंचावरून वाढे
कारण त्याला कळे न काही
प्रगती कैशी अपूर्व होई ?

हिंडुन तेथे बाजारात
हवे हवे त्यां सर्व लाभते
हाय ! परतू मिळे न कोठे
शुद्ध खरे खोबरेल तेल !

गत डोक्याची विद्रुप सारी
दैव तयाची करून देई
मनामधे जळफळून जातो
अखेर त्रागा करून वदतो– !

' पूर्णपणे तो मम डोक्याचा
होउन जावो सपाट गोटा
हजामतीचा त्रास चुकेल
वाचुन जाइल खर्च तेवढा ' !

' खल्वाटो नच निर्धन सहसा '
या तत्वातिल गूढ उकलता
बरळे वेडा ' श्रम नच करतां
रंकाचा मी बनेन राव ! '

❀ ❀

## नव कवी बने तो –

नव कवी बने तो जरि न जन्मत: दर्दी
लिहि क्षुल्लक कविता करून भलती गर्दी !
वाचनास कविता मिळे न कोठें संधी
जे ध्येय योजिले, उतरे त्याची धुंदी !
' निज कविते ' वाचुन त्यां न ओळखे कोणी
हळहळे–' रसिक कां घेति न तिज समजोनी ? '

❀ ❀

## दैवी चमत्कार

उद्योग करूनी श्वशुर कुणी गुणवंत
तो बनून जाई नशिबाने धनवंत
एकटीच शिक्षित कन्या त्यास सुशील
जमवून प्रेम, तिज लाभे तरुण वकील !

तो वकील नवखा दिसावयाला छकडा
पण कर्तृत्वाने निघे न कांही फरडा
जम बसे न त्याचा कोठे धंद्यामाजी
नोकरी पत्करी अखेर मास्तरकीची !

संसार चालवी कसावसा कष्टात
प्रिय पत्नी त्याची शिकलेली जरि ख्यात
नोकरी मिळेना तिजला कसली कोठे
हो कन्या त्यांतुन, संकट आले मोठे !

नच दाद सासरा देई जामात्याला
तो विरुद्ध त्यांच्या प्रीतीच्या लग्नाला
कंजूष तयाचा स्वभाव नाही हटला
तो दुरून त्यांचे हाल बघूनी जगला !

पण एकाएकीं चमत्कार कीं घडला
सासऱ्यास मृत्यू हृदय-विकारें आला
उद्योग तयाचा जामात्यास मिळाला
श्रीमंत जावई लगेच दैवें बनला !

❀ ❀

## एखाद्या कवीचें नशीब

कांहीं थोर कवी सदा झळकती मासीक–पत्रांतुनी
कांहीं येति पुढें कुणी रसिक त्यां डोक्यावरी घेउनी !
कांहीं लावुनि बैसतात वशिला छापावया काव्य ते
एखादा 'कवडा' * कवी न ठरुनी जाई दडूनी कुठें !

संस्थानीक महा–कवीस धरिती राजाश्रयीं आपुल्या
कोणाला कवितेवरीं मिळकती होतातही चांगल्या !
कोणाचीं नव पुस्तकें खपुनिया आवृत्तिही वाढते
एखादें पण 'चोपडें' निघुनिया अंगावरीं शेकतें !

वाडें घेऊनि काव्य–गायक कुठें गाण्यांप्रती धांवती
श्रोते मार्मिक (!) काव्य–गान श्रवतां टीकेस आरंभती !
कोणा भूषविती अनेक कविता त्याच्यामुखीं गाउनी
एखाद्या भसड्या कवीस अगदीं देतात फेटाळुनी !

चाले भेद असा कवींत बहुधा प्रख्यात सारे जरी
एखाद्या घसरे तसाच चुकुनी येण्यापुढें यापरी !
पाही कोण अशा कवीस बुडत्या ? जो तो असे आपला
देवा ! दे प्रतिभा कशी तरि तया, त्यासाठिं तो नाडला !!

* ( शाणोल्लीढ मण्याप्रमाणें पुण्याच्या शैक्षणिक वातावरणांत चमकू लागणारे पदवीधर 'अन्' शिक्षणशास्त्री यांनीं हा नवीन अर्थाचा शब्द (भालकारांप्रमाणेंच ) मोठ्या प्रयत्नानें शोधून काढला आहे ! )

❀ ❀

# पुण्याचे भामटे आम्ही !

मवाली मुंबईचे ते नि सोदे दिल्लिचे नामी
जनीं प्रख्यात हो तैसे पुण्याचे भामटे आम्ही !

महाराष्ट्रामधें मोठें पुणें हें केंद्र विद्येचें
निवासी तेथले सारे अडाणी कोठुनी आम्ही ?

स्वतःला मानि जो तो कीं, खरा मी शाहणा मोठा
कधींही एकमेकांचें न देतों तें पटूं आम्ही !

अहा त्या ‘ सभ्य ’ नांवानें सदा ऐटींत वागून
बिचाऱ्या दीन लोकांना लुटूनी गांजतो आम्ही !

किती त्या आमुच्या लीला तुम्हां वर्णून सांगाव्या ?
न त्यांवाचून कोणाला कळायाचे खरे आम्ही !

इथें गांवामधें साऱ्या विरोधी नांदती पक्ष
टवाळी एकमेकांची कराया शूर ते आम्ही !

जरी राष्ट्रामधें आलें घडूनी ऐक्य सर्वत्र
कराया त्यांवरी टीका निराळे राहतों आम्ही !

पुढारी अन्य पक्षाचा कुठें गांवामधें आला
जिवाला त्याचिया धोका प्रसंगीं आणितों आम्ही !

समाजाला सुधाराया खरा जो कष्टला पूर्वीं
जिता तो, प्रेतयात्राही तयाची काढली आम्ही !

सभा राष्ट्रीय ती मोठी जहाली एकदां जेव्हां
अहा रंगामधें ‘ जोडा पुणेरी ’ फेंकिला आम्ही !

कधीं बाहेरुनी येथें नवा वक्ता कुणी आला
निघे जो नेभळा त्याला पुरा फेटाळतो आम्ही !

कवी कारवोटिला बाडें कितीही मारुनी आले
कुठें गद्यांत ते गातां न देतो दाद त्यां आम्ही !

# संस्कृतिसंरक्षकांचें स्नेह संमेलन

महाबळेश्वरला एकदां संमेलन झालें
पेन्शन घेणारे संस्कृतीसंरक्षक जमले !

शहर स्वतःचें तें सोडुनी परगांवी गेले
गांवामधिं अपुल्या नको तो ' गोंधळ ' त्यां गमलें !

म्हातारे सगळे सभ्य ते करुनि दिसायाला
पण पिकल्या पानीं रंग तो हिरवा दडलेला !

कार्यक्रम झाला दुपारी जेवण जिलबीचें
रात्रीला ठरलें नृत्य नी गायन ' छकडीचें ! '

रात्र जशी झाली रंग तो जलशाला चढला
म्हातारे सगळे लागले मग डोलायाला !

त्यांतिल ' बनलेले ' जरी त्या गाणें ना कळलें
रंग भरायाला नर्तिकपुढें पुढें सरले !

फाजिल श्रीमंत ' अगाऊ ' जे होते जादा
बहाल तिज केला तयांनी मग दौलतजादा !

गजल, ख्याल, ठुमरी लावणी आणि कवालीला
त्र जशी झाली रंग तो बेमालुम चढला !

च्यामध्यें बाटल्या ' व्हिस्की 'च्या फुटल्या
ि रांनी त्या चोरुनी होत्या आणियल्या !

सभा ख्च्या सर्व ते निद्रावश झाले
अहा रचें फावुनी मग सगळे गेलें !

कधीं बाहे निघे जो नेभळ घेतले तिनें लुबाडून
कुणाचे तैसे उपटून !

कवी काखोटिला तिनें मग केला पोबारा !
कुठें गद्यांत ते गातां उठेना कोणी म्हातारा !

कितीही जाहिरातींनें कुणी तीं नाटकें केली
जरा 'बेरंग' पाहूनी भजी त्यां मारतों आम्ही !

लिहाया लागला कोणी कुठें थोडेंहि अश्लील
बहिष्कारून त्यां शिक्षा कधीं टोठावतों आम्ही !

कुणी अस्पृश्यता जाया किती केले जरी यत्न
पुरूनी राहतों त्याला पुराणी सोवळे आम्हीं !

कराया भाषणें मोठीं दणाणे आमुची वाणी
कृतीची वेळ येतांना मुकस्तंभापरी आम्ही !

समाजाला सुधाराया पुढारी होउनी कट्टे
कसा तो स्वार्थ साधावा पुरें हें जाणतों आम्ही !

कुणांला घालण्या टोपी, कुणाला पाडण्या खाली
अनुल्लेखून माराया कुणां, निष्णात ते आम्ही !

जसा वाहील तो वारा मतें निर्माण तीं होती
निमालें ध्येय तत्रापी खरे मुत्सद्दि ते आम्ही !

पुण्याला ठेवुनी नांवें वृथा मारील जो थापा
तयाला चोंच माराया खरे ते कावळे आम्ही !

'कधींही आमुच्या नादी बळें लागूं नये कोणी'
इषारा हा कसा द्यावा अरेरे शेवटी आम्ही !

मवाली मुंबईचे ते नि सोदे दिल्लिचे नामी
जनीं प्रख्यात हो तैसे पुण्याचे भामटे आम्ही !

(भामटे म्ह० 'बनलेले' असाच अर्थ करावा. कवि पुण्याचाच आहे याची मात्र रसिकांनी याद राखावी.)

!

❀ ❀

?

दंगल ही कळली
येउनि मग ' पार्टी '

अचानक पोलिस खात्याला
घातला त्यांच्यावर घाला !

दारूबंदीचा
जप्त म्हणुनि झाल्या

मोडला हुकूम सरकारी
बाटल्या ' व्हिस्की 'च्या भारी !

' चतुर्भूज ' झाले
नवल परी घडलें

संस्कृतीसंरक्षक सगळे
बिचारे बेमालुम सुटले !

त्यांच्यामधिं होता
' घेंडाला ' ऐसा

' रिटायर्ड ' फौजदार कोणी
जाणिलें पोलिस लोकांनीं !

' हात चलाखीनें '
संस्कृति गाजवुनी

कसेंतरि प्रकरण तें विझलें
जिवानिशि आले मग बगळे !!

❀ ❀

## पत्रें लिहिली तर--

पत्रें तूं लिहिलींस जीं प्रियकरा ( ? ) हुळून माझ्यावरी
कोठें धाडुं नकोस तीं पण तुला मीं सांगतें तें करी !
त्वन्नेत्रीं भरलें स्वरूप मम हें वेळांत थोडया जरी–
होशी तूं न मला पसंत म्हणुनी, घेते परीक्षा खरी !

पत्रांची जमवूनिया सकल जीं ठेवीयलीं बंडलें
लावी आग तयांस, तूं न अगदीं पाहून मागें पुढें !
जेव्हां होइल राख पूर्ण सगळी फासून अंगावर
संन्यासी बनुनी तुला गिरिवरीं जाणें असे सत्वर !

योग्यांच्यासम तूं समाधि अपुली लावून रात्रंदिन!
एकांतांत बसून ध्यान करणें !–( माझें क…
आशा वाहुं नकोस ती–' मिळुनिया गेली
अर्जुनास; तरी तुला न दिसणें मद्देह …?

❀ ❀

## उंच झालों म्हणून--

झालों उंच म्हणून मी मज किती तो त्रास होतो बरें ?
सांगू कां समजावुनी पण कुणां वाटेल तें कां खरें ?
आढ्याचें मम मस्तकास बसती दारांत ठोके सदा।
गेलों वाकुनि मी तरी न टळतें ती दारुणा आपदा !

एरंडासम उंच पाहुनि मला माझ्या स्वतःच्या घरीं
जो जो तो उठतो निरर्थ मज घे राबून कैद्यापरी !
'काढा जिन्नस ते फळीवरुनिया ठेवून द्या नी पुन्हा'
ऐशा सक्त मजूरिनें रखडण्या केला जणूं मी गुन्हा !

बाजारीं मिळतें न रुंद मजला कोठें कधी धोतर
जें जें नेसुनि पाहतां न पुरुनी तें येइ गुडघ्यावर !
जेव्हां मी बसतों पुढें कधिंकधीं नाट्यगृहाच्यामधें
माझें मागिल सर्व लोक चिडुनी देती बसूं ना सुधें !

तोटा आणिक भासतो हरघडी उंचीमुळें जो मला
ंगू कां अपमान सर्व गिळुनी ? हा जीव वैतागला !
स्त्री मज ठेंगणी तिजपुढें मी सारखा वांकुन–
र्जर त्यामुळें न रुचतें 'आलिंगुनी चुंबन' !

देवा ! मृत्यु × × ×
देवा ! आयु न
े कशास्तव तरी बोलो कुणी बापुडे
तुला विनवितों होणें जरी उंच तें ! !

❀ ❀

## कवींनो !

कवींच्या सर्व गीतांचा पहा काढून आढावा
जिथें तिथें असे प्रीती, तयांची व्यर्थ ती सेवा !

शिरोभागांस गीतांच्या वृथा प्रस्तावना जाडी
परंतू आंतुनी त्यांच्या दिसूनी येत ना गोडी !

स्त्रियांच्या देखुनी लीला चढे तत्स्फूर्तिला रंग
म्हणूनी प्रेम वर्णाया तयांचे चालती ढंग !

अघोरी विश्रमतेनें त्या जिथें हा गांजला देश
तिथें हे प्रेमकाव्यांचे कवी गातात संदेश !

झडावें गान शाहीरी अतां देशामधें फक्त
तथापी गान प्रेमाचें कवी गाण्यांत आसक्त !

रचा हो प्रेमवेडयांनो ! कसेंही काव्य रंगेल
तया दुर्लक्ष देण्याला अम्हाला काळ सांगेल !

कितीहि पुस्तकें छापा न वाचूं एकही पान
कुठें हें प्रेमरडूगाणें ? कुठें तें शाहिरी गान ?

करा हो दुष्ट हेतूनें स्त्रियांची वर्णनें खोटीं
अशानें स्त्रीसमाजाची न हानी होतसे मोठी !

नको तें काव्य गाऊनी भरा राष्ट्रात अंधार
म्हणूं आम्ही कवी यांचा नसे राष्ट्रास आधार !

अम्हांला द्यावया स्फूर्ती खरा ' शाहीर गोविंद '
कवी हे सर्व आतांचे बुडाले प्रेम–सिंधूंत* !

कवींनो ! चालवा तुम्ही अजूनी प्रेमरडूगाणें
कवींचें काव्य वाचाया न आम्ही लागतों देणें !

❀ ❀

* याला मी तरी अपवाद कसा ठरेन ?

## वांझ

प्रभो ! काय मी करूं कसें मज होईना लेकरूं ?
अपार लक्ष्मी वसे घरांत
चाकर कामाला दिनरात
सौख्याची जरि हो बरसात
मन हें लागे झुरूं कसें मज होईना लेकरूं ?

विवाह होउनि आतां मजला
किती काळ तो लोटुनि गेला
बहार तारुण्याचा सगळा
हाय ! लागला सरूं कसें मज होईना लेकरूं ?

नवस किती मी संतत केले
पिंपळ वृक्षाभंवतीं फिरले
तुळशीपूजन करून दमले
वठला कायातरू कसें मज होईना लेकरूं ?

बुवा फकीरां देउनि मान
केली द्रव्याची धुळदाण
दिलें तयांनी जे वरदान
खरे कोठवर धरूं कसें मज होईना लेकरूं ?

उपवासाचें ठसुनी मर्म
अनेक केलें दान नि धर्म
पालटतां नच खडतर कर्म
माथें लागे फिरूं कसें मज होईना लेकरूं ?

'त्यांनी' मज डॉक्टरां दाविलें
वैद्याचेंही औषध प्यालें
निदान माझें कुणा न झालें
रोगी कैशी ठरूं ? कसें मज होईना लेकरूं ?

गाय वासरू फिरे घेउनी
लतिका हासे फुलां मिरवुनी
घार पिलांना दे भरवूनी
मीच दीन पांखरूं          कसें मज होईना लेकरूं ?

पुत्रवती मज स्त्रिया हिणवती
काय वदूं तुज देवा अंतीं
नसेल जर मज मोक्षप्राप्ती
सुखें मला दे मरू          कसें मज होईना लेकरूं ?

❀ ❀

## नव कवी आणि गीत–गायक

नव कवी प्रसवतो अफाट कविता मुक्त
( मोकाट सुटे कीं पोळ माजुनी मस्त )
निज फोडुनि नरडें, कवितावाचन करतो
कुणि दाद न देतां, उदासवाणा बनतो !

हतवीर्य अखेरी घेउनि अपुल्या कविता
कुणि गायक गांठी गणुनि तयांना त्राता
' घे मोल, ' विनवितो ' कविता माझ्या वाच
त्यां चाल लावुनी, कुठें तरी तूं गाच ' !

नव कविता देखुन भोंगळ, क्षुद्र, चटोर
तो गायक गर्जे रागावून अघोर–
' नव कवी रडया तूं, नाचत ' डिस्को डान्स '
काढून हेल, निज कविता, बंडबड खास !

❀ ❀

## पापड, नव्हे तिळपापड !

पापड उडदाचे — करावे ऐन उन्हाळ्यांत
संसारीं माझ्या — ठरविला पत्नीनें बेत !

केळीचा खुंट — आणिला जाउनि बाजारीं
इतर पदार्थांची — तयारी होइ तिची जारी !

खुंटाचें पाणी — काढिलें रात्रीं ठेंचून
उडदाचें पीठ — ठेविलें तयांत भिजवून !

दुसऱ्या दिवसाला — जहाले तयार ते ' गोळे '
अन् ' बोट्या ' त्यांच्या — दिसाया पेढे जणुं गमले !

दुपारच्या वेळीं — बायका घरीं किती जमल्या
पापड लाटुनि त्या — बिचाऱ्या थकूनिया गेल्या !

कांद्याचे पोहे — गरम ते त्यांच्यास्तव झाले
नंतरही केले — चहाचे कितीतरी प्याले !

उघड्या गच्चीत — टाकले पापड वाळाया
दुपार सरतांना — घरोघर गेल्या त्या बाया !

पापड वर्षाचे — एकदां कसेतरी झाले
पत्नी मग देई — श्वास ते सोडुनि दबलेले !

पापड वाळाया — कडक ते दुसऱ्या दिवसाला
पसरुनि गच्चींत — प्रिया ती जाइ सिनेमाला !

दुपारचा ' शो ' तो — प्रिया ती बघतांना रमली
वार्ता पण इकडे — अचानक कसली हो घडली !

वादळ जोराचे — हवेमधिं सुटूनिया गेलें
पाल्यासम उडले — भराभर पापड सुकलेले !

दूरदूर गेले — उडूनी पापड ते दुबळे
गच्चींतिल अमुच्या — क्षणामधिं वैभव ओसरलें !

पत्नीचा फेरा — सिने ' शो ' सुटूनि घरीं आला
पापड ना दिसतां — तिचा मग 'तिळपापड' झाला !

❀ ❀

## हत्ती आणि मुंगी

दंडकारण्यांत पूर्वी एक हत्ती माजला
निर्दयी उच्छाद त्यानें ठायिं ठायीं मांडला !

घोर रानांतील होते दीन सारे जे पशू
त्रास त्यां देण्यांस त्याचा ना सपाटा थांबला !

घाव घालूनी जिव्हारीं घे कुणाचाही बळी
आपुल्या अन् शक्तिचा त्यां गर्व भासूं लागला !

ना दया माया कुणाची येइ त्याला ती कधीं
पाशवी वाढून लीला क्रूरतेनें वागला !

जाच त्याचा संहराया प्रश्न सर्वांना पडे
ना उतारा त्यांस कांही हाय ! कोणां घावला !

संकटाच्या घोर कालीं दीन सारे जाहले
हांक त्यांची ऐकण्याला देव नाहीं झोंपला !

जन्म तो मुंगीस एका देउनीया तत्क्षणीं
दिव्य सामर्थ्यें तियेच्या तेज दावी दुर्बळां !

जेधवां बेहोष हत्ती लोळलेला सांपडे
कानिं त्याच्या जाइ मुंगी दंश घ्याया त्या खलां !

चावुनी चावून त्याला ठार केले शेवटीं
मुंगिचे कर्तृत्व मोठे जीव छोटा हो भला !

❀ ❀

## भलता बोभाटा

घरी नटीला पोंचविण्याला अपरात्रीं नट कोणी जातो
हात तिचा तो दाबुन धरतां बोभाटा कां भलता होतो ?

❀ ❀

## नवकवी कोण हा कुठला ?

नव कवी कोण हा कुठला ? फोडुनिया टाहो रडला !
पंडित कवि गाढा कोणी मिळवुनी दिगंतीं कीर्ती
अपमृत्यू येई त्याला गांठता न कांही साठी
दहनास्तव त्याचें येई शव स्मशान–भूमीवरती

दर्शनार्थ त्याच्या अंतीं
साहित्यिक जमले दर्दी
आप्त मित्र करती गर्दी

नव कवी त्यांत जो घुसला फोडुनिया टाहो रडला !
सरणावर अजुनी शव तें ठेवुनिया नव्हते दिधले
अध्यक्ष सराइत 'तात्या' 'आले हो' कोणी वदले
वाट त्यांस करुनी देती जन बाजुस सरुनी सगळे

नव कवी धांवुनी पुढती
तात्यांस मिठी दे भलती
अन् गर्जे मुखवाणी ती–

'कवि पंडित अपुला गेला' फोडुनिया टाहो रडला !
आश्चर्यित प्रेक्षक झाले नाटक नव कविचें बघतां
ओशाळुन 'तात्या' गेले सांत्वन नव कविचें करतां
घामाघुम जिव हो त्यांचा नव कविची मिठि सोडवितां

नव कवी चिकट तो न्यारा
ओरडला चढवुन पारा
ढाळण्यांत अश्रू-धारा

पर्जन्य नमूनहि गेला फोडुनि जो टाहो रडला !

❀ ❀

## त्याचें संततिनियमन !

कारकून कोणी तयाला पांच मुलें झाली
छोटें घर त्याचें मंडई तिथें जणूं भरली !

नऊशें रुपयांचा कोठुनी पगार पुरणार ?
महर्गता त्याला तयांतुन करते बेजार !

रात्रंदिन त्यानें खरोखर खरडे घासावे
पोराबाळांना कसेंतरि पोटाला द्यावें !

दुष्काळांत अशा बायको खर्चिक, रागीट
बहुत मुलांचा त्या तियेला आतां ये वीट !

पतीस ती बोले– "तनू मम ढांसळली पुरती
नको मुलें आतां करा तें 'नियमन' यापुढती!"

'बरें' ! म्हणूनीया तिचा तो विचार त्यां पटला
पत्नीचा सल्ला नेमका हृदयाला भिडला !

मात्र वियोगाचा लोटला अल्प न काल कुठें
स्त्री-सहवासाचा तयाच्या जाळ हृदीं पेटे !

पुनश्च कामुकता तयाची जागृत ती झाली
'नियमन उपकरणीं' अतां पण त्यानें वापरलीं !

जरी 'साधनांनीं' तयानें 'प्रयोग' चालविले
निष्फळ ते ठरुनी (व्हायचें नाहीं तें चुकलें !)

'दिवस तिला गेले' आणखी वार्ता मग आली–
ह्यावेळीं तिजला अरेरे ! जुळी मुलें झालीं !!

❀ ❀

## बडे बापका बेटा

वकील कोणी बडा पुढारी मिळवुन जातो वैभव, कीर्ती
पुत्र तयाचा ठक, पेंढारी शनी निपजला सूर्यापोटी !

❀ ❀

## दोन बायकांचा बादला !

दुर्बुद्धी देवा मज झाली सांग कुठून
स्त्री पहिली तरि दुसरी केली मी जाणून !

कडकडुनी भांडतात दोघीजणि भारी
लाजुनि त्यां मांजरेहि पळती पार दुरी !
ती हिजला ही तिजला पाण्यामधिं पाही
पूर्वजन्मिं एकमेक वैरी जणुं कांहीं

जर्जर मज दोघींनीं केलें फार छळून
हाडांचा सांगाडा गेला देह बनून !

तुलना ह्या दोघींचीं करता मति थकते
एक 'त्राटिका,' दुसरी 'गजघंटा' गमते !
काळी ही शूर्पणखा, गौर करंटी ती
दोघींच्या खर्चाला ताळ नसे अगदीं !

चैनीस्तव संपत्ती घेती रोज लुटून
मालक मी असुनी मम देती नच चालून !

श्रीमंती असुनी मज सौख्य न तें कसलें
बुद्धीची भूक कशी शमवावी न कळे !
वारस मज पुत्र नसे दोघींच्याकडुनी
'अगतिक' मी होई पुरा, सार्थक ना जगुनी !

दोघींची जिरवाया दत्तक तो घेऊन
संन्यासी होउन मी, जातों घर सोडून !

❀ ❀

## स्मृति-गीत

आठवतो तुज कविते ! कां तो काळ फजीतीचा ?
बालपणाचा, अज्ञानाचा, ' नक्कल ' करण्याचा !

काव्यांगाचें ज्ञान चोरटें, चोरटाच जीव
कळलें नव्हतें काव्य काय तें ? स्फूर्ती निर्जीव !

छापित नव्हते संपादक कुणि, कविता बालांच्या
' कचरा ' म्हणुनी टाकित होते भक्ष्यीं कालाच्या !

डंसति परोपरि कोमल हृदया त्यांतुनही टीका
गेले ते दिन ! कविते ! यापरि देउनिया ठपका !

बालपणींच्या कविता सगळ्या स्फुरति आज फिरुनी
मासिकपत्रांमधें तयांची गर्दी छापूनी !

तूं कविता ती, तोच कवी मी, निंदकही तेच
परि होणारी टीका आतां डंसते ना खास !

कशास आतां असें निराशा ? झालें तें गेलें
' बनला ' कवि तो दाद न देई कुत्रे जरी भुकले ! !

❀ ❀

## तो बकासूर आणि भीम

रानावनांत दूर एकांत त्या ठिकाणीं
दगडी गढींत भव्य वस्तीस कोण प्राणी ?

धिप्पाड, क्रूर, नंगा तो दैत्य आततायी
काळीज त्यांस नाही भासे जणूं कसाई !

भोळ्या अनेक लोकां वर्चस्व दाखवून
देऊन धाक, धोका घेतो सदा लुटून !

ऐशा बकासुराचा उडवावयास धुव्वा
तो भीम सज्ज आहे शेरास शेर सव्वा !

❀ ❀

## मी आणि मिशा

" आईबाप तुझे जिवंत असतां तूं कां मिशा काढिशी ?
तूं रे मर्द तरी मुखावर कळा त्याची दिसेना कशी ?
तूं स्त्री नाहिंस, पौरुषत्व मग हें झांकून कां ठेविलें "?
देतों उत्तर त्यांस मी मज कुणी जे यापरी बोलले !

" नाहीं ठेवित मी मिशा नच असे मर्जी मनाची तर
स्मश्रूनें मज फायदा कितितरी हो कल्पनेबाहिर !
क्षेत्राहून सनातनी परतती क्षौरक्रिया होउन
क्षेत्राचें मज पुण्य तेंच मिळतें मी ना कुठें जाउन !

खायाला नच तूप तें मग वृथा लावी मिशांना कुणी
ऐसा पोकळ डामडौल करितों मी ना मिशा काढुनी
घेतो पेय ' मिशाळ ' तो निज मिशा हातें करूनी वर
तो ना त्रास मला कधीं पडतसे नाहीं मिशा तोंवर !

नाहीं पीळ भरावया मज मिशा एका प्रकारें बरें
घ्याया सूड कुणावरीं मम मनीं ' काळें ' कधीं ना शिरे !
' मी देईन मिशी पहा उतरुनी ' हा गर्व ना वाहिन
नाहीं ज्यांस मिशा, कधीं कुठुनि त्या जातील खालावुन ?

वारंवार नव्या तऱ्हा चहुंकडे होती मिशांच्या अती
राखूं मीच कशा ? विचार पडुनी, कुंठीत होते मती !
'रागावून मिशावरी'-मज म्हणा-' मी चाट त्यांना दिली '
वा ' त्यांना उतरावयास कवणा संधी न मी ठेविली '!

काढूनीच मिशा खरोखर सदा तारुण्य मी राखतो
येई वृद्धपणा-तरी वय किती ? चोरून तें ठेवितो !
अन् जेव्हां सहचारिणी मज मुदें भेटावया येतसे
गालांना नच टोचतां तिज मिशा, घेतो मुके गोडसे "!!

❀ ❀

## कविता-गायन

मम कवन कुणा हें गाऊं रसिकांविना ?
क्षण कुणी जरी, श्रवुनि घे तरी, प्रसन्नता ये मना !
मज कवी न कोणी म्हणती कांहीं खरा
वा शाहिर नसुनी गोंधळ करितो पुरा
कीं बेसुर कोणी म्हणती गातो जरा
ह्या अपशब्दांनीं घडति जिवा यातना !
करि 'गिल्ला'[1] कोणी पडावया मी फर्शी
क्षणभरांत त्यांची मर्जी जाते कशी ?
अन् त्यांत कोठुनी मिळतां 'अंडी, भजी'
करि जखमेवरतीं प्रताप अपुला चुना !
गंधर्व-कवींचे[2] गान तुम्ही ऐकतां
वा श्वान भुंकतां मुकाटही सोसतां !
मग तुम्हीच माझें ऐका गाणें अतां
'हो दगड-देव तो', तुमच्यावांचुनि कुणां ?

---

(१) साहित्य संमेलनांत अगर कॉलेजांतून कविता-गायनाच्या प्रसंगी नवख्या कवीवर जो गिल्ला ( Attack ) करण्यांत येतो तो कुणास ठाऊक नाही ?

(२) 'गंधर्व' हे कोणी कवि नसून चांगल्यापैकीं काव्य-गायक आहेत असे कवि.

❋ ❋

## आडमुठा तो

(एक धक्कांतिका)

आंतरजातिय विवाह माझा ठरवुन मी तो, बहुत गाजला
वृद्ध पिता कंजूष खवळुनी धंदा निज, मम स्वाधिन केला !

चुंबित जागा घेउनि दुसरी तसाच धंदा पिता चालवी
आडमुठा तो सरळ जहाला सुंठीवांचुन हटे खोकला !

❋ ❋

## देवदासी झुंजते !

मंदिरामार्गे शिवाच्या प्रेमवेडी नांदते
धर्म भोळा भाविणी ही नित्य नेमें पाळते !

आरती होते शिवाची जेधवां सायंतनीं
देह शृंगारून तेव्हां अप्सरा संचारते !

गोड हास्यानें स्वतःच्या नेत्र-बाणांनी तशी
कैक भोळ्या भाविकांना मारुनीया टाकते !

कोकिळेचा कंठ लाभे गायनीं धुंदावते
थैथया नाचून केव्हां रंगढंगा दाविते !

मोगऱ्यांच्या मस्त माळा प्रेमिकांना अर्पुनी
भोग देई ती स्वतःचा हेरुनी श्रीमंत ते !

दैवयोगे जी बिदागी लाभते नी ओढते
त्यांवरी बेहोषुनीया जीवनाला पोसते !

लग्नबंधाने गळीं ती ना कुणाच्याही पडे
कोप देवाचा तदां हो ह्या भयें धास्तावते !

पाय देवाचे त्यजूनी जायचे नाही कुठे
ध्येयनिष्टा ही उरीची नेहमी जोपासते !

धन्य सेवा चाकरीने देवदासी झुंजते
भूल ही पाडील त्याला जो तिचे घेई विडे !

नाटकी घेती लुटूनी ह्या मृगीची कस्तुरी
बाह्यतः आनंदिता ही अंतरीं आक्रंदते !

❀ ❀

## ती नटी आणि तो कवि

नटी कोणी सौंदर्य नित्य राखी
चोरुनीया वय दाखवी चलाखी
कवी बुढ्ढा सत्तरी गांठलेला
युवक ऐंशीचा मिरवितो स्वतःला !

❀ ❀

## लगिनघाई !

तिच्यासंगें फिरतोस कशासाठीं ?
तुझ्या विषयीं आक्षेप लोक घेती !
प्रेम जमलें कां तिचें आणि तूझें
सांग मित्रा ! मज सत्य तें असें जें !

मित्र बोले– ' छे ! नव्हें तसें कांहीं
तिला अपुली मी मानतसे ताई !
स्नेह अमुचा हा नित्य वाढणार
लोकनिंदा मी तुच्छ लेखणार !'

' वरें ! ' म्हणुनी मी मूग गिळुन राही
नूर तिकडे बदलून मित्र देई !
बंधु-भगिनीचें त्यजुनि अतां नातें
(प्रेम त्यानें तिजसवें जुगविलें तें ! )

प्रेमरंगीं रंगतां जीव दोन
हाय ! आलें भलेंच तें घडून !
दिवस गेले ' लोटून ' तिला कांहीं
आणि झाली दोघांस ' लगिनघाई ' ! !

❀ ❀

## अनाथ नव कवी

कवि ' केशवसुत ' ते दोन कसे आढळले ?
' मनमोहन ' दुसरे बळेंच कीं उद्‌भवले !
' संजीव ' कवींतुन नकली हाय ! गळाले
कवि ' जननी – जनक – ज ' बेटे सर्व जहाले !
कवि ' एकनाथ ' ते सज्जन स्वामी ठरले
' निर्‌यमकी ' बनुनी ' रेंदाळकर ' कां फसले ' ?
हडकले ' निफाडकर ' स्वतःच गर्जुन ' नाथ '
' नव कवी ' एकला उरला मात्र ' अनाथ ' !

❀ ❀

## मळमळ

( दऱ्याखोऱ्यांत हिंडणाऱ्या शाहिराला एकसारखी 'तळमळ' लागते. प्रयत्नांतीं प्रसिद्धीस न येणाऱ्या नवख्या कवीस 'मळमळ' तरी कां सुटूं नये ? )

कधिं प्रसिद्ध कविता ह्या व्हायच्या कळेना।
करि अचाट मी प्रयत्न विजय तो मिळेना !

सतत बसुनि रात्रंदिन
निर्मितसें काव्य-कुरण
छापुनि परि एकही न
दृष्टितें दिसेना !

शाहिर, कवि सान थोर
काव्य-वृष्टि करिति घोर
दृश्य बघुनि तें समोर
स्फूर्ति आवरेना !

छापविण्या काव्यनिधी
आटविला रुधिरुदधी
संपादक 'वैद्य' कधी
विकृती बघेना !

'स्त्री' बनुनी मासिकांत
कविता जरि धाडिल्यात
बिंग फुटुनि दशदिशांत
होय मात्र दैना !

पैसा मम खर्चुनीच
काव्यग्रंथ छापण्यास
विनविलें प्रकाशिकेस
परि रुकार दे ना !

' ज्ञानागर मुंबइचें
निवडीना मम ' वेंचे '
अन् मालक ' हिज् मास्टर ' चें
कवन गीत घे ना !

' दूरदर्शनात ' कधी
लागेना मम वर्दी
आणि ' नभोवाणी ' ती
चुकुन बोलवेना !

सतत मिळविण्यांस नांव
धडपडतो तरि न वाव
कवितेचा कठिण हांव
अजुनही जिरेना !

' हा नाद सोड सोड '
मित्र करिति बोध गोड
मरणाविण दुष्ट खोड
जायची कधीं ना !

मळमळ ही नित्य अशी
नच देई सुख, सरशी
पाडुनिया तोंडघशीं—
अंतही करेना ! !

❀ ❀

## त्याचे जीवन

मिळे न जागा रहावयाला
बघुन नोकरी थकून गेला
बेकार बी. ए. लग्न कशाचे
जीवन जगतो पहात ' बॉबी ' !

❀ ❀

## अरे ! मी राजकवि झालों !

( माझे कवि-मित्र श्री. झोंटिंग भोकरकर, 'कणिका कुटी' संस्थान भोकरवाडी (बुद्रुक), हे ह्या दिवाळीच्या सुमुहूर्तावर 'राजकवि कसे झाले' ह्याचा वृत्तांत खालील कवितेंत सादर करीत आहे. चुकून तो खोटा ठरल्यास कवीचें त्यांत थोडेंच बिघडणार आहे ? )

'चंद्रशेखरां' नंतर 'तांबे' आणिक 'यशवंत'
काव्यगुणानें 'राजकवी' ते झाले प्रख्यात !
राजाश्रय लाभतां मिळतसे तनखा वर्षाला
मदत खरी ती गरीब कविच्या फुगत प्रपंचाला !
काय वाटलें कुठून मज हो एकाकी स्फूर्ती
'राजकवीही' बनून आपण मिळवावी कीर्ती !
( संपादक छापतात कविता फुकट सदा अपुल्या
पैची प्राप्ती त्यांच्याकडुनी कांहीं नच केल्या ! )
'राजकवी' मी व्हावें म्हणुनी प्रयत्न चालविला
यत्नावांचुन जगतीं सांगा लाभ कुणा झाला ?
अनेक संस्थानें तीं बघुनी भारत देशात
महत् प्रयासें अखेर शोधुनि काढियले त्यांत !
'भोकरवाडी' नांवाचें तें लहान संस्थान
रहिवासी मी झालों तेथें धरून अभिमान !
संस्थानिक तेथील 'घाटगे' समरबहादर
शिक्षण त्यांचें यथा यथा पण श्रीमंती फार !
वर्तमानपत्रांत तयांचा उदो उदो केला
लहान संस्थानाचा मोठा प्रताप गाजविला !
श्रीमंतांचा वाढदिवस जो येई वर्षाला
त्यांच्यावरतीं काव्य कराया नेम न मम चुकला !
संस्थानांतिल कामगिरी ती बघूनिया त्यांची
गुणवर्णनपर सरवत्ती मी केली काव्याची !

श्रीमंतांच्या मुला–मुलींच्या लग्नाच्या वेळीं
माझ्यावांचुनि ‘ मंगलाष्टकें ’ कोणी ना केली !
संस्थानांतुन ‘ कवी ’ म्हणूनी प्रसिद्धि मम झाली
वासरांत ती गाय लंगडी शोभुनिया गेली !
श्रीमंतांची स्वारी झाली मजवरती खूष
सहज म्हणाले आणि एकदां होउन बेहोष– !
“ काय बक्षिसी हवी तुला रे दे मज सांगून
काव्य तुझें वाचून जहाला वेडा मम प्राण ! ”
श्रीमंतांची मर्जी होतां मुजरा मी केला
आणिक वदलों–“ राजकवी मज करा तुम्ही अपुला ! ”
श्रीमंतांनीं लगेंच अपुला भरवुनि दरबार
“ राजकवी मी झालों ”, ऐसें केलें जाहीर !
‘ मराठशाही पागोटें अन् कांबळ ती काळी
भाला आणिक तसा मिळाला ‘ अहेर ’ त्यावेळीं !
जिकडे तिकडे होइ दवंडी नंतर संस्थानीं
‘ राजकवी मी बनलो ’, ‘ झालें सकलांच्या कानीं ’ !
हाय ! परंतू परप्रांतांतिल कवी तसे कवडे
साशंकेनें मजला बघती वासुनि कां तोंडें ?

❀ ❀

## म्हशीची शिंगे

(एक भारवाहिका)

मी घटस्फोटिता पतीपासुनी झाले
निज जीवन-तारूं हुषारिने सांवरले
पोटची मुलें ना पूर्व पती सांभाळी
शिंगे न म्हशीची बोजड तिजला झाली !

❀ ❀

## पैशासाठी !

(भूमिका – बेकार बी. ए.)

[कै. रेंदाळकरांसारखे कित्येक कवि 'प्रेमासाठी' वेडे होतात. हल्लींच्या काळांत बेकार झालेला एखादा सुशिक्षित तरुण 'पैशासाठी' पिसाट बनून गेल्यांस आश्चर्य मानण्याचे कारण तें काय ? आणि जगांत पैसा व प्रेम (कनक आणि कांता) यांचे वेड कोणांस नाही ? ]

पैशासाठीं पिसाट झालों मिळेल कैसें पोटाला
उडुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी काम मला !

वणवण फिरलों गांवोगावीं 'फर्म,' 'ऑफिसें' धुंडियलीं
'व्हेकन्सीच्या' नकारघण्टें नष्ट सकल ही तनु झाली !
चक्कर नशिबाची फिरली
वृत्ती आनंदित सरली
नव्हतीं व्यसनें तीं जडलीं
शून्य सर्व हें जीवित भासे, कठिण वेळ मध्यान्हाला
उडुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी काम मला !

पोपटपंची शिक्षण सारें खर्चुनि पैसा ज्ञान खुळें
पदव्या मोठया लक्षणिं खोटया, जीवाला नच ध्येय कळे !
विपरीता झाली सृष्टी
बेकारीची हो वृष्टी
सुशिक्षित (!) मी बहु कष्टी
नोकरि बघतो, धंदा नडतो, वशिला कोठें नच भिडला
उडुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी काम मला !

वय बहु झाले, लग्नहि दुर्लभ, मिळे कोठुनी मज कांता ?
'घर–जावई' वा 'दत्तक' कोणी घेइल त्या मी सिद्ध सदा !
मुग्ध-विरह परि हृदय चिरे
पैशावरतीं विश्व फिरे
मिळेल तो मज कसा बरें ?
चैन पडेना, बघुनि पत्रिका, भविष्य, व्रत सांगा मजला
उडुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी काम मला !

आप्त सोयरे कोण कुणाचे ? मित्रहि शत्रू ते बनती
'शिरेंच नसतां भुतें कोठलीं ? संकटकालीं मूढ मती !
पैसा करि अन्नान्न दशा
उडविल धनिकांचा फडशा
करील तो ती पूर्व दिशा
त्याच्यासाठीं भिक्षा मागूं ? अथवा बनुं कां चोर भला ?
उडुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी काम मला !

काय करावा उपाय सांगा, जीवहि द्यावा हाय गमे
विचार करुनी मस्तक फिरलें, परतंत्रीं जगणें न जमे !
देवाघरचा न्याय बघा
कुत्रें भरतें पोट न कां ?
मीच रहावा काय भुका ?
हळहळ वाटे 'स्थिती न ऐशी येवो कधिंही कोणांला'
उडुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी काम मला !

❀ ❀

## खुळा पदवीधर

प्राध्यापक कोणी जाहला 'एम्. ए.' 'पी.एच्.डी'
वकीलही बनला 'एल्.एल्.बी.' खेचुन पदवी ती !
शिक्षक तो आधी परीक्षा देउन 'एस्.एस्.सी'
टिकवाया पेशा जाहला नंतर 'एस्.टी.सी.' !
'बी.ए.' अन् 'बी.टी' मिळविल्या पदव्या नेटानें
नांवाच्या पुढती मिरविल्या सगळ्या ऐटीनें !
स्मृती तयां होई 'व्ह.फा.' पास झालों मी पहिला
क्षुल्लक की पदवी खुळा नच लावाया चुकला !
विकास पदव्यांचा घडविला, धनी बनून भला
सुखाविना अंतीं तयाचा विचका पण घडला !!

❀ ❀

## मी कवी नवोदित

मी कवी नवोदित धडपडतो नेहमी
श्रम कुठें कळेना पडती माझे कमी
स्फुरतात किती नव कविता रात्रंदिन
मासिकीं धाडितां, एक न ये छापुन !

नव कवी जमविले मित्र करूनी किती
स्थापिले तयांचे मंडळ शहरामधीं !
वर्गणी कुणी दे, कुणी न देतां तरी
दर महिना ' कविता-वाचन ' त्यांचे करी !

वर्षांत घडवितो नव कवि-संमेलन
जमतात कसेही बळें कवी नूतन !
श्रोते न पुरेसे कार्याला लाभती
पण अंगावर ये प्रचंड व्यय शेवटी !

मी काय करावे कळे न काही मला
मज कवी म्हणेना कुणीच; कां मी खुळा ?
छापतो स्वतःचा ' संग्रह ' खर्चुन भला
नच घेतां, बोला ' और कवी जन्मला ' !

❀ ❀

## तिचा मंगळ

ही नाजुक, सुंदर बाला माझी किती
मॅट्रीक पास ती पहिल्या वर्गामधीं !
गाण्याची तिजला अवगत आहे कला
सकलांस तिचा सुस्वभाव लावी लळा !

पत्रिकेंत आहे तिच्या परी मंगळ
उजवितां तिला मम सूड पुरा घेइल !

❀ ❀

## सैंपाकीण नव्हे मालकीण !

दुर्दैवाचा हाय ! अचानक घाला मजवर आला
कृतांत काळानें मजपासुन नेलें प्राणसखीला !
पोरें माझीं उघडीं पडलीं कोण तया मायेचें
कोडें पडलें लालन पालन त्यांचें करणें कैसें ?
'आई ! आई !' म्हणून संतत अकांत पोरें करती
रोदन त्यांचें कानीं पडतां तुटुनि आंतडीं जाती !
' रक्षण पोरांचें करण्याला आणिक सैंपाकाला
मिळेल एखादी का बाई ' ? विचार मजला पडला !
वर्तमानपत्रांत अखेरीं जाहिरात मी केली
नशिबानें त्यावेळीं माझी फसगत नाहीं झाली !
अहा ! लाभली सत्त्वर सुंदर गरीब विधवा बाई
स्वभाव आणिक गोड तिचा तो दिसून मजला येई !
लळा लागला तिचा मुलांना, तैसा तिजला त्यांचा
सुरळित गाडा चालू झाला पुनश्च संसाराचा !
निज मातेची हळूहळू मग मुलांस विस्मृति झाली
नकळत बाई नवीन त्यांना माता अपुली गमली !
चुकून त्यांनीं तिजला ' आई ' हांक अशी मारियली
हांक मात्र ती मम हृदयाला चरचर कापत गेली !
बनली ' आई ' ही जर त्यांची ( मनांत ये मग शंका
आज उद्यां वा खरोखरी मम होइल पत्नी ही कां ? )
चमत्कार अन् घडून आला थोड्या दिवसामध्यें
ती चंद्रा, मी सागर बनतां प्रीतिस आलें भरतें !
मनास मन तें जुळलें आणिक मंगल अमुचें घडलें
व्हायाचें तें होऊन गेलें ! किती जरीही चुकलें !
'सैंपाकिण मालकीण बनली '! जिकडे तिकडे झालें
' किर्लोस्कर ' मासिकीं तिचें अन् चरित्र छापुन आलें !!

❀ ❀

## कवि आणि चेटकी

दूर कोठे एकला जाउनीया
विडी खाकी कडकशी घेउनीया
धुंद होतो फुंकीत ती, जिवाला—
त्रासलेल्या, शांतता द्यावयाला !
कैक वर्षें ' नवकाव्य ' बहुत केले
कवी, शाहिर निष्प्राण जुने झाले !
एक माझे ' नवकाव्य ' कां उरावे ?
विडी फुंकित मी स्मशानीं रचावे !
आज तैसा मी रमुनि मध्यरात्रीं
विड़ी माझी ती पेटवून प्यारी
तर्र झालो ' नवकाव्य ' स्फुरुनि तेव्हां
कसे होई ठाऊक मात्र देवा !
स्फूर्ति कविला ती कधी कुठे येते
कीर्ति कविला ती कशी मिळुनि जाते ?
अर्थ कवितेचा, कळेना कुणास
' निरंकुश तो, ' पण समाधान त्यास !
असो; गढतां मी काव्य—समाधीत
शुद्ध नाही किति होइं फिर्र रात !
झोप रात्रीं जशि नसे चोरट्याला
निशाचर कां कवि समजतो स्वत:ला ?
अहा ! अद्भुत तों काय दिव्य झाले
' धन्य नाथा ' ! हे शब्द कुठुनि आले !
पुढे बघतां चेटकी उग्र ठाके
विकट हांसत जणु दाखवीत धोके !
' कवे ! नाथा ' ! ती थरारून बोले
" नविन कविता तव श्रवुनि धुंद झाले !
' प्रिया ' आतापासून समज मातें
नाथ माझा तूं ! जमे गोड नाते ! "

तिच्या शब्दें हदरतां, मी विडीचे–
जबर झुरके मारून, वदे वाचे–
" मुक्तछंदी–नवकाव्य–प्रिया माझी
तिच्यावांचुन मज तमा ना कुणाची " !
" असे सजणा ! बरळशी काय व्यर्थ ?
( गाढ आलिंगुन करी सर्व शर्थ ! )
कवी केव्हा नसतोच एकपत्नी
तुझ्या कवितेला सवत मला मानी ! "
नविन पत्नीचा लाभ असा झाला
भुरळ पाडी घालून काय घाला !
जादुटोणा मज तिचा हो प्रसाद
स्फुरे त्वेषें ' नवकाव्य ' रोज मस्त ! !

❀ ❀

## पाऊस पुरवला !

विसरलों घरांतुन छत्री मी घ्यावया
पाऊस भयंकर लागे तो यावया !
राहिलों उभा मी रस्त्याच्या बाजुस
पाहात वाट, थांबेल कधीं पाउस !

इतुक्यांत न कळतां ' माडी ' वरुनी कुणी
थुंकिला तांबडा लाल विडा खाउनी !
त्या पिचकारीनें कपडे मम रंगलें
जें नको कसें तें नशिबाला लागलें !

बोललों मनाशीं निघतां झणिं तेथुनी–
पाऊस पुरवला, ' लाल निशाणीहुनी ' !

❀ ❀

## पुढारी आम्ही

पुढारी आम्ही, आम्ही देशाचे, खरोखर सेवक जनतेचे !
निवडुनी येतो, येतो नेमाने, कसें तें कोणी ना जाणें !

स्वतःचा स्वार्थ, स्वार्थ साधण्याचा, आमुचा धंदा जगण्याचा !
बदलतो पक्ष, पक्ष नवे नित्य, कसे तें सांगावे सत्य ?

विदूषकी चाळे, चाळे करण्यांत, कळीचे नारद आमुच्यांत !
खेळतो रंग, रंगढंग कोणी, कुंपणावर त्या बैसोनी !

भांडणे कैक, कैक लावण्यांत, आमुचा सिद्ध असे हात !
मिळतां ती खुर्ची, खुर्ची मंत्र्याची, सोडण्या नाराजी आमुची !

वृद्ध जरी झालो, झालो तरि पक्के, तरुण ते अम्हाहुनी फिक्के !
प्रकल्प ते मोठे, मोठे ते रचतो, पुरे पण करितांना खचतो !

महर्गता वाढो, वाढो ती कितिही, काळजी आम्हाला नाही !
लावितो आशा, आशा जनतेला, फेकुनी धूळ किती वेळा !

सत्तेवर धांव, धांव घ्यावयास, हक्क तो सगळ्या पक्षांस !
निधर्मी पक्ष, पक्ष आमुचाच, पटवितो अन्य स्पर्धकांस !

स्पर्धक ते सारे, सारे कुचकामी, वहकती वृथा 'भ्रष्ट' आम्ही
राज्य स्थिर द्याया, द्याया देशांस, गर्जतो 'पक्ष आमुचाच !'
जंगी स्पर्धेनें, स्पर्धेनें आम्ही, राज्य ते चालवितो नामी !

पुढारी आम्ही, आम्ही देशाचे, खरोखर सेवक जनतेचे !

❀ ❀

## भकास संसार

विद्वान कुणी तो लेखक सत्ताधारी
ऐश्वर्य कुबेराहुनी तयाचे भारी
सुप्रिया मिळे त्यां हुषार, कर्तबगार
गृहरत्नावांचुन भकास पण संसार !

❀ ❀

## बेफाम बकरा !

बेफाम किती माजुनिया गेला हा बकरा
रस्त्यांतुनि जाइल हा देत बळें टकरा !

रात्रंदिन पोळासम भटकुनिया स्वैर
पोट भरे बाहिर हा वागुनिया गैर !
चिंता नच मालकांस हयाची ती कसली
गमतें त्यां ब्याद बरी बाहेरी टळली !

त्रास किती लोकांना देतो हा जबरा
धजतो ना हयाचा कुणि उतराया नखरा !

सायकल्च्या नव शिक्यांस भीत घोर घाली
आडवा हा येउनि त्यां पाडतसे खालीं !
स्वार असो 'विद्यार्थी,' 'शिक्षक' वा 'बाई'
शिक्षा हा सकलांना समतेनें देई !

धष्टपुष्ट हा खट्याळ गमतो गुंड खरा
लीलेनें अपुल्या पण हांसवि नारि–नरां !

बैरागी, बुढ्यांना लाजवील ऐशी
रुळणारी दाढी ती शोभे त्यां खाशी !
वासानें नुसत्या हा गर्दी पांगवितो
समरीं हा लढण्याला योग्य वीर गमतो !

यज्ञांला हयाच्याविण नाही पशु दुसरा
बळि जातां, म्हणतो हा,–" मजला ना विसरा " !!

❀ ❀

## तरुणींचा ताफा !

( युद्धजन्य परिस्थितींत नोकरी पटकाविण्यासाठीं एका 'रुक्ष' ऑफिसांत आलेला 'तरुणींचा ताफा' पाहून ही कविता स्फुरण पावली आहे. )

चुकून आला आज कचेरिंत ताफा तरुणींचा
बागबगीचा फुलला खडतर वातावरणाचा !

एकामागुन एक किती ह्या मुली इथें जमल्या
माळेमधल्या मुग्ध कळ्या कीं दिसती फुललेल्या !

जाइ, जुई, मोगरा, मालती, गुलाब, शेवंती
सुवास उधळत सर्व तऱ्हेचीं सुमनें ही येती ?

आकाशांतिल लुकलुकणाऱ्या अवतरल्या तारा
कारंजाच्या उडून किंवा आल्या जलधारा !

गंधर्वाचें विमान नटलें दिव्य अप्सरांनीं
'छत्र्या' घेउनि उड्या टाकिल्या काय इथें त्यांनीं ?

'नागकन्यका' भरून आली कोंकणची नाव
पोटासाठीं इथें घेतली सर्वांनीं धांव ?

गंगेवरती तरंगणाऱ्या दीपांच्या माला
हांसत, नाचत इथें पातल्या किंवा वनमाला ?

फूलपांखरें, कबूतरें छे ! चिमण्या गुलजार
मनांत आल्या धरून कसल्या आशा दमदार ?

बुलबुल, भारद्वाज, कोकिळा, मयूर, चंडोल
त्या पक्ष्यांचा 'ऑर्केस्ट्रा' हा जमला बहुमोल !

सुवर्ण, चांदी, हिरे, माणकें, जवाहीर, मोतीं
सराफजीच्या तिजोरींतुनी प्रदर्शना येती !

यमुनेकांठीं गोकुळांतल्या गोपी त्या सगळ्या
खेळायाचें सोडुन येथें आज कशा फिरल्या ?

धांगडधिंगा घालायाची सोडुन मधुरात
मुली मंगळागौरीच्या कां येथें जमल्यात ?

' संक्रांतीचें वाण ' घेउनी नाजुक हातांत
नटुनी थटुनी गोंडस बाला आल्या डौलांत ?

चैत्राचें तें ' हळदीकुंकू ' किंवा लुटण्याला
' हुजूरपागा ' उधळुन आला पोरींचा मेळा !

तिलोत्तमेच्या स्त्री-राज्याचा शेवट होऊन
उरली सुरली फौज काय ती आली धांवून ?

मात्र फौज ती बघून कवि हा वेडावुन गेला
नव्या युगीं त्या गमे जमाना नवा सुरू झाला !

जेथें तेथें तरुणांसोबत तरुणी येणार
भिडवुनि खांदा खांद्याला अन् कामें करणार !

कामामध्यें परस्परांचें मन घेइल ओढ
सायासाविण जमतिल लग्नें प्रीतीचीं गोड ! !

❀ ❀

## मेयर, म्हैस आणि मोटार

जनता-करप्राप्तीवर मेयर नवीन मोटर घेती
सहल खाजगी करावयाला मित्रांसह ते फिरती !

जातांना तो प्रवास त्यांचा मजेत झाला सगळा
हाय ! परंतू येताना कां प्रसंग बांका घडला ?

भली दांडगी म्हैस आडवी वाटेमध्ये आली
बुजुन बिचारी मोटारीला धक्का देती झाली !

त्या धक्याने बहुत चुराडा मोटारीचा झाला
कॉर्पोरेशन निमूट सोशी खर्च भला जो आला !

❀ ❀

## मी आणि मामा

घरीं तो सोडमुंजीचा निघाला सोहळा माझा
बघाया आप्तही आले स्वधर्मांतील त्या मौजा !

बटू तो ब्रह्मचारी मी निघे जों काशियात्रेला
अहा ! धांवूनिया मामा मला ये थांबवायाला !

वदे–'रागावुनी ऐसा नको काशीस रे जाऊं
तुला देईन मी कन्या, कशी माघार घे पाहूं !'

'बरें !' बोलूनिया तेव्हां घरा ये आमुची 'स्वारी'
मनीं ते शब्द मामांचे परंतू ठिंबले भारी !

पहा गोष्टीस त्या आतां पुरेसा लोटला काळ
वयें मी वाढुनी, पेटे जिव्हारीं प्रीतिचा जाळ !

कराया मागणी गेलों मुलीची खास मामांना
स्मृती मागील शब्दांची करूनी मी दिली त्यांना !

विडी फुंकूनिया मामा म्हणाले,–'थाप ती होती !
धुराचे लोट हे जैसे फुका ते शब्द मी काढी !'

धुराचे लोट पाहूनी तसे ते जाणुनी शब्द
कपाळा हात मारूनी अरेरे ! जाहलों सर्द !!

❀ ❀

## और सिनेमा

शाळेमधल्या कुठल्या एक
मुलीस नाही स्वतंत्र खोली
मधल्या सुट्टीमधे बिचाऱ्या
उन्हांत फिरती पिऊन पाणी !

हेड्मिस्ट्रेसला सुन्दर ऑफिस
जवळ आणखी स्वतंत्र खोली
आत कॉट नी प्रियकर शिक्षक
दिवसा ढवळ्या मौज मारती !

त्या खोलीच्या दाराला पण
छिद्र पाडले अचूक कोणी
छिद्रामधुनी जातां येतां
मुली पाहती 'और सिनेमा'!!

❀ ❀

## मावशीची आठवण

(स्थळ–अन्नपूर्णा भोजनालय. प्रो. मावशीबाई)

जेवण्या जों मावशी गे! दार तूझें गांठलें
तोंड तूं जें चालवीलें मी दडूनी ऐकिलें !

सोवळ्यानें तूं चुलीशीं बैसुनी पाकगृही
तूं उपाशी रागवीशी ऐन बारा वाजलें !

भाकरीचें पीठ थाळीं झरझरा त्या थापुनी
फुंकुनीया फुंकुणीनें इंधनां तूं निंदिलें !

तांबड्या रंगात शोभे ' सोवळें ' अंगावरी
लाल झालेल्या मुखाला लाजवाया नेसिलें ?

सोवळें तूझें पुराणं पाहुनीया वाटलें
' शंकराचार्यास ' येथें आज वा पाचारिलें ?

थांबलों ओशाळुनी अन् चोरुनी मी ये पुढें
नाद तों ये ' थप्प ' कानीं काय झालें पाहिलें !

थापणें जोरात चाले त्याच नादीं रंगलों
तोंडही ना ये धराया स्वैर तूं जें सोडिलें !

' थापतांना भाकरी तूं तोंड सोडावें खुलें
चोरुनी ऐकून मीही तृप्त व्हावें,'–वांछिलें !

तोंच येई श्वान तेथें! भाकरी ने ओढुनी
शूर तूं शासावया त्या शस्त्र तेव्हां शोधिलें !

मारण्यासी फेंकिली तूं ती चुकूनी फुंकणी
खोंक पाडी मात्र मातें खूण राही त्यामुळें !

❀ ❀

## तो कारकून आणि लेखक !

असे सरकारी कुणी कारकून
काम करणें तें गमे त्यास न्यून !
मान मोठा जरि नसे लाभलेला
मनीं समजे तो शाहणा स्वताला !

मिळे दैवानें त्यास जो पगार
त्यास वाटे तो अल्प बेसुमार !
वृत्ति नाहीं त्यांतून समाधानी
मात्र वरुनी दाखवी स्वाभिमानी !

काम कोठेंही जरी तयें केलें
' फार ' म्हणुनी तो मदत हवी बोले !
देह ज्याचा मुळचाच सुदाम्याचा
भार कसला त्यां सहन व्हावयाचा ?

व्यसन नाहीं त्या पान–तमाखूचें
वेड मोठें पण फार लेखनाचें !
कथा, काव्यें, इंग्रजी सुप्रसिद्ध
लिहित असतो चोरून मराठींत !

स्वतालागीं समजून ' ब्रह्मचारी !'
मात्र प्रीतीच्या कथा तो चितारी !
विवाहाचा काढतां प्रश्न त्यासी
स्तब्ध राही हा नवा रामदासी !

फिरायाला जेधवां दूर जातो
छुपा ' कॅमेरा ' जवळ वाळगीतो
अचुक दिसतां मार्गांत ' मस्त ' बाई
तिचा बेमालुम ' स्नॅपशॉट ' घेई !

थोर व्यक्तींची घ्यावयास भेट
काढि दौरा हा करुनि पायपीट !
मिळे त्यांतुनि जर ' नटी ' अकस्मात
मुलाखत तो रंगवी मासिकांत !

पुरोगामी हा म्हणवितो स्वताला
त्यजुनि कमरेचें बांधि मस्तकाला !
दौड अकलेची मारि लांब लांब
घाल देवा ! तरि त्यास तूं लगाम !!

❀ ❀

## प्रेम तूझें झूट सारे

तूं दिली तारीख वेडे ! वेळ तैशी सांगुनी
तूं इथें येतां न माझा जीव गेला टांगुनी !

तो सिनेमा ' शो ' बुडाला व्यर्थ पैसे खर्चुनी
चंपकाची मस्त वेणी हाय ! गेली वाळुनी !

वाट तूझी पाहुनीया त्रासलो, कंटाळुनी
कां निराशा–बाण देशी हया जिव्हारीं खोचुनी !

शब्द होता तूं दिलेला मी बसे विश्वासुनी
काय स्त्रीला हया म्हणावे ? जी न शब्दां जागुनी !

प्रेम तूझे झूट सारे चंचला तूं दुर्गुणी
नांव तूझे यापुढे मी पार देतो टाकुनी !

वर्तनानें आपुल्या तूं भूल कैकां पाडुनी
नाचवीले, नागवीले चीज, पैसा लाटुनी !

मार्ग तूझा मुक्त आहे स्वैर जा संचारुनी
बेइमानी कोण स्त्रीला घे सखी सन्मानुनी ?

❀ ❀

## जाहीर सभा

( शहरांत सभा भरविणाऱ्या एका चालकाचें मनोगीत )

अजुनि कसे येती ना नागो, नरसोबा ?
वेळ सरे, होइल कां नाहीं आज सभा ?
उशिर होइ जमुनीया लोकांचा मेळा
गोपिनाथ, गंगाधर झुलती कामाला
बसविति ते लोक जरी माजतसे तोबा
वेळ सरे, होइल कां नाही आज सभा ?
जागा ती भव्य कुठें नेमुनि जी दिधली
विषय छान ऐकतांच गर्दी बहु झाली !
शिस्तीचा कोणावर नुरला मग ताबा
वेळ सरे, होइल कां नाही आज सभा ?
हंसविणार कादरखाँ भाषण तें करुनी
रसिकांना रिझवाया बिजली ये सजुनी !
बोलण्यांस इतरां जरि होती आज मुभा
वेळ सरे, होइल कां नाहीं आज सभा ?
ओसरल्यावर गर्दी मौज न ती कसली
अधिपति पण जोडी कां अन्य सभेंत रमली ?
दारावर वाट बघत कुठवर राहुं उभा ?
वेळ सरे, होइल कां नाहीं आज सभा ?
पुटपुटला तो मिशाळ अशुभ इथें कसलें ?
अंत्यविधीस्तव दोघे जातांना दिसले !
राख अतां तूंच लाज माझी जगदंबा
वेळ सरे, होइल कां नाहीं आज सभा ?

**जाहीर सभेंतील पात्रें**:–

**नागो**–स्वागताध्यक्ष, **नरसोबा**–अध्यक्ष
**गोपिनाथ**–, **गंगाधर**–व्यवस्थापकांची जोडगोळी
**कादरखाँ**–मुख्य वक्ता, **कु. बिजली**–काव्यगायिका
**मिशाळ**–एक मास्तर, **जगदंबा**–संकट निवारणारी देवी

❀ ❀

## धौती-योग अघोर !

( एक अजब कविता ! चमत्कारिक विषय ! तऱ्हेवाईक शेवट ! )

धौती-योग अघोर
विलक्षण धौती-योग अघोर
प्रयोग त्याचा साधायास्तव धरणें धैर्य कठोर !

फार पुरातन काळामध्ये
ऋषी मुनी जे नांदत होते
प्रयत्न त्यांचें भलते सलते
ह्या योगाचा शोध लाविती करून कांटेकोर !

तेल न परिचित एरंडीचे
चूर्ण विरेचन ना त्रिफळाचे
रेचक साधन ना कसलेसें
स्वच्छ राखण्या उदर सुचे त्यां उपाय नामी थोर !

विरल पांढरे वस्त्र घेउनी
टोक धरोनी, मुखीं घालुनी
चावत चावत तें चवळूनी
गुदद्वारातुन टोक दुजे ये, धरती घट्ट समोर !

खसाखसा मग वस्त्र घुसळती
मळ जे उदरीं साठुन वसती
वस्त्र खेचतां अचूक निघती
कुदरत राहुन ठीक, होति मग उदर-रोग कमजोर !

नव्या कवींनो ! तुम्हां कधीं जर
चुकून घडला पोटदुखी ज्वर
अनुभवतां हा योग खरोखर
स्फुरतिल ना कधिं तुम्हांस कविता धों धों, हीन, चटोर !

❀ ❀

## नटीच्या नवऱ्याचें गाऱ्हाणें

लग्न नटीशीं लावियलें मी हाय वरें कुठुनी
पश्चात्तापानें मन माझें जातें जळफळुनीं !

वरच्या नकली सौंदर्याला भुलला मम जीव
आधीं कळला नव्हता तिचिया हृदयाचा ठाव !

माझ्या श्रीमंतीवर चाले रोज तिचा थाट
पैसे मिळती जे तिजला ती टाकी शिल्केंत !

'स्टुडियो'त ती सर्व दिवसभर कामाला जाते
संध्याकाळीं मोटर घेउनि दूर कुठें फिरते !

दिवेलागणी हो मज तैशी लागे हुरहूर
'अजून येती घरीं न कैशा राणी सरकार'?

कधीं कधीं तर घरास येते रात्रीं अपरात्रीं
रागानें तिज बोलायाची त्यांत मला चोरी !

झोंप लागलेली मज बघुनी जवळ न ती येते
कुशीस अपुल्या घेउन निजते कुत्रें आवडतें !

आठवड्यांतुन ज्या ज्या दिवशीं सुट्टी तिज मिळते
भेटाया तिज अलोट गर्दी फुकट्यांची जमते !

'खास मुलाखत' छापाया कुणि संपादक येतो
फोटोग्राफर फोटो घ्याया उगाच धडपडतो !

करारनामा करावयाला मालक नव येती
जलसा गाण्याचा ठरवूनी हौसी जन जाती !

विमा कंपनीचाही येतो दलाल धांवूनी
नवीन साबण देऊन घेई अभिप्राय कोणी !

दिग्दर्शक अन् त्यांतुन येतां घेउन मोटार
फिरावयाला घेउन 'मैना' जातो बाहेर !

उघडया डोळयांनी मी बघतों तिचे असे खेळ
सहवासाचा लाभ तिच्या मज नाही क्षणकाल !

अनेक अफवा तिजविषयीं जन देती पसरून
रोज रोज त्या ऐकुन जातों मनांत करपून !

भोळाशंकर मी, ती गंगा डोक्यावर बसली
स्वातंत्र्याचे हक्क हिरावुन डोईजड बनली !

ताटाखालीं तिनें बनविलें मजला मार्जार
बिनशर्तीची तिच्यापुढे मी घेतों माघार !

नीरस माझे जीवन असलें, कसला पुरुषार्थ ?
लग्न नटीशीं लावियलें मी ह्या जगतीं व्यर्थ !

घटस्फोट ती घेउन माझा जाऊं दे देवा !
मिळेल माझ्या मनास शांती कायमची तेव्हां !!

❀ ❀

## पिता म्हतारा
(एक जिकीरिका)

धर्म अपुला सोडून कुणी बाला
अन्य धर्माचा तिने पती केला
दूर देशीं नांदते पियासंगें
पिता म्हातारा त्यजुन एक मागें !

सरुनि वैभव, कुणि जवळ ना दयेचे
श्वान खाईना हाल बापुडयाचे !
निरूपायें तो मुलीकडे जाई
जिणें जिकिरीचे जगत काय राही ?

❀ ❀

## माझें नाटक

( एका उदयोन्मुख नाटककाराची ही एक ' रडकथा ' आहे. कोणांस ती ' सत्यकथा ' अगर ' भाकडकथा ' वाटल्यास कवींचें त्यांत थोडेंच बिघडणार आहे ? )

हें ज्वलंत नाटक मी लिहुनी
कां रंगभूमिवर घे न कुणी ?

स्फूर्ति भयंकर येतां दाटुन
कचेरिलाही बुट्टी देउन
अनेक रात्री जागुन जागुन
मी नाटक लिहिलें धडपडुनी !

पूर्ण कसेंतरि नाटक झालें
काम हातातिल संपुनि गेलें
कोडें पण मजपुढती पडलें
करणार कोण हें रंगवुनी ?

लेखक त्यांतुनि मी नवखा तो
आंग्ल कथा अनुवादित करतो
कणिकासम लघु काव्यें स्फुरतो
अन् नाटककार अतां बनुनी !

जीवन माझें का कारकुनाचें
समाधान मज नाहि कशाचें
गमतें नाटक देईल पैसे
जाईल दैन्य मग ओसरुनी !

कंपनीस हें कुठल्या देऊं
कुणा कुणाला वाचुनि दावूं
अचूक वशिला कोठें लावूं
मन गेलें माझें गोंधळुनी !

'मिळेल बक्षिस नाटक धाडा'
जाहिरात ती पत्रीं दिसतां
नाटक तेथें धाडुनि देतां
ये प्रसंग भलता ओढवुनी !

पुरती जिरली ! बक्षिस कसलें ?
गहाळ तेथें नाटक झालें
कसेंबसें ते परत मिळालें
दप्तरीं अतां आहे कुजुनी !!

❀ ❀

## चोरावर मोर ! नाटककार ! !

लेखक हे बनति चोर ! सिने-चित्र पाहून
पोळ जणू चरति स्वैर, ताव फुकट मारून !

परदेशी चित्र जिथे नविन जों न लागे
उद्योन्मुख लेखक झणि होउनिया जागे
धाव घेति अचुक प्रथम चित्र पाहण्याला
चित्रांतिल विषय-सूत्र खास हेरण्याला

बगळ्यांची स्पर्धा मग जाइ खरी लागून
पहिल्याने ती शिकार कुणि घ्यावी साधून !

चित्र विषय चोरुनि कुणि लेख लिहुनि जातो
दुसरा त्या विषयांवर दीर्घकथा रचतो
नाटक नव काढुनि पण त्यांवर और कुणी
जिंकुनिया फड जाई धन, कीर्ती मिळुनी

सकल अशा चोरांना रसिक जरी जाणून
चोरावर मोर दिसे नाटककार खुलून !

❀ ❀

## नटीचें रडगाणें

हाय ! हाय ! मी कुठून ती नटी जहालें
'सभ्य स्त्री' नांव खरें पार मम बुडालें !

पडुनि कशी मजसि भुरळ
आप्त-इष्ट त्यजुनि सकल
सिनेमांत कीर्ती, धन मिळविण्या निघाले !

नट आणिक दिग्दर्शक
प्रेमवीर सर्व लोक
सांगुं कसें करति तिथें नित्य प्रेमचाळे !

संगतींत मी त्यांच्या
आधिन हो व्यसनांच्या
'मद्य', 'रेस' पायीं धन जाइ जें मिळालें !

मजविषयीं शंका त्या
घेती जन भलभलत्या
शीलावर मम खुशाल घालतात घाले !

रूप, गुणांविषयीं तर
लेखक ना करुनि कदर
टीकेचें ओकतात गरळ तें निराळें !

धंदा हा पत्करला
काय गुन्हा हो घडला ?
कला-प्रेम रसिकांचें वाटतें निमालें !

यौवन जों रसरसतें
काम कुठें तरि मिळतें
सरतां तें, जग वदेल–'बाई ! कर काळें !!'

❀ ❀

## चित्र–निर्माता

काढिला त्यानें सिनेमा साहसानें भारुनी
' नांव तें होणार मोठे ' स्वप्न सारे कोरुनी !

कैक लाखांचा चुराडा जाहला, पर्वा कुठें
' चित्र व्हावे दिव्य ऐसी जिद्द कां संचारुनी ?

भव्य त्या चित्रांत व्हाया सर्व कामे नेटकी
ख्यात पात्रें गाजलेली, खेचली कीं हेरुनी !

गोष्ट नामी, गोड गाणी, धुंद नृत्यें विक्रमी
सज्ज झाला तो सिनेमा सर्व कांही चित्रुनी !

दाखवाया तो सिनेमा प्रश्न ये आँ वासुनी
मुंबईची सर्व कोणी मंदिरें घे, घेरुनी !

कोंडमारा ऐनवेळीं जाचुनीया जाणवे
जेथ तेथें हाय ! स्पर्धा कां खडे दे चारुनी ?

अन्य गांवीं तो सिनेमा, दाखवीतां कोसळे
चित्र-निर्माता कपाळां हात घेई मारुनी !

❀ ❀

## कणिका

शबरीची ती बोरे देवा ! आनंदानें घेशी
सुदामजीचे पोहे मोठ्या आवडिनें तूं खाशी !
विदुराच्या त्या कण्या तशाही मानुनि घेशी गोड
नव कविच्या मम ' कणिका ' ! घ्याया भली काढशी खोड !

**कणिका–**

( कणिकेच्या गोळ्या. नव कवींचा खास साहित्य प्रकार )

❀ ❀

## पुणेरी पगडी

ही पगडि राहुं द्या डोक्यावरची अजून
कुणि उडवुं नका हो तिला ' पुणेरी ' म्हणून !

केली न ' वकीली ' पुण्यांत जरि राहुनी
वर्तमानपत्रीं घेतां तनु वाहुनी
बनलोंच पुढारी पगडी मी घालुनी
पण देशभक्त मज कुणी म्हणेना चुकून !

' गांधाळ ' लोक ते खादीविषामधें
तत्त्व तें तयांचें मला मुळीं नावडे
मम पगडीवरतीं सदा फोडुनी खडे
अर्पिती मला ते खादीं टोपी ' टिचून ' !

निर्धार परंतू निश्चित माझा असे
मी पेशवाइच्या खुणेस राखीतसे
सामर्थ्य पगडिचें तुम्हांस सांगू कसे ?
तो येइ फिरवितां येतां संकट कुठून !

आहेर कितीही तुम्हीं मला अर्पिलें
ते जतन करूनी ठेविन मी चांगले
नच पगडी टाकिन तुमच्या हेक्यामुळें
मी मेल्यावरती जाळा तिज कुरतडून !

(' पुणेरी जोडा ' व ' पुणेरी टांगेवाला ' यांच्याप्रमाणेच ' पुणेरी पगडी ' ही आता अदृश्य होत जावी ना ? अरेरे ! )

❀ ❀

## मिलाफ

विद्वान कुणी तो क्षत्रिय पदवीधारी
हो साहित्यिक नी छुपा समाज पुढारी
जात्यंध स्वतःला सुधारवादी म्हणतो
जनसंघ पक्ष पण मनांत शत्रू गणतो !

निज जातीची त्यां कट्टर पत्नी लाभे
काँग्रेसमधें जी कार्यधुरंधर शोभे
पण हाय ! अकालीं गेली जग सोडून
ठेवून पतीला मागें कन्या सान !

हिरकणी पित्याची एकुलती अल्बेली
जणुं चंद्रकलेसम वाढत कन्या गेली
कॉलेजमध्यें ती मिळवुन जाई कीर्ती
वक्तृत्व, काव्य नव कलेंत करुनी प्रगती !

कम्युनिस्ट तियेचे विचार बनले पुढती
कॉलेज-मित्र कुणि तिला मिळाला साथी
जो हुषार, सुन्दर तिजसम प्रेम-दिवाणा
जमविलें तयाशीं प्रेम तिनें शिकतांना !

पण निघे तुर्क तो ब्राह्मण जनसंघाचा
कळतांच पित्याचा भडका उडला खासा
गाजला अखेरीं विवाह सत्प्रेमाचा
अन् मिलाफ झाला जातींचा, पक्षांचा !

❀ ❀

## साहित्यिक तो बने बुवाजी !

लेख विनोदी लिहून ज्याने हांसविले सकलांना
स्वीकारुनिया मौन जहाला कोण बुवा तो जाणा !

करुनि करुनि भागला देवपुजेस लागला
पुत्र नांव काढतो कृतार्थ जन्म मानतो !

दीनदास त्या महाराजांची दृष्टि कृपेची जडली
साहित्यिक तो बने बुवाजी विचित्र घटना घडली !

चला चला, पळा पळा, शिष्य शिष्यिणी बना
सुवर्ण पर्वणी अशी कधी न यायची पुन्हा !

प्रवचने महाराजांची बुवाजी नित्य सांगती
जमूनी भाबड्या बाया वाती वळत ऐकती !

दिलेली प्रवचने सारी डोक्यावरुन वाहती
बुवाला बायका भोळ्या माळुनी, मानती किती ?

' करावे काय हो कोणी करीना कोणि सांगून
जयां जें साधतें त्याने करावे मात्र ठासून !'

❀ ❀

## दत्तक

मी कशास देवा ! दत्तक हा घेतला
सज्ञान कुठें जों आतां नच जाहला
भांडून भयंकर संपत्ती मागतो
मी मरतों केव्हां वाट सदा पाहतो !

मज वृद्धपणीं हा छळतो बेटा असा
मग मेल्यावरती पाजिल पाणी कसा ?

❀ ❀

## श्रीमंतांचा व्याही

श्रीमंत कुणी ती सरदाराची लेक
कॉलेजमधे जी शिकावयाला जाई
अन् तिथे शिकाया सालस मुलगा एक
जो श्रीमंतांच्या गरीब कारकुनाचा !

तो हुषार आणिक दिसावयाला छान
श्रीमंत मुलीचे जडे तयांवर प्रेम
सरतांच तयांचें शिक्षण, झाले लग्न
अन् कारकून हो व्याही श्रीमंतांचा !

❀ ❀

## जनता पार्टी ! वाहवा ! चाले राज्य झकास !

(एक नवलिका)

देशावर ये संकट खास
आणीबाणी काय इलाज ?
'अंधेरेमें एक प्रकाश
जय प्रकाश ! जय प्रकाश !'

आजारें त्यां जडला पाश
मृत्युस त्यांच्या जरि अवकाश
लोकसभेतिल सत्ताबाज
वाहति श्रद्धांजलि तयांस !

नाचक्की ये दिसुन जगांस
वाहवा ! चाले राज्य झकास !

❀ ❀

## युरोपियन गव्हर्नर, म्हैस आणि फौजदार

गणेशखिंडीहुनी निघाली गव्हर्नरांची स्वारी
'कौन्सिलहॉल'मधें पोंचण्या भरवारांस दुपारीं !
अकरा वाजुन जातां धांदल पोलीसांची होई
कडक पहारा रस्त्याला तो होता ठायीं ठायीं !
'स्वारी' निघतां जिकडे तिकडे होई कर्कश शिट्टी
सज्ज राहुनी पोलिस तेव्हां मार्ग रोखुनी धरती !
चौकाचौकावरीं थांबली वहातुक लोकांची ती
टांगे, मोटारी अन् गाड्या पुढें न कांहीं जाती !
गाइ-म्हशींना आवरुनीही गवळीदादा कोठें
रस्त्याच्या बाजूस राहिले खडेच जेथें तेथें !
भरकन् धांवत गव्हर्नरांची नजीक मोटर आली
'ससून इस्पीतळा' समोरीं गंमत कसली झाली ?
अफाट गर्दी बघून आणिक शिट्या ऐकुनि कानीं
भली दांडगी म्हैस बुजूनी धांवत सुटली कोणी !
धांवत धांवत रस्त्यामध्यें येइ आडवी अगदीं
बाजुस करतां तिला अखेरीं थकले पोलिस दर्दी !
फौजदारानें दंडे मारुनि जर्जर तिजला केलें
जागेची परि ती न हालली ! उपाय सारे हरले !
अंवतीं भंवती गडबड आणिक हंशा, ओरडा चाले
भली म्हैस ही खाष्ट भेटली ज्याला त्याला गमले !
क्षणार्धात तों गव्हर्नरांची मोटर तेथें आली
रहदारी ती खुली न बघतां खोटी त्यांची झाली !
दोनच मिनिटें, मोटर त्यांची रस्त्यामध्यें थांबे
उशीर तितुका झालेला पण मनांत त्यांच्या झोंबे !
कामावर जो फौजदार त्या जागीं तेव्हां होता
दुसऱ्या दिवशी लगेंच त्याच्या हातीं पडला खलिता !
"कामांवरुनी दूर तुम्हांला, आजपासुनी केलें"
'फौजदारांला म्हैस भोंवली' हंसून जो तो बोले !

❋ ❋

## घेतली कशीतरी स्वाक्षरी !

अचाट यत्नान्तरी        घेतली कशीतरी स्वाक्षरी !
स्त्रीपुरुषांचा अफाट मेळा
जमला होता आज सभेला
सुंदर वक्ता त्यांत लाभला
संधी येउनि खरी        घेतली कशीतरी स्वाक्षरी !
सभा शेवटीं जों न संपली
फलाटवरतीं पोरें जमलीं
स्फूर्ति मला येउन त्यावेळीं
घुसुनि अघाडीवरी        घेतली कशीतरी स्वाक्षरी !
गर्दीमधुनी पुढती घुसतां
धक्काबुक्की करतां करतां
घामाघुम जिव झाला नुसता
सोसुन हें संगरीं        घेतली कशीतरी स्वाक्षरी !
धांदल माझी कोण उडाली
गर्दीमध्यें टोपी गेली
वहाण पायांमधली तुटली
हानी झाली तरी        घेतली कशीतरी स्वाक्षरी !
चष्मा डोळयावरचा फुटला
कोट-खिसा कुणि कापुनि नेला
चित्त न ठायीं त्यावेळेला
शिस्त मोडुनी बरी        घेतली कशीतरी स्वाक्षरी !
स्वयंसेवकांनीं मज धरलें
वक्त्यापासुन दूर लोटलें
ब्रीदाचें नच तारूं झुकलें—
उलटा वारा जरी        घेतली कशीतरी स्वाक्षरी !
दुःख संपतां काल सुखाचा
कष्टानंतर लाभ 'सही'चा
अखेर मजला हो कायमचा
खात्री पटुनी पुरी        घेतली कशीतरी स्वाक्षरी !

❋ ❋

## विद्वान वडा तो

विद्वान वडा तो गीर्वाणभाषिक सिद्ध
करि कुणी प्रकाशक त्याचा ग्रंथ प्रसिद्ध
मित्रास भुलवुनी स्वतः समीक्षा लिहितो
अन् नांवे त्याच्या छापायाला देतो !

ती छापुनि येतां, वरळे मित्र चुकून
'विद्वान स्वतःचे स्तवन करी दणकून' !

* *

REFBK-0025274
REFBK-0025274

## नवोदित कवीचे तीन प्रयत्न

अनुदानाची कुमक घेउनी
नव कविचा तो संग्रह पहिला
कविता चिल्लर, त्यां न प्रसिद्धी
धुळीत पडला, पार कुजूनी !

कवितावाचन करण्याकरिता
वळें कुठे कवि लावी वरणी
आवाज किरटा, थिल्लर कविता
दाद न लाभे रसिकांकडुनी !

नाट्य-सिनेमा गीतांवरतो
शुष्क विडंबन कविता रचल्या
वाद्यवृंदसह निष्प्रभ ठरल्या
कार्यक्रमाने, ठोकर बसुनी !

ईन, मीन ते प्रयत्न तीन
कोसळले, तरि कवी डरे न ! !

* *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६९
ग्रा. क्र. २६२७८
काव्य
२५।१२।८०

## अखेरचा मी-

निसर्ग-गीते गाउनि गेले सृष्टिसतीचे बालकवि
विलीन होतां संस्थाने ती उघडे पडले राजकवि !
काव्यकलेवर जीवन जगती कसेबसे ते लोककवि
नवकाव्यें दुर्बोध खरडती सांप्रतचे चवचाल कवि !
बोली भाषा घुसडुन मिरवी स्वत:स कुणि ग्रामीण कवि
ज्वलंत विद्रोहाने जळुनी ठणठण करती दलित कवि !
दो शब्दांचे यमक साधुनी 'इष्क' घुसळती गझल् कवि
दो ओळींची रचुन शायरी करति गर्जना शेर कवि !
चटोर वात्रटिकाही स्फुरती दाढीदीक्षित शिष्ट कवि
जपान 'हायकू' प्रसवुन बनती बळेंच नर 'बायकू' कवि !
महाकवि न कोणी निपजे
अध:पतन हे काय असे ?
नवकाव्याच्या आगित ओतुनि तेल; योजितो युक्ति नवी
अखेरचा मी बनून जातो पुरा नाटकी गुंड कवि !

(पुण्यात जसा गुंडाचा गणपती (विनायक) प्रसिद्ध; तसा हा कवी !)

## कवी शिकंदर कीं बिलंदर ?

जन्मत:च तो कवी शिकंदर प्रयत्नवादी बने धुरंधर !
काव्य कलेस्तव जीवन अपुले तन, मन, धन सर्वस्व वाहिले
कुशल कार्य तें स्वयें फुलविले करी तपी तप तीव्र निरंतर !
कविता करण्याविना न छंद पुरा बने तो वेडा धुंद
देई रसिकां पूर्णानन्द जातिवंत तो खरा कलंदर !
घोर संकटें अनंत आली डरे न अगदी दुर्धर काळीं
ज्वलंत प्रतिभा वैभवशाली निर्मुनि देई काव्य-समींदर !
सर्व तऱ्हेच्या विचित्र कविता सोज्वल उपहासें बहु लिहिता
विनोद हसरा त्यात खुलविता कवी अकिंचन ! कीं धनवत्तर ?
कैक कवी किति गल्लोगल्ली कवी शिकंदर महान वल्ली
मजेत उडवुन देई खिल्ली बल्वत्तर कीं ठरे बिलंदर ?

(या कवितेतील 'शिकंदर कवी,' 'तो मी नव्हेच '! )

# विनायक शामराव काळे

## (कवि बाबुलनाथ यांची काव्यकला)

### काव्यसंग्रह

आकाशगंगा — जलधारा
मुंग्यांचे वारूळ — प्रभंजन
धुवाँधार — त्रिशूळ
गीतवर्षा — त्रिवेणी
जहाँआरा आणि अजब कविता — नर्मदा किनारा
धूमधडाका — अमृतधारा

### काव्यें

रसराज जगन्नाथ — स्वामी रामतीर्थ
अस्तोदय (संपादित) (कवि/कै. चंद्रचूड)

### महाकाव्य

सुबोध कुमारसंभव (सर्ग १ ते ८ व ९ ते १७)

### आगामी

रुपेरी लाटा (निवडक गंभीर कवितांचा संग्रह)
सुबोध कुमारसंभव (महाकाव्य) (दुसरी आवृत्ति)
अस्तोदय (खंडकाव्य) (तिसरी आवृत्ति)


## काळे ब्रदर्स पब्लिकेशन

रम्यनगरी, 'ओ' बिल्डिंग, फ्लॅट नं. २३
बिबवेवाडी, पुणे ४११०३७.

जुन्या पिढीतील सतत छंदोबद्ध काव्यरचना करणारे नामवंत कवि श्री.वि.शा.काळे उर्फ बाबुलनाथ हे सांप्रत ८१ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत.

त्यांच्या कवितेत विडंबने आणि उपहास यांची रेलचेल आहे. विनोदाचा उपयोग सुधारणेचे साधन म्हणून मोठ्या कलाकुशलतेने त्यांनी केला आहे. विनोदी कवितेच्या दालनात त्यांनी आपलं मानाचं स्थान आजहि टिकविलेले आहे. त्यांचे काव्य उपहासात्मक आहे व त्यात शिष्ट समाजाचा सुंदर उपहास आहे.. साहित्य क्षेत्रातल्या सोंगाढोंगावर त्यांनी उत्तम तऱ्हेने प्रहार केला आहे.

तसेच अनेक गंभीर स्फुट कविता,प्रदीर्घ काव्ये व ''सुबोध कुमार संभव'' या सारखे महाकाव्य लिहिण्यापर्यंत त्यांची मजल गेली असल्याने त्यात ही त्यांनी अप्रतिम असे प्रावीण्य संपादन केले आहे.

ते जसे उत्कृष्ट काव्यलेखक आहेत तसेच यशस्वी काव्यवाचक ही आहेत. कवितेत त्यांनी तन, मन आणि धन सर्वस्वी अर्पण करून तिच्यावर निर्व्याज प्रेम केले आहे आणि त्यातच त्यांच्या वैयक्तिक आयुष्याचे सोने झाले आहे. या विनोद लहरींनी तुमचे जसे मनोरंजन हि होईल, तशा तुम्हाला त्या विचारप्रवृत्तहि करतील.

